# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ३९

## सभावृत्तांत

दिनांक - २०.१.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी - २०१५ ची मासिक मा. महापालिका सभा मंगळवार दि.२०.१.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.थोरात वनिता एकनाथ

१०. मा.सायकर अजय शंकरराव

११. मा.जाधव साधना रामदास

१२. मा.जाधव राहुल गुलाब

१३. मा.आल्हाट मंदा उत्तम

१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१५. मा.काळजे नितीन प्रताप

१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१७. मा.जगदीश शेट्टी

१८. मा.बाबर शारदा प्रकाश

१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.भारती फरांदे

२७. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.राजू मिसाळ

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.नेटके सुमन राजेंद्र

३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.लोंढे गणेश नारायण

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.जयश्री वसंत गावडे

४५. मा.पवार मनीषा काळूराम

४६. मा.प्रसाद शेट्टी

४७. मा.अविनाश (दादा) टेकावडे

४८. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४९. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५२. मा.वाबळे संजय मल्हारराव

५३. मा.मडिगेरी वर्षा विलास

५४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५५. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५६. मा.सुपे आशा रविंद्र

५७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५८. मा.मोहिनीताई विलास लांडे

५९. मा.गोफणे अनुराधा देविदास

६०. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६१. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६२. मा.महेशदादा किसन लांडगे

६३. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६४. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६५. मा.लोंढे शुभांगी संतोष

६६. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६७. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६८. मा.सावळे सिमा रविंद्र

६९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७०. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७१. मा.पालांडे सुजाता सुनिल

७२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७३. मा.कदम सदगुरु महादेव

७४. मा.गिता सुशील मंचरकर

७५. मा.कैलास महादेव कदम

७६. मा.छाया जगन्नाथ साबळे

७७. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७८. मा.आसवाणी सविता धनराज

७९. मा.वाघेरे सुनिता राजेश

८०. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८१. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८३. मा.काळे विमल रमेश

८४. मा.पाडाळे निता विलास

८५. मा.विनोद जयवंत नढे

८६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८८. मा.विमलताई सुरेश जगताप

८९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९०. मा.बारणे निलेश हिरामण

९१. मा.बारणे माया संतोष

९२. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९३. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९४. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९५. मा.कलाटे स्वाती मयुर

९६. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९७. मा.चौंधे आरती सुरेश

९८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१००. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०१. मा.जवळकर वैशाली राहुल

१०२. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०३. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०४. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०७. मा.जम सोनाली पोपट

१०८. मा.प्रशांत शितोळे

१०९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११०. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१११. मा.गायकवाड संध्या सुरदास

११२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११३. मा.शेंडगे आशा सुखदेव

११४. मा.मोटे किरण बाळासाहेब

११५. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११६. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११७. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११८. मा.पाटील सुजित वसंत

११९. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.चव्हाण,मा.पाटील-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे,मा.गायकवाड,मा.कुलकर्णी,मा.दंडवते,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.काची,मा.चव्हाण, मा.पठाण,मा.गड्डूवार,मा.कुलकर्णी,मा.घोडे-कार्य.अभियंता,मा.प्रविण आष्टीकर-सह.व्यवस्थापकीय संचालक(पीएमपीएमएल),मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, पद्मभूषण डॉ.वसंत गोवारीकर -पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु व जेष्ठ शास्त्रज्ञ, पांडूरंग दगडोबा तरवडे-पुण्याचे माजी महापौर, मल्हारराव गोविंदराव वाबळे-नगरसदस्य संजय वाबळे यांचे वडील,बाळा सावंत-वांद्रे पूर्वचे विद्यमान आमदार, उमादेवी नाडगोंडा उर्फ बेबी शकुंतला-ज्येष्ठ अभिनेत्री,सरिता पदकी-ज्येष्ठ कवियत्री, डॉ.माधवी सरदेसाई - साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या व ज्येष्ठ साहित्यिक, पद्माकर कुलकर्णी-शास्त्रीय गायक व नट पंडीत, प्रभाकर नेवगी-स्तंभ लेखक, ज्येष्ठ पत्रकार, गंगाराम तळेकर-मुंबईतील डबेवाल्यांचे संस्थापक व नेते, नंदकुमार भुजबळ-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी प्रशासन अधिकारी, कु.अश्विनी शरद वारकड, आनंदराव कल्याणराव शितोळे-सामाजिक कार्यकर्ते, विनायक मारुती संतोजी-सामाजिक कार्यकर्ते,मथुराबाई लिंबाजी ठोंबरे,सदाशिव बाबुराव बालघरे (आदेशबुवा), निलकंठ पतंगे,मारुती आर्जुन भगत,सोपान शंकर लोंढे,गजानन

गव्हाणे,दिघे,स्वरा संदिप सुर्वे यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, आजची सभा मंगळवार दि. २७/१/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.वनिता थोरात -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर -** सर्वांच्या संमतीप्रमाणे मंगळवार दिनांक २७/१/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ३९.</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०/१/२०१५ ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक - २७.१.२०१५</u> <u>वेळ - दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे जानेवारी-२०१५) दिनांक २०.१.२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२७.१.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेट्टी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२०. मा.पवार संगीता शाम

२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.जावेद रमजान शेख

२७. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.राजू मिसाळ

३०. मा.नंदा विकास ताकवणे

३१. मा.नेटके सुमन राजेंद्र

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३५. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३६. मा.लोंढे गणेश नारायण

३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३८. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४०. मा.अपर्णा निलेश डोके

४१. मा.अनंत सुभाष को-हाळे

४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४३. मा.पवार मनीषा काळूराम

४४. मा.प्रसाद शेट्टी

४५. मा.अविनाश (दादा) टेकावडे

४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४७. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४८. मा.शेख अस्लम शैकत

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.मडिगेरी वर्षा विलास

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.मोहिनीताई विलास लांडे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६०. मा.महेशदादा किसन लांडगे

६१. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६२. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६३. मा.लोंढे शुभांगी संतोष

६४. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६५. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६६. मा.सावळे सिमा रविंद्र

६७. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६८. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६९. मा.पालांडे सुजाता सुनिल

७०. मा.बहल योगेश मंगलसेन

७१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७२. मा.कदम सदगुरु महादेव

७३. मा.गिता सुशील मंचरकर

७४. मा.कैलास महादेव कदम

७५. मा.छाया जगन्नाथ साबळे

७६. मा.टाक अरुण मदन

७७. मा.वाघेरे सुनिता राजेश

७८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८०. मा.काळे विमल रमेश

८१. मा.पाडाळे निता विलास

८२. मा.विनोद जयवंत नढे

८३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८५. मा.विमलताई सुरेश जगताप

८६. मा.बारणे निलेश हिरामण

८७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८. मा.बारणे माया संतोष

८९. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९०. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९२. मा.चौंधे आरती सुरेश

९३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९४. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९५. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९६. मा.जवळकर वैशाली राहु ल

९७. मा.जगताप राजेंद्र गणपत

९८. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९९. मा.जगताप नवनाथ दत्तु

१००. मा.जम सोनाली पोपट

१०१. मा.प्रशांत शितोळे

१०२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०४. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०६. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०७. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०९. मा.संजय केशवराव काटे

११०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१११. मा.पाटील सुजित वसंत

११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.कुलकर्णी,मा.खांडकेकर,मा.दंडवते,मा.खोसे-सहा. आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.निकम, मा.इंगळे, मा.काची, मा.पठाण, मा.गद्दूवार, मा.कुलकर्णी,मा.घोडे-कार्य.अभियंता,मा.बोदडे- प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, आर.के.लक्ष्मण-ज्येष्ठ व्यंगचित्रकार, प्रा.मधुकर दत्तात्रय तथा म.द.हातकणंगलेकर-ज्येष्ठ साहित्यिक, रावसाहेब शिंदे - रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, डॉ.नागकुमार कुणचगी-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, विठ्ठल विनोद-ज्येष्ठ पत्रकार,सागर सुभाष गेंगजे-पोलिस कॉन्स्टेबल यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन आजची सभा मंगळवार दि.१०/२/२०१५ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.महापौर -** सर्वांच्या संमतीप्रमाणे मंगळवार दिनांक १०/२/२०१५ रोजी दुपारी १.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ३९**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/१/२०१५ व २७/१/२०१५ ची तहकूब सभा)**

दिनांक - १०.२.२०१५ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे जानेवारी-२०१५) दिनांक २७.१.२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.१०.२.२०१५ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश

१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी

२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२३. मा.पवार संगीता शाम

२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२६. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२७. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.आर.एस.कुमार

३०. मा.जावेद रमजान शेख

३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३२. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३३. मा.राजू मिसाळ

३४. मा.नंदा विकास ताकवणे

३५. मा.नेटके सुमन राजेंद्र

३६. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३७. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३८. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३९. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

४०. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४१. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४२. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४३. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४. मा.अपर्णा निलेश डोके

४५. मा.अनंत सुभाष को-हाळे

४६. मा.जयश्री वसंत गावडे

४७. मा.प्रसाद शेट्टी

४८. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४९. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५०. मा.शेख अस्लम शैकत

५१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५३. मा.वाबळे संजय मल्हारराव

५४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५५. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५६. मा.सुपे आशा रविंद्र

५७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५८. मा.मोहिनीताई विलास लांडे

५९. मा.अजित दामोदर गव्हाणे

६०. मा.गोफणे अनुराधा देविदास

६१. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६२. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६३. मा.महेशदादा किसन लांडगे

६४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६५. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६६. मा.लोंढे शुभांगी संतोष

६७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७१. मा.पालांडे सुजाता सुनिल

७२. मा.बहल योगेश मंगलसेन

७३. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७४. मा.कदम सदगुरु महादेव

७५. मा.गिता सुशील मंचरकर

७६. मा.कैलास महादेव कदम

७७. मा.छाया जगन्नाथ साबळे

७८. मा.टाक अरुण मदन

७९. मा.वाघेरे सुनिता राजेश

८०. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८१. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८३. मा.काळे विमल रमेश

८४. मा.पाडाळे निता विलास

८५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८६. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८७. मा.विमलताई सुरेश जगताप

८८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८९. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९०. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९१. मा.बारणे माया संतोष

९२. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९३. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९४. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९५. मा.कलाटे स्वाती मयुर

९६. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९७. मा.चौंधे आरती सुरेश

९८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१००. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०१. मा.जवळकर वैशाली राहुल

१०२. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०३. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०४. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०७. मा.जम सोनाली पोपट

१०८. मा.प्रशांत शितोळे

१०९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११०. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१११. मा.गायकवाड संध्या सुरदास

११२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११३. मा.शेंडगे आशा सुखदेव

११४. मा.मोटे किरण बाळासाहेब

११५. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११६. मा.संजय केशवराव काटे

११७. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११८. मा.पाटील सुजित वसंत

११९. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२०. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सह आयुक्त, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.चव्हाण,मा.पाटील-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.कडूसकर, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.दुरगूडे खोसे - सहा.आयुक्त, मा.सातव- प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.काची, मा.साळवी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.शेख, मा.घोडे, मा.कांबळे - कार्य.अभियंता, मा.प्रविण आष्टीकर - सह.व्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल), मा.बोदडे - प्रशासन अधिकारी,मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे-**मा.महापौर साहेब, आत्माराम भेंडे-ज्येष्ठ अभिनेते,थल्ल्याप्पा हनुमंता कांबळे-शहर अभियंता एम.टी.कांबळे यांचे वडील, प्राची कुलकर्णी-ज्येष्ठ पत्रकार यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन ही सभा दुपारी १.२५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.शातांराम भालेराव** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.महापौर -** उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे मंगळवार दि.१०/२/२०१५ रोजी दुपारी १.२५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ३९</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०/१/२०१५ व २७/१/२०१५ व दि.१०/२/२०१५ (दु.१.००) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक - १०.२.२०१५</u> <u>वेळ - दुपारी १.२५ वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे जानेवारी-२०१५) दिनांक १०.२.२०१५ (दु.१.००) ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.१०.२.२०१५ रोजी दुपारी १.२५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.थोरात वनिता एकनाथ

१०. मा.सायकर अजय शंकरराव

११. मा.जाधव साधना रामदास

१२. मा.जाधव राहुल गुलाब

१३. मा.आल्हाट मंदा उत्तम

१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१५. मा.काळजे नितीन प्रताप

१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१७. मा.जगदीश शेट्टी

१८. मा.बाबर शारदा प्रकाश

१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी

२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२३. मा.पवार संगीता शाम

२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२६. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२७. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.आर.एस.कुमार

३०. मा.जावेद रमजान शेख

३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३९. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.जयश्री वसंत गावडे

४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४७. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४८. मा.शेख अस्लम शैकत

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५४. मा.सुपे आशा रविंद्र

५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५६. मा.मोहिनीताई विलास लांडे

५७. मा.अजित दामोदर गव्हाणे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६०. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६१. मा.महेशदादा किसन लांडगे

६२. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६३. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६४. मा.लोंढे शुभांगी संतोष

६५. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६६. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६७. मा.सावळे सिमा रविंद्र

६८. मा.पालांडे सुजाता सुनिल

६९. मा.बहल योगेश मंगलसेन

७०. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७१. मा.कदम सदगुरु महादेव

७२. मा.गिता सुशील मंचरकर

७३. मा.कैलास महादेव कदम

७४. मा.छाया जगन्नाथ साबळे

७५. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७६. मा.वाघेरे सुनिता राजेश

७७. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू क्मितराम

७८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८०. मा.काळे विमल रमेश

८१. मा.पाडाळे निता विलास

८२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८४. मा.विमलताई सुरेश जगताप

८५. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८६. मा.बारणे निलेश हिरामण

८७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८. मा.अप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८९. मा.बारणे माया संतोष

९०. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९१. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९२. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९३. मा.कलाटे स्वाती मयुर

९४. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९५. मा.चौंधे आरती सुरेश

९६. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९७. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९८. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९९. मा.जगताप राजेंद्र गणपत

१००. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०१. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०२. मा.जम सोनाली पोपट

१०३. मा.प्रशांत शितोळे

१०४. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०६. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०७. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०८. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०९. मा.मोटे किरण बाळासाहेब

११०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१११. मा.संजय केशवराव काटे

११२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११३. मा.पाटील सुजित वसंत

११४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.ठाकूर- उपसंचालक नगररचना, मा.चव्हाण, मा.पाटील-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.कडूसकर, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.दुरगूडे, खोसे-सहा.आयुक्त, मा.सातव - प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.काची, मा.साळवी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.शेख, मा.घोडे, मा.कांबळे-कार्य.अभियंता, मा.प्रविण आष्टीकर-सह.व्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल), मा.बोदडे-प्रशासन अधिकारी, मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक - ३३ दिनांक १९/८/२०१४ चा सभावृत्तांत पुढील सभेचे वेळी कायम करणेत यावा असे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक - ३५ दिनांक २०/०९/२०१४ व १०/११/२०१ (दु.२.०० व २.२० वा.) चा सभावृत्तांत पुढील सभेचे वेळी कायम करणेत यावा असे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्रमांक - ३७ दिनांक २०/११/२०१४ चा सभावृत्तांत पुढील सभेचे वेळी कायम करणेत यावा असे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.महापौर -** मा.राजेंद्र जगताप यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, मी जे प्रश्न विचारलेले आहेत ते वाचून दाखवितो त्यानंतर त्याचा खुलासा करावा प्रश्न क्रमांक- १) मनपाने दि.२१/०१/२०१४ रोजी महाराष्ट्र शासनास आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी **-** आरोग्य वैद्यकीय अधिकारी **-** वैद्यकीय संचालक **-** अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी- वैद्यकीय अधिक्षक **-** वैद्यकीय अधिकारी अशी पदोन्नती साखळी आहे, असे कळवले आहे हे खरे आहे काय**?** अ) आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय संचालक, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी हयां पदांवर नेमणूक/पदोन्नतीसाठी शासन मान्य अर्हता, पात्रता, अनुभव काय निश्चित केलेली आहे**?** सविस्तर माहिती देणे. ब) दि.३०/०४/२०११ रोजी डॉ.नागकुमार कुणचगी निवृत्त झाले नंतर डॉ.अय्यर, वैद्यकीय संचालक पदोन्नतीचे सर्व अर्हता, पात्रता अनुभव बाबतचे निकष पुर्ण करित असताना त्यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याचे टाळून फक्त पदभार देण्याचे काय कारण होते**?** प्रश्न क्रमांक २) दि.३१/०५/२०१२ रोजी डॉ.अय्यर निवृत्त झाले नंतर डॉ.जगदाळे वैद्यकीय अधिकारी यांचेकडे पदभार सोपविण्यात आला, त्यावेळेस पदोन्नती साखळीतील अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी हे पद भरले होते की रिक्त होते**?** अ) दि.१७/०९/२०१२ रोजी आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद डॉ.साळवे यांची पदोन्नतीने भरण्यात आले होते, त्यामुळे दि**.** ३१/०१/२०१३ रोजी डॉ.जगदाळे यांची निवृत्ती नंतर त्यांचेकडील पदभार पदोन्नती साखळीप्रमाणे अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे सोपवणे क्रमप्राप्त असुनही का देण्यात आला नाही**?** ब) अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर संबंधीत अधिका-याला कायम केले आहे काय**?** कधी**?** प्रश्न क्रमांक ३) दि.०५/०७/२०१४ च्या मनपा सर्वसाधारण सभेमध्ये नगरसदस्य चंद्रकांता सोनकांबळे यांनी प्रश्न विचारला आहे की, “राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नती बाबत काही पत्रव्यवहार केला आहे काय**?**” त्याची प्रत महानगरपालिकेकडे आहे काय**?** त्यात काय आहे ते सांगा असे विचारलेनंतर त्यावर मा.सहा.आयुक्त टेकाळे यांनी मनपाकडे त्याची प्रत आली आहे ती मागवतो असे कबूल करुनही सभेपासुन का लपवून ठेवली**?** त्यामधील माहिती महापालिका सभेसमोर चर्चेसाठी सादर करण्यात यावी. अ) वैद्यकीय अधिकारी पदाच्या दि.२१/०५/२०१२ रोजी प्रसिध्द केलेल्या सेवा ज्येष्ठता यादीप्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी अर्हता धारण करणारे कोण कोण अधिकारी आहेत**?** डॉ.रॉय यांचे नावासमोर डी.पी.एच. अर्हता नमुद केली आहे काय**?** ब) डॉ.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांनी डी.पी.एच. ही अर्हता कधी प्राप्त केली**?** प्रश्न क्रमांक ४) दि.३१/०५/२०१३ च्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदोन्नती समितीचे वृत्तांतामध्ये “आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाचे दि. २१/०५/२०१२ रोजी प्रसिध्द केलेल्या सेवा ज्येष्ठता यादीमध्ये एम.बी.बी.एस. व त्यापुढील डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे सेवाजेष्ठ वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ.अनिल रॉय आहे” अशी दिशाभुल करणारी माहिती नमूद करुन व विधी समिती तसेच मनपा सभेसमोर सादर करुन नगरसदस्यांची फसवणूक करण्याचे कारण काय**?** याबाबत संबंधितावर गुन्हा दाखल केला आहे काय**?** प्रश्न क्रमांक ५) याबाबत राज्य शासनाचा संबंधित विभाग व अनुसूचित जाती आयोग यांनी आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर नेमणूक/पदोन्नती बाबत काय कळवले आहे याबाबत सविस्तर माहिती सादर करणे. याचा खुलासा करावा.

**मा.आर.एस.कुमार-**मा.महापौर साहेब, आताच जगताप यांनी प्रश्न वाचले त्या उत्तरामध्ये अनेक उत्तरे खोटी आहेत. अशी खोटी उत्तर दिल्याबद्दल प्रशासनाचा प्रथम मी निषेध करतो. आरोग्य वैदयकीय अधिकारी पदावर अपात्र उमेदवार डॉ.अनिल रॉय यांच्या हितासाठी अस्तित्वात नाही ते अस्तित्वात आहे असे दाखवून बनावट दस्ताऐवज तयार करण्यात आलेला आहे. बनावट दस्ताऐवज म्हणजे ३१/५/२०१३ रोजी आरोग्य वैदयकीय अधिकारी पदावर डॉ.रॉय यांना घाईघाईने व गोपनीय पध्दतीने पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेला पदोन्नती सभेचा सभावृत्तांत आहे. सदर सभावृत्तांतामध्ये ३१/१२/२०११ रोजी अंतीम केलेल्या वैदयकीय अधिकारी पदाच्या सेवाजेष्ठता यादीप्रमाणे डॉ.रॉय एमबीबीएस, डीपीएच अर्हता धारण करणारे हे एकमेव अधिकारी आहेत असे दाखविण्यात आलेले आहे. परंतु वस्तुस्थिती वेगळीच आहे डॉ.रॉय यांनी स्वत: दि.३०/०५/२०१३ रोजी अर्हता प्राप्त केल्याच कळवल आहे. याच्यामध्ये मार्कलीस्ट आणि प्रमाणपत्र दि.३०/५/२०१३ ला सबमीट केलेले आहे. म्हणजे २०११ च्या सिनॅरीटी लिस्टमध्ये तुम्ही काय म्हणताय He is the only medical officer, who is senior. Qualification is MBBS,D.P.H. He is not appeared for DPH. इथे डिपीच असायला पाहीजे होते. हे खरे असेलतर प्रमोशन चुकीचे आहे, सभावृत्तांत पण बोगस आहे. निकाल डिग्री नंतर मिळाला आहे आणि सिनॅरीटी लिस्टमध्ये एमबीबीएस बरोबर डीपीएच पण दाखवलेले आहे. सहाय्यक आयुक्त, प्रशासन पदावर काम करत असलेल्या अधिका-यांनी ५/७/२०१४ च्या सर्वसाधारण सभेमध्ये डॉ.रॉय यांचा महापालिका सभेसमोर असलेला प्रस्ताव कायदेशीर असल्याचे स्पष्टीकरण दिले. मी जे म्हणतो ते खरे असेलतर मग तुमचा ठराव कसा काय कायदेशीर असणार. आणि म्हणून खोटी माहिती देवून जाणीवपुर्वक प्रशासनाने सभासदांची फसवणूक केलेली आहे असा माझा आरोप आहे. नॅशनल कमीशन फॉर शेडयूल कास्ट महाराष्ट्र यांच्याकडून २०१३ ला पत्र आलेले आहे. त्यातील शेवटचा प्यारा मी वाचुन दाखवितो. (इंग्रजी पत्राचे वाचन केले) जी.बी.मध्ये सन्मा.सदस्य यांनी या पत्राबद्दल विचारले होते, त्यावेळेस उत्तर देणा-या अधिका-यांनी सांगीतले आमच्याकडे पत्र आलेले आहे त्याबद्दल माहिती देवू. पुढच्या जीबी मध्ये माहिती देतो असे सांगीतले. परंतु पुढच्याही जी.बी.मध्ये माहिती दिलेली नाही आणि अजूनही विषय पेन्डींग आहे. शेडयूल कास्ट कमीशनने जे काही त्यांच्या लेटरमध्ये मेन्शन केलेले आहे ते खरे आहे का याचेही उत्तर दयायला पाहिजेत. डॉ.रॉय यांच्या अंडर कामकाज चाललेले आहे यात तुम्ही स्क्रूटीनी केलीतर तुम्हांला माहिती पडणार आहे जगदाळेंच्या काळात जे काम चाललं होते तसेच डॉ.रॉय काम करतात. आणि आताजर त्यांच्या कामामध्ये सुधारणा झाली नाहीतर डॉ.जगदाळे यांच्यावर जशी कारवाई झाली तशीच कारवाई करावी लागेल. आश्चर्याची बाब म्हणजे यशवंतराव चव्हाण रुग्णालयात सदर सॉफ्टवेअर घेण्यासाठी त्यामध्ये सुध्दा ब्रॅण्डनेम टाकलेल आहे. त्याचप्रमाणे मायक्रोस्कोप म्हणून एक ॲटम आहे हे घेण्यासाठी टेंडर काढलेले आहे त्यामध्ये ब्रॅण्डनेम कशाला टाकता तुम्ही. **How can publish a tender with brandname? It clearly shows, it is purposely. How can a docket get pass out to Commissioner with specification?** तुम्ही त्या पर्टिक्यूलर कंपनीला देण्यासाठी टेंडर काढता का**?** मग टेंडर कशाला काढता**?** डायरेक्ट त्या कंपनीला देवून टाका. **You can mention the specifications of the microscope item, it should be required.**

**But why you mention the brand name? Comparing to the microscopic machine purchased by other hospitals,** एचबीओटी मशीनमध्ये जसे झाले तसेच इकडे सुध्दा होते आहे. तुमच्याकडे डिपार्टमेंट तरी आहे का**?** डॉक्टर्स आहेत का**?** स्पेशल ऑपरेशन थिएटर आहे का**?** हे सगळ इन्फ्रास्ट्रक्चर न प्रोव्हाईड करता तुम्ही हे मशीन खरेदी करता. असे प्रकार चालत असतीलतर सिव्हील विभागापेक्षाही लाखो पटीने भ्रष्टाचार वैदयकीयमध्ये करत असेलतर काय समजायचं. ब्रॅण्डनेम का टाकल, ती मशीन बनवणारी दुसरी पार्टी नाही का आणि म्हणून मला म्हणायच आहे की अजूनही या विभागामध्ये कामकाज सुधारलेले नाही. जसं होत तसच चाललेल आहे. मी डॉ.रॉय यांना फोन करुन विचारले तर ते म्हणतात ब्रॅण्डनेम टाकलेतर काय चुक झाली. तुम्ही सुपर क्लासवन ऑफीसर आणि मला विचारतात ब्रॅण्डनेम टाकलतर काय चुक झालं. हे एक मी उदाहरण दिलेल आहे असे अनेक उदाहरण माझ्याकडे आहेत. **Even under the leadership of Dr.Roy corruption & exploitation is taking place.** मी विनंती करतो की डॉ.रॉय यांचे प्रमोशन कॅन्सल करा. सिनॅरीटीमध्ये जे कोणी बसते त्यांना हे पद दयावे. डॉ.रॉय सिनॅरीटीमध्ये नाहीत. तुम्ही येथे चुकीची माहिति देवून ठराव करुन घेतलेला आहे ३०/५/२०१३ ला प्रमोशन दिलेले आहे त्याच दिवशी त्यांनी सर्टिफीकेट आणून तुम्हांला दिलेले आहे आणि त्याच तारखेला तुम्ही प्रमोशन कसे काय देवू शकता. तुमच्या नियमाप्रमाणे डीपीएच झाल्यानंतर पाच वर्षाचा अनुभव पाहिजे. तुम्ही थांबलात का, त्यांच डीपीएच होण्यासाठी. त्याच दिवशी तुम्ही प्रमोशन देता एवढी मोठी चुक तुम्ही करता. मी बोललेलो काही चुकीचे असेलतर तसे मला पेपरमध्ये दाखवा. पदोन्नती देतांना चुकीचे डॉक्यूमेंट बनवलेले आहेत, सिनॅरीटीही तुमची चुकीची आहे. त्यामुळे हे प्रमोशन चुकीचे आहे.

**मा.शमीम पठाण-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह**,** खरं म्हणजे हा विषय झालेला आहे परंतु मा.सभासद राजेंद्र जगताप यांनी पुन्हा स्पष्टीकरण मागीतलेले आहे. **उ**त्तर वाचलेले आहे आणि वस्तुस्थिती याठिकाणी वर्णन केलेली आहे. मला मा.आयुक्तांना एवढे विचारायचं आहे की, शासनाला आपण काही वेगळी माहिती दिलेली आहे का**?** ती माहिती आता तुम्ही मागवा म्हणजे वस्तुस्थिती काय आहे ते समजेल आम्हांला असं कळतंय की शासनाला वेगळी माहिती दिलेली आहे आणि आम्हांला या प्रश्नाच्या उत्तरामध्ये वेगळी माहिती आहे. नेमके काय खरे आहे ते तुम्हांला कळेल, त्यात फरक कळेल. लगेचच आता माहिती करुन घ्या की शासनाला आपण कोणती माहिती कळवलेली होती. डॉ.रॉय ज्या साली डीपीएच झाले तेव्हा ते आपल्याकडे सर्व्हिसला होते. आपण त्यांना डीपीएचसाठी डेप्युटेशनवर पाठवले होते काय**?** ते महापालिकेचा पगार घेत असताना त्यांनी डीपीएच केलेले आहे अशी मला माहिती आहे. कदाचित ती चुकीची असेल परंतु तीही माहिती घ्यावी आणि याठिकाणी दयावी. म्हणजे पगार घेवून तुम्हांला डीपीएच चालेल काय**?** एखादया शिक्षकाला ट्रेंन करायचे असेलतर बीएड केर्ससाठी पाठवितो त्यांचा पगार चालू असतो त्या संस्थेची परवानगी लागते, तसा संस्थेचा ठराव लागतो तसा महापालिकेचा ठराव आहे काय**?** पगारी रजा घेवून त्यांना डेप्युटेशनवर पाठवल होत काय**?** पण माझ्या माहितीप्रमाणे ते त्या काळामध्ये याठिकाणी सर्व्हिसमध्ये होते आणि त्यांनी डीपीएच पास केलेले आहे. एकदाच याचा सोक्षमोक्ष लावावा.

तुम्ही तरी या राजकारणामध्ये किंवा या वादामध्ये का पडावत. मा.आयुक्त साहेब, तुमच्या समोर अनेक काम आहेत. तुम्ही काम करतात त्याच आम्हांला प्रत्यंतर येतय. तुमच्या दृष्टीने अशा हजारो ऑफीसरमध्ये एखादयाच्यासाठी असा वेळ घालवायचा, सभागृहाचाही वेळ जातोय. याच्या मागेही वेळ गेलेला आहे मी आयुक्तांना विनंती करीन की हे जर बोगस असेलतर बोगस म्हणा, तुम्हांला डॉ.रॉय काय, डॉ.साळवे काय किंवा आणखी तीसरा कोणी, जो तिथे बसत असेल त्यांना दया काम होण्याशी कारण आहे. पाण्यात पडलं की कोणालाही पोहता येतं. एवढच सांगते आणि मी जे दोन मुद्दे मांडलेले आहेत त्याची माहिती घेवून आम्हांला दयावी

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सभासद बंधुनो व पत्रकार. मी जे प्रश्न विचारलेले होते, आदरणीय राजेंद्र जगताप आणि इतर सभासदानी याठिकाणी तो विषय काढलेला आहे. मला वाटत आयुक्तांनी त्याच्यावर त्यांचे मत किंवा जी काही खरी परिस्थिती आहे ती सांगीतलीतर बरे होईल. मा.महापौर, आपल्याला सुध्दा विनंती आहे की आपली महापालिका महाराष्ट्रातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका ज्या महानगरपालिकेला आदर्श महानगरपालिका म्हणून नॅशनल पुरस्कार दिला जातो, दिल्लीमध्ये आपण मोठमोठं प्राईझ घेतो आणि अशा महापालिकेमध्ये आपण एखादया अधिका-यावर अन्याय होतो हा मेसेज या महानगरपालिकेतून बाहेर जातो हे सुध्दा चुकीचे आहे यापुर्वी सुध्दा अशा कितीतरी गोष्टी घडलेल्या आहेत परंतु ते आता कधीतरी बदलले पाहिजे. आम्हांला डॉ.रॉय यांच काही देणंघेणं नाही, आम्हांला डॉ.साळवे यांचे काही देणं घेणं नाही. ते आमच्या कोणाच्या जवळचे नाहीत फक्त ज्या गोष्टी निदर्शनास येतात त्याच्यावर आपण निर्णय घेतला पाहिजेना. आणि हा निर्णय सर्वानी घेतला पाहिजे. नगरसेवकांना सुध्दा माझी विनंती आहे की आपल्या पक्षाच्या प्रमुखाने आपल्याला काही सांगीतले हो म्हणा, म्हणून तुम्ही हो म्हणू नका, वस्तुस्थिती लक्षात घ्यावी. आपल्या घरातील भाउ-बहिण असेलतर व त्याच्या सरकारी कामात जर त्यांच्यावर अन्याय होत असेलतर आपण धावून जातो कारण हे चुकीचं होतयं म्हणून ती चीड प्रत्येक ठिकाणी असली पाहिजे. या सभागृहात एवढे फोटो बघतो, ज्योतीबा फुले पासून शिवाजी महाराजांपासून आता राजीव गांधी पर्यंतचे फोटो सभागृहात शो साठी लावले का या सगळयांच्या विचाराने म्हणजे खरं काम महानगरपालिकेमध्ये आपण करणार आहोत की नाहीत. म्हणजे कोणीतरी माझ्याकडे येतं मला एखादी माहिती पुरवतं मी त्यावर लगेच निर्णय घ्यायचा आसं होवू शकत नाही. आयुक्त साहेब याचा निर्णय तुम्हांला घ्यायचा आहे. मला विनंती करायची आहे की सगळया गोष्टी स्पष्टपणे झालेल्या आहेत, कोणाच डीपीएच अगोदर झालेल आहे कोणाच नंतर झालेल आहे, कामावर असताना कोर्स झालेला आहे. पाच-पाच वर्षे हे पद रिक्त का ठेवले, हा खरा प्रश्न आहे. ज्यांनी हे पद आतापर्यंत रिक्त ठेवलेले आहे त्यांच्यावर त्या वेळच्या अधिका-यांवर कारवाई झाली पाहिजे. म्हणजे काही विशिष्ट व्यक्तीला डोळयासमोर ठेवून महापालिकेच कामकाज करणार असूतर ते चुकीच आहे त्यामुळे एखादयावर अन्याय होतो मग का अन्याय होतो याचे कारण शोधावे लागतील. अमूक एका व्यक्तिवर अन्याय का होतो, आमुक एका व्यक्तिला पाठीशी का घालता. हे कारण जर आपण शोधायला गेलोतर तोही वेगळा विषय महापालिकेत होतो. आपल्याला एससीएसटी कमीशनचे सुध्दा पत्र आलेले आहे. महाराष्ट्र शासनाने सुध्दा १५ जानेवारीला तुम्हांला पत्र दिलेले आहे की जी खरी

बाब आहे ती आम्हांला सांगा, आम्हांला कळवा ते तुम्ही कळविले पाहिजे. प्रशासनाच्या ज्या काही त्या ठिकाणी सहया आहेत, त्यामध्ये अधिका-यांच्या सहया आहेत. तुमची समिती प्रमोशन देण्याची त्यांच्या सहया आहेत. त्यामध्ये तुम्ही एका अधिक-यांच लिहीता आणि एका अधिका-याच काहीच लिहीत नाहीत म्हणजे हा दुजाभाव नाही का. म्हणजे जे अधिकारी सहया करतात ते सुध्दा अधिकारी दोषी आहेत. यांच्यावर सुध्दा कारवाई करा. याच्यामध्ये कोणी डिपमध्ये जात नाही म्हणून असे होता कामा नये. डिपमध्ये गेलेतर सर्व अधिका-यांवर कार्यवाही होऊ शकते, आपल्या महापालिकेची बदनामी होवू शकते. आणि लोकप्रतिनीधी म्हणून आम्ही सभागृहात बसतो आम्ही ठराव करतो, मंजूर म्हणतो त्यावेळेला हा मंजूर म्हणण्यामागे आम्ही सुध्दा त्याचा अभ्यास करणे गरजेच आहे. त्यामुळे महापौर साहेब, आपल्याला सुध्दा विनंती आहे की चुकीचे ठराव तुम्ही सुध्दा मान्य करुन घेऊ नका तुमच्या कारकिर्दीमध्ये चुकीचे ठराव झाले असे सुध्दा होता कामा नये ही सुध्दा आमची तुम्हांला विनंती आहे. ब-याचशा गोष्टी आहेत. फक्त आपण चुकीचा ठराव मागच्या जीबी मध्ये मंजूर केलेला आहे तो ठराव रद्द करावा, तो अधिकार महापौरांचा आहे, तो ठराव रद्द करावा अशी माझी विनंती आहे. आयुक्त साहेब तुम्हांला जे दोन पत्र शासनाचे आणि एससी/एसटी कमीशनचे आलेले आहे त्या दोन पत्राला उत्तर देताना जी खरी परिस्थिती आहे तीच सर्व परिस्थिती मांडा आणि त्या पध्दतीचे पत्र तुम्ही शासनाला दया, कमीशनला पाठवा. आणि मा.महापौर साहेब, चुकीचे ठराव करायची पध्दत किमान २०१५ मध्ये बंद करु एवढीच विनंती करते, धन्यवाद.

**मा.सिमा सावळे-**सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु, अधिकारी वर्ग,मा.महापौर साहेब, मागच्या वेळेस हा विषय आलेला होता त्यावेळेसचे तत्कालीन आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी शासनाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. काही लोकांचे समाधान कसे करायचे हे कळत नाही. एखादे पद मिळाले नाही म्हणजे आपले आयुष्य संपत की काय**?** असा जर विषय असेलतर तो आज कुठल्याही परिस्थितीत संपवलाच पाहिजे. एकतर डॉ.रॉयला तरी घरी पाठवा नाहीतर डॉ.साळवेला तरी घरी पाठवा. कारण या दोघांच्या भांडणामध्ये केवळ आमचा वापर करुन घेतला जातो. आमच्याकडे जर एखादया अधिका-यांनी तक्रार केलीतर, त्यांचेवर अन्याय झालातर निश्चितपणे नगरसदस्य म्हणून आमचे काम आहे त्यांच्या मागणीकडे लक्ष देणं, दुर्लक्ष करुन चालणार नाही कारण ते सुध्दा शहराचे नागरीक आहेत याठिकाणी डॉ.रॉय यांनी डीपीएच कोर्स ते महापालिका सेवेत असताना केला, त्याला परवानगी आयुक्तांनी दिली**?** डी.वाय. पाटिलांनी, मेडीकल कौन्सिलने दिली, बरोबर. त्यांची परवानगी असताना त्यावेळेसचे तत्कालीन आयुक्त आशिष शर्मा यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे अशी मागणी मागच्यावेळेस सुध्दा मी केली होती. त्याचबरोबर डॉ.पवन साळवे हे १४/९/१९९२ रोजी महापालिका सेवेमध्ये रुजू झाले. बी.जे.मेडीकल कॉलेजमध्ये रेसीडेन्ट लेक्चरर म्हणून त्यांनी काही काम केलेले होते त्याचा कालावधी १/३/१९९१ ते ३१/७/१९९४ आहे. ठिक आहे, वैदयकीय सेवेत काम करत असताना तुमचे निकष वेगळे असतील. डॉक्टर म्हणून चांगल काम करत असतील म्हणून असेल, परंतु आपण "जिनके घर शिशोंके होते है, वो दुसरोंके घरोंपे पत्थर नही मारा करते"" त्याचप्रमाणे डॉ.पवन साळवे यांना एवढी विनंती आहे की डॉ.डी.वाय पाटीलला १/२/१९९९ ते ३०/६/२००४ या दरम्यान ते तेथे लेक्चरर म्हणून होते त्या दरम्यान ते

या महापालिकेत सेवेमध्ये होते. एकीकडे दुसऱ्यांना चोर म्हणतानं आपण सुध्दा काय केल याची सुध्दा पडताळणी करायला पाहिजे. मेडीकल कौन्सिल ऑफ इंडियाची वेबसाईड आहे त्या वेबसाईडवर जर आपण सर्च केलेतर त्याठिकाणी जे कोणी डॉक्टर असतील त्यांच्या ऑर्डरप्रमाणे त्यांनी कुठ-कुठ लेक्चररशिप केलेली आहे त्यांच्यावर काही कारवाई झालेली आहे का याबाबत संपुर्ण विस्तृत अशी त्याठिकाणी माहिती दिली जाते त्यांच लेटर व्हेरीफिकेशन २००७ ला आलेल आहे डी.वाय.पाटिलकडूनं. ते सुध्दा व्हेरीफिकेशन व्हेबसाईडला अव्हेलेबल आहे. मग आपण दोष कोणाला दयायचा. डॉ.रॉयला दयायचा, शंभर टक्के दिलाच पाहिजे, शिक्षा झालीच पहिजे परंतु त्याचबरोबर डॉ.पवन साळवे हे सुध्दा तेवढेच जबाबदार आहेत. कारण की त्यांनी सुध्दा या सभागृहाचा तेवढाच वेळ घेतला का नाही त्यांनी त्याठिकाणी पत्र पाठविताना सांगीतल की मी डॉ.डी.वाय.पाटीलला इतके इतके वर्षे लेक्चरर म्हणून जात होतो, तिथला पगार घेत होतो हे का नाही सांगीतलं, सांगायला पाहिजे होते नां. मग एखादा शिक्षण घ्यायला जातो त्यावेळी त्याठिकाणी आयुक्तांनी त्यांच्या खुलाशामध्ये स्पष्ट करायला पाहिजे होते की आम्ही त्यांना कुठलाही अर्थिक मोबदला देणार नाही, मोबदला घ्यायचा आणि पुन्हा बोंब पण मारायची. डॉ.रॉय तरी कोण**?** एकाने म्हणायचे माझ्यावर मागसवर्गीय आहे म्हणून अन्याय होतो, मग हे काही उच्च प्रतीचे आहेत का**?** ते सुध्दा तेच आहेत नां मग एखादयान केवळ आपली दोस्ती राखायची म्हणून मी काही बोलणार नाही आणि दुसऱ्याबरोबर मात्र असं वागायचं. महापौर साहेब, आपण काय करतो दोन तीन वेळेस विषय तहकूब करतो त्यावर निर्णय का घेत नाहीत, त्यामध्ये निर्णय का घेत नाहीत. डॉ.साळवे बरोबर आहेत तर त्यांना का देत नाहीत. तुम्ही आमची का वाट बघता. प्रशासन खेळ करतं आणि आम्ही आपलं उडया मारत-मारत पळत राहतो. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की जर एकाला एक न्याय असेलतर तोच न्याय दुसऱ्याला सुध्दा असला पाहिजे. डॉ.साळवे यांनी त्याठिकाणी लेक्चररशीप केलेली असेल, त्यांनी पगार घेतला असेलतर त्यांच्यावर सुध्दा कारवाई होणे अपेक्षीत आहे. कारण हा विषय आता कुठंतरी थांबलाच पाहिजे, थांबलाच पाहिजे. कारण उगाचच तुझं माझ, तुझं माझ असं लहान मुलांसारख करायचं आणि त्याच्यामध्ये आमची फरपट करायची हे योग्य नाही. मा.महापौर साहेब, कुमार साहेबांनी सांगीतले मायक्रोस्कोप मशनरी खरेदीमध्ये ब्रॅण्डनेम टाकलेले आहे मी कुमार साहेबांच्या मताशी शंभर टक्के सहमत आहे. ब्रॅण्डनेम टाकायला नकोय. यांच्यामध्ये ब्रॅण्डनेम टाकत नाहीत. मग तुम्ही इतर सगळया डिपार्टमेंटमध्ये जा. वायसीएममध्ये साफसफाईच कॉन्ट्रॅक्ट देतांनासुध्दा आपण पाच वर्षे पीएमओ ऑफीसमध्ये साफसफाई केल्याचा अनुभव असलाच पाहिजे हे काय आहे, हेच आहे. पाणीपुरवठयामध्ये तुम्ही गेलात, स्काडामध्ये सेम, एकच माणुस बसला पाहिजे तोच त्याला क्वॉलीफाय होईल. याच्यासाठी म्हणून त्याच क्वॉलीफिकेशन जे असेल ते इतराचं कसं नसेल हे बघुन त्याठिकाणी निवीदेमध्ये टाकले जाते. असे एक नाहीतर हजार उदाहरण मी तुम्हांला देवू शकते. परंतु यामध्ये डॉ.रॉय जर दोषी असतीलतर डॉ.रॉय यांच्यावर सुध्दा शंभर टक्के कारवाई झाली पाहिजे. परंतु त्यामध्ये मी अती साजूक आहे, मी सु-स्वरुप आहे असं मानणा-या डॉ.साळवे यांना सुध्दा आपण बक्षीलं नाही पाहिजे एवढेच सांगून थांबते. जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयु**क्त** साहेब, नगरसेवक, नगरसेविका, सर्व सभागृह, पदाधिकारी व पत्रकार बंधु. आमचे सहकारी मित्र राजेंद्र जगताप यांनी आपल्यासमोर महापालिकेच्या माध्यमातून प्रश्न घेतलेले आहेत. त्यामाध्यमातून मी आपल्या समोर काही विषय मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. डॉ.रॉय यांचेवर यापुर्वी सुध्दा अनेक वेळा चर्चा झालेली आहे आणि डॉ.रॉय यांनी काय काय पराक्रम त्यांच्या कार्यकाळात केले ते यापुर्वी पण सभागृहात अनेक वेळा मी बोललो आहे आणि आता सुध्दा हा विषय आलेला आहे म्हणून आपल्यासमोर मांडणे गरजेचे आहे. चिखली गावात माझ्या भागात डॉ.रॉय यांचे १२८.३५ चौ.मी. बांधकाम होतं. पुर्वी आपल्याकडे अनधिकृत बांधकाम केल्यानंतर नगरसेवकांचे पद जातं तसं अधिकारी यांचेही पद जावे म्हणून मी या सभागृहात पुर्वी सुध्दा मागणी केलेली आहे. त्यानंतर डॉ.श्रीकर परदेशी साहेबांनी ज्या अधिका-यांचे अनधिकृत बांधकाम आहे त्यांच्यावर काय कारवाई केली. चोर सोडून संन्यासाला फाशी देण्याचे काम त्यावेळचे आयुक्तांनी केलेली आहे. सर्वसामान्य शिक्षक, चार शिक्षकांना आपण अनधिकृत बांधकाम केले म्हणून बडतर्फ केलेले आहे आणि डॉ.रॉय यांना पदोन्नती देतो, बढती करतो, त्यांना आपण मुख्य पदावर बसविण्याचा विषय आहे. एकाला एक न्याय करतो. ते सुध्दा कामगार आहेत आणि हे सुध्दा कामगार आहेत. एका कामगाराला एक न्याय आणि दुस-याला बढती दयायची असेलतर मला वाटते हे साहजीकच आमच्याकडनं किंवा आपल्याकडून, नव्हेतर प्रशासनाकडून हा शंभर टक्के अन्याय होतो असं मला नक्कीच वाटतंय. या अधिका-याची एफआयआर झालेली आहे. दिनांक ३१/१२/२०१२ ला निगडी पोलीस स्टेशनमध्ये डॉ.रॉय यांच्यावर अनधिकृत बांधकामाच्या बाबत एफआयआर दाखल झालेला आहे. त्यांनी ते बांधकाम पाडल, नाही पाडल हा विषय गौण आहे. या शिक्षकांनी आपली स्वत:ची सर्व बांधकाम पाडलेली आहेत असे आपल्याकडे अर्ज सादर केलेले आहेत. त्यांना त्यांच्या नोकरीतून बाहेर ठेवल असेलतर हे महाशय आपल्या महापालिकेचे जावाई नाहीत. यांना महापालिकेमध्ये कामावर ठेवले आणि चार शिक्षकांना बाहेर ठेवले यामध्ये लक्ष घातले पाहिजे. सगळयाना न्याय सारखा दयावा. ते चार कामगार बाहेर ठेवले असतीलतर यांना सुध्दा बाहेर ठेवावे असे वाटते. डीपीएच परीक्षा ज्यावेळेस डॉ.रॉय करत होते त्यावेळेस त्यांनी महापालिकेमध्ये सुध्दा नोकरी केलेली आहे. त्याच मस्टर आणि रजिस्ट्रर आहे त्यांच्या नौकरीचे सर्व रजिस्ट्रर आहे. कुठल्या दिवसापर्यंत काम केले त्याचे रजिस्ट्ररचे माझ्याकडे पेपर आहे. त्यांनी आपल्याकडे नोकरी केली आणि डीपीएच परिक्षा सुध्दा केली. एका अधिका-याला सक्तीच्या रजेवर किंवा सुट्टीवर पाठविता आणि एका अधिका-यांना आपली नोकरी करा आणि मग तिथं डीपीएचची परिक्षा दया म्हणतो हा सुध्दा गंभीर गुन्हा पिंपरी चिंचवड माध्यमातून झालेला आहे. एक जे.ई. आहेत त्यांना उच्च शिक्षणसाठी तीन वर्षे बाहेर सक्तिच्या रजेवर पाठविलेले आहे. या अधिका-यांना सक्तीच्या रजेवर पाठवता त्यांना एक न्याय देता आणि दुस-या अधिका-यांना १० ते ५ आपल्याकडे नोकरी करणार आणि डी.वाय. पाटिलमध्ये ९ ते ५ डीपीएच करणार म्हणजे तेथे आणि आपल्या येथे सेम टाईमिंग म्हणजे डॉ.रॉय पिक्चरमधल्या सारखे डबल व्हिलन झालेले आहेत की काय**?** तीकड पण नोकरीवर आणि आपल्या येथे पण नोकरीवर. आपल्या येथे पगार आणि तीकडच शिक्षण घेतात. माने म्हणून शिक्षक आहेत शिक्षकांना पगार किती असतो आपल्यालाही माहिती आहे. त्या शिक्षकांनी बांधकाम केले असेल तेही त्यांनी मान्य केलेल आहे. त्यांना आपण निलंबीत केलेले

आहे. या सेम केसमध्ये एका बाजूला तुम्ही निलंबन करता आणि एका बाजूला पदोन्नती देता हा विषय सभागृहाला न पटण्याइतका हा विषय नाही. यामध्ये लक्ष घालावे. आमचे डॉ.साळवे आणि डॉ.रॉय यांच्याशी काही देणेघेणे नाही. कोणी आमचा नातेवाईक नाही, कोणी आमचा पाहूणा नाही, कोणी आमचा हितसंबंधी नाही. जे रोटेशनमध्ये आहे, जो त्याला पात्र आहे त्यांना दयायचे नसेलतर शासनाचे अधिकारी बोलवावे. हे दोन्ही पात्र नसतीलतर शासनाचे बोलवावे. ही पदोन्नती देताना डॉ.रॉय यांनी ज्यादिवशी परिक्षा पास केली त्याच्या सेम दुस-या दिवशी प्रमोशन दिलेले आहे. त्याच्या अगोदर सुध्दा साळवी हे डॉक्टर होते त्यांना ते पद न देता ते पद रिक्त ठेवले. हे पद रिक्त ठेवण्याचे कारण काय**?** याचे उत्तर दयावे. आपण म्हणत असाल नियमानुसार किंवा पात्रतेनुसार डॉरॉय बसत असतील, डॉ.साळवे बसत असतील. डीपीएच परिक्षा झाल्यानंतर जो नियम डॉ.अय्यरला होता एमबीबीएस, डीपीएच ते हा कोर्स पुर्ण करु शकले नाहीत. आरोग्य वैदयकीय अधिकारी पदासाठी एमबीबीएस, डीपीएच आणि पाच वर्षाचा सलग अनुभव पाहिजे. डॉ.अय्यर यांना सलग अनुभव नसल्याने ते वैदयकीय अधिकारी पदासाठी पात्र नाहीत हे आपलेच पत्र आहे. डीपीएच परिक्षा पास झाल्यानंतर पाच वर्षाचा अनुभव पाहिजे. हा शासनाचा जी.आर.आहे. पाच वर्षाचा अनुभव पाहिजे, नसेलतर वैदयकीय अधिकारी या पदावर राहता येत नाही. हे तुम्हीच दिलेल आहे. डॉ.अय्यरला वेगळा न्याय दिलेला आहे. यांच्यासाठी एवढा अटापिटा का चाललेला आहे. माझी विनंती आहे की एकतर त्यांनी अनधिकृत बांधकाम केलेले आहे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला. एका बाजुला आपण आमचे दोन कामगाराला बाहेर काढलेले आहे आणि यांना पदावर ठेवलय. दुसरा आरोप, डीपीएच परिक्षा आपल्या महापालिका सेवेत असताना पास केली. तीसरा आरोप, त्यांनी डीपीएच परिक्षा पास झाल्यानंतर पाच वर्षाचा अनुभव लागतो जो डॉ.अय्यरला दाखवलेला होता तो अनुभव डॉ.रॉय यांना नाही म्हणून ते या पात्रतेच्या यादी मध्ये नाहीत म्हणून आपण योग्य तो निर्णय घ्यावा. या अधिका-यांना किती दिवस सस्पेन्ड ठेवणार. या दोन शिक्षकांना किती दिवस सस्पेन्ड ठेवले तेवढया दिवस यांना सुध्दा सस्पेन्ड ठेवावे नसेलतर आम्ही तुमच्यावर मानहानीचा दावा दाखल करणार. दोन शिक्षकांना एक न्याय आणि इतरांना दुसरा न्याय कसा काय**?** असे असेलतर यांच्या वतीने आपल्यावर यांची मानहानी केली म्हणून मानहानीचा दावा दाखल करेल. किरण गावडे यांच्या चौकशीचा विषय सभागृहामध्ये मांडलेला होता किरण गावडेना आठ ते दहा महिने झाले चौकशी चालू आहे त्यासाठी टाईमबॉण्ड नाही का**?** काही टाईम पिरीएड आहे का**?** पुर्वी ज्यांची ज्यांची चौकशी केली त्यांना निलंबीत केलेले आहे. किरण गावडे यांची फाईल मागवून घ्यावी. त्यांना किती दिवसाचा कार्यकाल आहे, किती दिवस चौकशीसाठी ठेवणार आहेत. २० तारखेच्या जी.बी.मध्ये याचे उत्तर पाहिजे. उदयान विभागावर चर्चा केलेली आहे त्या संदर्भात साळूंके यांनी पत्र काढलेले आहे त्या पत्रात असा उल्लेख केलेला आहे की जेवढी जेवढी उदयान आहेत ते जे उदयान चालवितात ज्यांच्या अंडर ते उदयान आहेत समजा, कॉन्ट्रॅक्टरच्या किंवा अधिका-यांच्या किंवा कर्मच-यांच्या ताब्यात ती उदयान असतील त्याठिकाणी कुठलाही ऍक्सीडेंट झाला, नुकसान झाले, दुर्घटना घडली असेलतर यास सर्वस्वी जबाबदार तुम्ही राहाल असे पत्र काढलेले आहे. असे लिहून घेण्याचे अधिकार आहेत का**?** आणि मग त्या कर्मचा-याची किंवा अधिका-याची जर जबाबदारी असेलतर मग डॉ.साळूंके या पदावर ठेवण्यास पात्र आहेत का**?** नसेलतर दुसरे काम दयावे. २० तारखेच्या

जीबी मध्ये खुलासा करावा. या दोन तीन विषयाची चौकशी करावी यात कोणाचाही दबाव नाही पाहिजे. याची निपक्षपाती चौकशी होवून योग्य तो निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सदस्य, पत्रकार, अधिकारी वर्ग. य विषयावर खुप वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे आणि त्यातून निष्पन्न काहीही झालेले नाही. हा दोन अधिका-याचा वाद असेल, प्रमोशन बद्दलचा असेल, कोणता राईटस् मागताना असेल, या ऊहापोहा नंतर एक सुप्रिम ऑथोरेटी म्हणजे आयुक्त तुम्ही आहात, एक प्रशासकीय प्रमुख म्हणून तुम्ही आहात येथे अधिका-यांचे पन्नास गट आहेत, नगरसेवकांचे पन्नास गट आहेत. त्यात एकाला एक पाठीशी घालतं दुसरा म्हणतो तो कस काय मागतो ही चर्चा अपण ऐकलेली आहे. आता आमच्या भगिनीने सांगीतले की ते पद नाही मिळाल म्हणजे काही आयुष्यच नाही मिळाल का. ठिक आहे त्यांचा तो अधिकार आहे दोन्ही अधिका-याच्या बाजून बोलणार नाहीत. हे राज्य सामाजीक न्यायाचे राज्य आहे. आपण आपल्याला कायदयाच्या चौकटीत बसून न्याय करायचा, निर्णय घ्यायचा आहे. महत्वाची गोष्ट अशी आहे की हे राज्य ज्यावेळेला डायरेक्ट प्रिन्सपल फंण्डामेंटल राईटस् सांगत त्यावेळेला एकमेकानी एकमेकाच्या अधिकारावर गदा येता कामा  नये म्हणून संविधानानं डायरेक्टीव्ह प्रिन्सीपल्स दिलेले आहेत आणि फण्डामेंटल राईटस्  दिलेले अहेत  कलम १२ ते ३२ हे अतिशय महत्वाची कलम आहेत. ते या दोन्हीचा प्रशासनामध्ये कोणाला उपयोग करायचा. जगाने आमच्या संसदेतल्या आणि संविधानातल्या १२ ते ३२ कलमाचा कायदा केला आणि तो राज्यकारभार हयूमन राईटस् करत आहेत आणि आमच्याच संविधानानं तुम्हांला शासकीय प्रमुख म्हणून हे कायदे करत असताना कारभार निःपक्षपातीपणे करता का येत नाही. त्याचबरोबर दबलेल्या लहान माणसाच्या उत्कर्षासाठी एससी आणि एसटी कमीशन नेमलं. त्या कमीशनला  कॅबीनेट गॅझेटेड दर्जा आहे. त्या कमीशनन या तुम्ही घेतलेल्या निर्णयावर, महापालिका म्हणजे आयुक्त नाहीत, महापालिका म्हणजे नगरसेवक नाहीत. महापालिका म्हणजे हे सभागृह आहे सर्वोच्च या सभेला अधिकार आहेत, ही महानगरपालिका आहे. या महानगरपालिकेनी त्या सर्वोच्च सभेनी घेतलेला निर्णय, म्हणजे या महानगरपालिकेनी घेतलेला निर्णय आहे फक्त तुम्ही प्रशासकीय म्हणून काम करायचे आहे आणि म्हणून या दोन्ही अधिका-यांच्या वादात आपल्याला न पडता, न्यायाची बाजू काय आहे एससी/एसटी कमिशनने काय सांगीतले आहे. उत्तर काय काहीही देता येत पण याला कॉन्स्टीटयुशनल व्हॅलीडीटी आहे. एससी आणि एसटी कमीशनने जेंव्हा एखादया न्यायीक भूमीकेसाठी एखादया अधिका-यावर गदा येत असेलतर, यात काय डिग्री आणि डिप्लोमा आहे म्हणून डीपीएच करण गरजेच आहे आणि पुढे मग सिनॅरीटीच कोणी नाहीयं. आमचे  सहकारी एका अधिका-यावर आरोप करताना दिसले, आणि मागच्याही जनरल बॉडीत ते झालेल होतं. हे का तुम्हांला दिसत नाही, का तुम्ही त्या किरण गायकवाडावर आतापर्यंत इन्क्वॉयरी कमिटी नेमलेली नाही. आत्महात्या कोणी एकाने केलेली आहे. आता मे. सुप्रिम कोर्टाने आत्महत्येस करणीभूत असणा-या गुन्हयाबाबत सांगीतलेल आहे. एक आमचा अधिकारी ज्यावेळेला जनसंपर्क विभागात कामाला होता त्याच्यावर आणखी इन्क्वॉयरी नेमली गेलेली नाही. का त्याच्यावर निर्णय घेतला गेलेला नाही. हे सर्व आण्णासाहेब मगरांच्या काळात भरती झालेले अधिकारी आहेत. तुम्ही जरी वरिष्ठ असाल, प्रशासकीय प्रमुख असालतर

आम्हांला नगरसेवकांना बघता बघता दोन वर्षे निघुन गेलेली आहेत तरी यांनी काही कामे केलेली नाहीत. अशा पध्दतीची दंडशाही या प्रशासनामध्ये आहे. हे मोडून काढणं तीतकच फारतर तुमच्यासमोर आवाहन आहे. पण आजच्या काळात त्यावर शिस्त लागत होती असा माझा दावा आहे. आणि म्हणून या निर्णयामध्ये आपल्याला कठोर पाऊले टाकण्याची गरज आहे. अनधिकृत बांधकामामध्ये एखादया शिक्षकांस निलंबीत करतातर डॉ.रॉय यांना कशासाठी ठेवता. सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो, आम्ही सभागृहाचे सदस्य आहोत, या सभेत बसतो, आणि या सभेत बसलो असल्यामुळे आम्ही ट्रस्टीतर आहोतच पण आमची बदनामी एक प्रशासकीय अधिकारी करतोय हा कयदयाच्या दृष्टीने गुन्हा आहे. त्याच कलम आहे आयटी ऍक्ट ६६ (१) हा दखलपात्र गुन्हा आहे. खरं म्हणजे यांच्यावर फौजदारी कारवाई होऊ शकते का केली गेलेली नाही. प्रशासनाच्या त्यावेळेला लक्षात यायल पाहिजे होतं, त्यावेळेला दिसलेल होत. डॉ.साळवेंची बाजू घेतो अशातला भाग नाही पण ठीक आहे त्यांनी कमिट केलेल आहे एससी/एसटी कमिशनला, मला प्रशासनावरती दोष आहे की, एससी/एसटी कमीशनने आपल्याला खुलासा मागवावा आणि आपण त्यांना तशा पध्दतीची पुरक माहिती देवू नये. आमचे ज्येष्ठ नगरसेवक विशिष्ठ मशनरीसाठी बोलले. या सर्व गोष्टी पारदर्शकता सभागृहासमोर येणे गरजेच आहे हा जनतेचा पैसा आहे. जनतेच्या करातून आलेला पैसा आहे. शासनाच्या येणा-या योजना कार्यान्वित करत असताना लोकप्रतिनिधीना विश्वासात घ्यावे पण ते होत नाही. पण या सर्व गोष्टीचा विचार करुन निर्णय घ्यावा. ही सभा या शहराचे सर्वोच्चस्थान आहे. आपल्याला या शहराचा विकास करायचा आहे, एक्सपेन्डीचर डेव्हलप करायचा आहे आपल्याला. या दोन्ही अधिका-यांच्या वादात अनेक वर्ष आपण आपला वेळ का वाया घालवता. आम्ही कोणाच्याही बाजूने नाहीत पण जी न्यायाची बाजू आहे त्याप्रमाणे आपण करावे. प्रशासकीय अधिकारी म्हणून सभागृह तुमच्या बरोबर राहील. ज्या ज्यावेळेस तुम्ही न्यायाची बाजू घ्याल मग ते प्रशासनामधील, आमच्यामधील कोणी चुकलेल असेलतर तुम्हाला उत्तर दयायला लागेल आणि ही सभा तुमच्या बरोबर कायम विकासाच्या बरोबर राहील याबाबतीत निर्णय घ्यावा लागेल तो घ्यावा अशी विनंती करतो आणि थांबतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, सन्मा.अयुक्त, सन्मा.सभागृह आणि पत्रकार मित्र. बरेचसे सदस्यांनी या विषयावर मनोगत व्यक्त केलेल आहे. हा विषय ब-याच वर्षापासून गाजत आसलेला विषय आहे. वर्तमानपत्रामध्ये नेहमीच या विषयावर हायलाईट होत. आणि शहराचा बाकीचा विषय असाच राहून जातो. पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठमोठे विषय आहेत ब-याचशा विषयावर चर्चा करणे गरजेच असते परंतु त्या विषयावर फाटा फोडतो या दोन व्यक्तिवर महापालिका केंद्रित झालेली आहे असे वाटते. याठिकाणी बोलत असताना मी सांगीतलेल आहे की शहराच्या डेव्हलपमेंट संदर्भात आवाज उठविला पाहिजे. जी.बी. तहकूब होत चाललेली आहे आणि अधिका-यावर चर्चा होत असते. मग तो फायरचा विषय असू दयात, कर्मचा-याचा असू दयात, प्रमोशनचा असू दयात. कुठल्या विषयाला महत्व दयायला पाहिजे हे सभागृहाने ठरविले पाहिजे. या विषयाचा मागच्या वेळेस सभागृहाला खुलासा केलेला आहे. सभागृहासमोर विषय आल्यावर आम्ही शहनिशा करतो परंतु शासनाला पाठवत असताना चुकीचे पाठवितात का**?** कदाचित डॉ.रॉय यांना दिलेले प्रमोशन चुकीचे असेल, मग तुम्ही

केलेली सही, डॉ.श्रीकर परदेशी यांनी केलेली सही चुकीचे आहे का**?** सभागृह, आम्ही चुकतो, तुम्ही चुकता का, त्यांनी केलेल डॉक्युमेंट चुकतयं. सिमाताई सावळे यांनी सांगीतले कोण चोर आहे कोण काय आहे यापेक्षा तुम्हीच क्लॅरीफिकेशन दयायला पाहिजे. कोणी डीपीएच केले, कोणी एमबीबीएस केले, कोणी डी.वाय.पाटिलमध्ये केले, कोणी पगार घेतला. कोणाची बदली असेलतरी मी प्रशासनाकडे येवून चक्रा मारुन मारुन थकतो तरी ते काम होत नाही. मग हे काम तुम्ही सहजासहजी करता का. मी आरोग्य खात्यात रिटायर्ड झालेल्या माणसाच्या जागेवर अनुकंपा तत्वावर घेण्यासाठी पाठपुरावा करतो. पण प्रशासन एक एक पेपर पाहिजे म्हणून कितीतरी दिवस ढकलतयं. मग तुम्ही एवढ मोठ प्रमोशन**,** शहराच्या मेडीकल ऑफिसरच या प्रकरणामध्ये तुम्ही डोळे झाकून सही केली का किंवा श्रीकर परदेशी साहेबांनी जो खुलासा केला, या सभागृहामध्ये ब-याचशा वेळेला चर्चा पण केली शेवटी निर्णय तुम्ही घेतलेला आहे हे चुकीचे आहे का हे किती दिवस चालणार. सभागृहामध्ये मोठमोठे प्रकल्प आहेत, मोठमोठे प्रश्न आहेत. आमच्यासारख्याचे झोपडपट्टीच्या संदर्भात एवढे विषय आहेत त्याठिकाणी मी विनंती केली, व्हिजीट मारली सगळ केलं. पण अधिका-याकडन ठप्प कारभार आहे तुम्ही त्याठिकाणी येवून पण अजीबात डेव्हलपमेंट होत नाही. आम्ही रोज सकाळी उठून फोन करुन, त्यांच्या हातापाया पडून सुध्दा डेव्हलपमेंट होत नाही कारण टेक्निकल अडचण, स्वत:चे प्रॉब्लेम स्वत:च बोलत असतात. मग प्रमोशन हा कुठला विषय आहे. मेडीकल ऑफीसरचा विषय हा शहराचा सेन्टीमेन्टलचा विषय याठिकाणी गोरगरीब, सर्व नागरीक आशेने बघत असतात की आमच्या लोकांच्या काही अडीअडचणी वायसीएममध्ये सुटतील. कारण प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये एवढी दमछाक आणि एवढे डॉक्टर्स त्याठिकाणी आहेत त्या वायसीएमकडे गोरगरीब खुप आशेने बघतात मग अशाठिकाणी एखादा मेडीकल ऑफीसर तुम्ही नेमताना तुम्ही चुकीचे नेमता का कोण डीपीएच कधी झाला आहे, कोण सिनीअर आहे याचा एकदाचा खुलासा करा, तुकडा पाडा. एकतर जनरल बॉडी होत नाही आणि झालीतर याच्यावरच दोन तास चर्चा चालते. हे कुठेतरी थांबल पाहिजे नां. या वायसीएम हॉस्पिटलमध्ये आर.एस.कुमार यांनी सांगीतले दर वर्षी त्याठिकाणी मोठया प्रमाणात खरेदी होते पण कितीतरी मशीन्स त्याठिकाणी धुळखात पडलेल्या आहेत. आतापण स्कॅनिंग बंद आहे, एमआरआय बंद आहे. आपण करोडो रुपयाच्या मशनरी घेतो त्याठिकाणी त्याची सर्व्हिसींग म्हणा या सर्व गोष्टी कोण करणार. वायसीएम हॉस्पिटलच्या संदर्भात खुप चर्चेचा शहरात विषय आहे आणि वर्तमानपत्रामध्ये सुध्दा नेहमी या गोष्टीवर चर्चा होत असते. आजच कुठल्यातरी वर्तमानपत्रामध्ये कलर डॉपलरच्या आडीच कोटीचा विषय आलेला आहे. मला माहित नाही तो कितपत योग्य आहे, ते ऑपरेटींग करायला माणस आहेत का नाहीत, ते गरजेचे आहे का नाही, आपल्याला ते ऑपरेट होईल का नाही, आपल्या शहराला फायदा होईल का नाही याच्या खोलात मला जायचे नाही. लोखंडे साहेबांनी चांगला मुद्दा मांडलेला आहे. शहरात एवढे विषय असताना या दोघांवरच चाललेल आहे. आम्हांला कोणीही असू दयात, डॉ.रॉय असू दयात किंवा डॉ.साळवे असू दयात आम्हांला काही फरक पडणार नाही. आम्हांला आमचे काम करायचे आहे. त्याठिकाणी गोरगरीबांची ट्रिटमेंट होणार आहे. पण दर दोन-तीन महिन्याला कोणीतरी प्रश्न विचारायचे, याच्यावर दोन तास चर्चा करायची, परत मी प्रश्न विचारणार अमुक अमुक आहे का मग त्यावर चर्चा होणार याठिकाणी तुम्ही एकदा खुलासा करावा. एकतर तुम्ही हे चुकीचे आहे हे जाहीर करावे किंवा

श्रीकर परदेशी साहेबांनी एक तास याठिकाणी सांगीतले, माहिती दिली ते तरी चुकीचे आहे असे जाहीर करा. याचा जो काय आहे तो आज सोक्षमोक्ष लागला पाहिजे. रोज रोज याठिकाणी चर्चा करुन उपयोग होणार नाही. जो निर्णय घ्यायचा आहे तो घ्या पण कुठतरी या विषयाला थांबवावे आणि शहराच्या विषयाचा याठिकाणी विचार करायला पाहिजे असे सांगतो आणि थांबतो.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.सभागृह, आयुक्त साहेब, पत्रकार बंधु. याठिकाणी एक तास झाले चर्चा करतो, ही चर्चा वारंवार, वारंवार का रिपीट होते याचा शोध आयुक्त साहेब तुम्ही लावला पाहिजे. माझ्या स्वत: समोर महानगरपालिकेच्या प्रश्नोत्तराचा एक बंच आहे. डॉ. रॉय यांच्या क्लॅरीफिकेशनचा एक बंच आहे व डॉ.साळवे यांच्या क्लॅरीफिकेशनचा एक बंच आहे. सभागृहाची सगळयांची काही वेगळी परिस्थिती नाही यामध्ये संविधानाने आम्हांला हाक्क प्राप्त करुन दिलेले आहेत की या सभागृहात निवडून आल्यानंतर, म्हणजे आमच शिक्षण काही जास्त नाही म्हणा. पण त्यांनाही अधिकार दिला आहे की एमबीबीएस, डीपीएच वरती आपण वकृत्व करु शकतो, त्यांच्या लायबिलीटीवरती आम्ही बोलू शकतो. अशा प्रकारचा हक्क आम्हांला नागरीकांच्या माध्यमातून मिळालेला आहे. आम्हांला जे ज्ञान मिळतय ते बाहेरुन मिळतय आणि त्याच्यामागचे प्रत्येकाच्या मनातील हेतू हे आम्हांला सांगता येणार नाहीत पण त्यातून जी पुढची परिस्थिती निर्माण होणार आहे आमच्यामध्ये आपआपसांत वाद होणार आहेत. मी मागे सुध्दा आपल्याला सांगीतल होत की, डॉ.नागकुमार हे आता या जगात नाहीत. त्यांचा आणि डॉ. अय्यर यांचा या एमओएचच्या पोस्टसाठी अनेक वर्षापासून वाद चालू होता. कोर्टात एकमेकांच्या समोर थांबायचे आणि येताना हे एकाच गाडीत बसून यायचे. डॉ.नागकुमार स्वर्गवासी झाले डॉ.अय्यरांनी मनसोक्त श्रध्दांजली व्यक्त केली. म्हणजे सगळया आठवणींना उजाळा दिला. आम्ही मित्र होतो, आम्ही हे होतो, म्हणजे त्यावेळेस जे नगरसेवक होते ते त्यांच्याशी वाईट झाले ती गोष्ट वेगळीच आणि त्याचप्रकारचा पायंडा पुन्हा याठिकाणी येतोय. आता †›व्होकेट साहेबांनी सांगीतले त्यामध्ये अर्हता कोण प्राप्त करतय, कोण चुकीच करतयं. भदाणे मॅडम सुध्दा आपल्याकडे पगार न घेता दोन चार्जवरती काम करत होत्या. डॉ.अय्यर आणि डॉ.नागकुमार यांनी सुध्दा महापालिकेत असताना या पदव्या प्राप्त केलेल्या आहेत. मग एकतर आपण व्यक्ति बघुन नियमावली ठरवतोय किंवा तुम्ही निर्णय घेण्यास सक्षम नाहीत. डॉ.श्रीकर परदेशी यांचेशी सुध्दा या विषयावरती बरीचशी चर्चा झाली. त्यांनीही सांगायच ठरवलं. खरंतर ही सुपर क्लासवनची पोस्ट आहे आणि कळत न कळत त्याला आमच्याकडून जातीयवादाचा रंग लावायच चाललय. हे अत्यंत चुकीचे आहे. याच्यामुळे समाजाच्या भावना दुखावतात, नगरसेवकांच्या भावना दुखावतात, जे लोक पेपर वाचतील त्यांच्या सुध्दा भावना दुखावतात याचा सोक्षमोक्ष आज तुम्ही लावलाच पाहिजे. तुम्ही अजीबात काळजी करु नका, कोर्टात जातील, पुढ काहीही होईल. नाहीतरी निम्मं प्रशासन आपल एकमेकांच्या बदलीच्या संदर्भात कोर्टामध्ये आता आहे. पुढच्या जीबीला डिप्लोमा, डिग्रीचे प्रश्न आहेतच. पदोन्नतीचे विषय आपले नाहीत. तुम्ही निर्णय घेणार आहात. आता आमचे सहकारी ज्येष्ठ नगरसेवक दत्ता साने यांनी सुध्दा काही विषय मांडले. याठिकाणी वैयक्तिक विषय नाही. अनधिकृत बांधकाम विषयामध्ये पुर्ण शहरभर कारवाई झाली. ती होताना आमचे काही

नगरसेवकही अनधिकृत बांधकामाच्या केसमध्ये आहेत. दुर्दैवाने दत्ता साने यांच्यावर सुध्दा अनधिकृत बांधकामाची केस आहे. दत्ता साने हे सुध्दा पहिल्यांदा नागरीक आहेत नंतर ते नगरसेवक आहेत. डॉ. रॉय पहिल्यांदा नागरीक आहेत नंतर डॉक्टर आहेत. शिक्षक पहिला नागरीक आहे नंतर शिक्षक आहे. त्यामुळे महापालिकेचे जे नियम बनतात ते सगळयांना ईक्वल असायला पाहिजेत याबाबत माझ्या मनात काही शंका नाही. फौजदारी गुन्हे सगळयांवरती झाले. शिक्षकावर का कारवाई झाली कारण त्यांनी बांधकाम काढून घेतले नाही. डॉ.रॉय यांनी स्वत:च बांधकाम काढून घेतल त्यामुळे त्यांच्यावर पुढची कारवाई थांबली असं म्हणलतरी काही चुकीच नाही. आमचे कोणी नातेवाईक नाही, जातीचं नाही, गोत्याचं नाही. परंतु सभागृहाचा वेळ आणि सभागृहाच्या लोकांची कार्यक्षमता तपासून घेण्यासाठी या सगळया गोष्टी चाललेल्या आहेत. त्यामुळे साहेब आपण यामध्ये वेळ न घालविता लवकरात लवकर याचा सोक्षमोक्ष लावला पाहिजे. डॉ. साळवे यांना वाटतय त्यांच्यावर अन्याय झालेला आहे कारण ते या पोस्टसाठी पुर्वीपासून स्वप्न बघत होते म्हणजे त्यांनी त्या पध्दतीने काम केली आहेत. डॉ. नागकुमार यांचे चेले म्हणून त्यांची ओळख या जून्या नगरसवेकांना निश्चितपणे आहे. त्यामुळे ते कुठेही कागदोपत्री स्वत मागे हाटणार नाहीत. परंतु डॉ.रॉय यांचा स्वभाव असा आहे ते बोलत नाहीत आणि ते त्यांची बाजू त्यांच्या बाजूने मांडतात पण प्रमोशन हे आम्ही नगरसेवकांनी नाही दिलं तुमची समिती आहे त्या समितीनं दिलेल आहे. मग तुम्ही आमच्यामध्ये का वाद लावताय. या इक्वीव्हॅलंट पोस्ट आहेत. मी मागच्यावेळेस सुध्दा म्हणाले या दोघानाही दया. पे-स्केलचा विषय असेलतर ते एकत्रीत ठेवा यात तुम्ही काहीतरी मार्ग काढावा आणि आजच्या आज हा विषय मार्गी लागला पाहिजे. वैयक्तिक आरोप करणं चुकीच ठरत. आमचा कोणाचाही, सभागृहाचा वेळ आणि वापर याठिकाणी होता कामा नये. मा.महापौर साहेब, तुम्ही याठिकाणी आयुक्तांना अशाप्रकारचे आदेश दया की या केसमध्ये प्रमोशन जे काही योग्य आहे ते दया. चुकीच झालेतर कोर्टात जो सही करतो तो आणि सभागृह लटकते पण यामध्ये एक लाईन टाकावी की सभागृहाचा याच्यामध्ये कुठलाही संबंध नाही जी कायदेशीर कारवाई होणार आहे त्यामध्ये सर्वस्वी प्रशासन जबाबदार आहे यात सभागृहाचा कुठेही उल्लेख येणार नाही, धन्यवाद.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.सभागृह, मा.आयुक्त. खरंतर २० लाख लोकसंख्येच्या या शहरामध्ये आपण दोघांसाठी भांडतोय ही सुध्दा आपल्यासाठी शरमेची गोष्ट आहे. कारण की आम्ही याठिकाणी ज्यावेळेस झगडून, भांडून लोकांचे काम करुन विश्वस्त म्हणून सभागृहात निवडून येतो ते अधिकाऱ्यांसाठी निवडून येत नाहीत. डॉ.श्रीकर परदेशी आयुक्त म्हणून याठिकाणी होते. डॉ.श्रीकर परदेशींनी शासनाला आणि त्या कमीटीला जे एससी/एसटी कमीशन आहे त्या कमीशनला पत्रव्यवहार केलेला आहे तो संचय याठिकाणी प्राप्त झालेला आहे. यातून प्रशासनाची काय भूमिका आहे हे समजलेले नाही. या दोघांच्या भांडणापेक्षा यांना वायसीएमला जाऊ दयावे. त्यांना रेग्यूलर प्रॅक्टीस करु दयात. त्यांना खाजगी प्रॅक्टीसची मुभा आहे ती सुध्दा करु दयात. आपल्या येथे शासनाचे अधिकारी घेवून या. आम्ही त्यांचे भांडण सोडविण्यासाठी याठिकाणी आलेलो नाहीत. या सभागृहात १२८ जण निवडून आलेलो आहोत. प्रशासनाने शंभर टक्के चुकीचे काम करु नये. त्यांच्यावर आमचा अंकुश असला पाहिजे हे

सगळजरी एका बाजूला मान्य असलतरी दुस-या बाजूला प्रशासक म्हणून आज रोजी हे ऐकण्याची वेळ आहे का. तुम्हांला वेगवेगळे शंभर प्रकारचे शंभर प्रश्न प्रशासन म्हणून सोडवायचे आहेत. प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये तुम्ही गेलात. आजपर्यंत कुठल्याही एवढया प्रश्नान भेडसावून सोडल नसेल हा प्रश्न तुम्हांला तसा वाटत असेल. दोन अधिका-याची इतकी मोठी अडचण तुम्हांला आज जाणवली. आम्ही तुम्हांलाच सांगणार आहेत ही ऍथोरेटी तुम्ही आहेत. वकील साहेबांनी सांगीतले प्रशासक म्हणून तुम्हांला कायदयाने काही अधिकार आहेत ते तुम्ही वापरा. आम्हाला बदली करायची म्हणलेतर चारवेळा विचारावे लागते. हे एवढे उच्च शिक्षीत अधिकारी आहेत एमबीबीएस झालेले अधिकारी आहेत एमबीबीएस झाल्यानंतर ते डीपीएच करतात का कोणी मास्टर करतात तो त्यांचा प्रश्न आहे. ते झाल्यानंतर कोण नियमात बसते कोण नाही याची शहनिशा आयुक्तांनी केली पाहिजे. आता त्यांना पदभार दिलेला आहे पदभार दिल्यानंतर सुध्दा अशाप्रकारचे प्रश्न आम्हांला भेडसावत असतील, आम्हांला सुटत नसतीलतर आपला काही उपयोग नाही. आपल्याला अंदाजपत्रकाला सामोरे जावे लागेल, एलबीटी बंद झाल्यानंतर आपल शहर भीकेला लागेल, महानगरपालिका भीकेला लागेल अशी परिस्थिती होताना या दोघांच्यावरती काय अवलंबून आहे. येथे कोणीजरी जगातला साधा डॉक्टर आणून बसविलानां आम्ही नगरसेवक म्हणून त्यांना तेच काम सांगणार की हा माझ्या वॉर्डा मधला पेशंट आहे, बील कमी करा, कुठ मदत करता येईल का याच्या व्यतिरीक्त आम्ही काही काम सांगत नाहीत. ९० टक्के नगरसेवक हेच काम सांगतात. जे दोन दोन, तीन तीन टर्म येथे आम्ही लोक आहोत त्यांनाच फक्त काही लोक प्रशासकीय प्रॉब्लेम सांगतात. पुर्ण वैदयकीय सेवेमध्ये प्रॉब्लेम असतीलतर ते सॉल्व्ह करण्याचा आमच्या सारख्यांकडून प्रयत्न केला जातो. हे सर्व असताना हे दोघानी सारखच उठायचं आणि यांच्याकडे जाऊन माहिती देत बसं, त्यांच्याकडे जाऊन माहिती देत बसं हे कशासाठी करायचं. आम्ही कोणाच्याही बाजून नाहीत. आयुक्त म्हणून तुमचा खमक्या निर्णय आला पाहिजे याच व्यक्तिला प्रमोशन दयायचे त्याला आम्ही मान्यता देवून टाकतो. माझी विनंती आहे की कुठल्याही परिस्थितीत या पदाकरिता, राजकारणाचा किंवा आमच्या राजकीय व्यक्तिचा वापर करु नका. तुम्हांला प्रशासकीय निर्णय जो योग्य वाटतो तो घ्यावा. माझतर स्पष्ट मत आहे की आपण शासनाकडे वारंवार मागणी केलेली आहे, शासनाचे अधिकारी आलेतर या दोघांचेही भांडण मिटणार आहे. डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण, डेप्युटी डायरेक्टर यांच्या नावासह विषय डॉ.श्रीकर परदेशी यांनी शासनाला कळवलं होता. त्यांना मी सुध्दा भेटलो होतो पण ते म्हणाले माझे दोन वर्षे राहीले आहेत त्यात दोन-तीन महिने मला महापालिका समजण्यासाठी लागतील म्हणून त्यांनी शासनाला कळवले आहे की मला हा पदभार देवू नये म्हणून. त्यांच्या जागी दुसरं बघा. उपसंचालक लेव्हलवरचीच लोक आपल्याला लागतील. आपल्याकडे शासकीय अधिकारी सहा.आयुक्त बोलवतो त्याप्रमाणे हे सुध्दा पद भरावे म्हणजे या दोघांचेही भांडणे मिटतील. वास्तविक पाहता डॉ.साळवे यांचा पगार डॉ.रॉय यांच्यापेक्षाही जास्त आहे परंतु ते पगारावर समाधानी नाहीत, त्यांना पद पाहिजे. आपआपसात वाद करुन या शहराचे नुकसान करण्यापेक्षा हा वाद आयुक्त म्हणून आपण शंभर टक्के मिटवू शकता, तरी आपल्याला ठामपणे निर्णय घेतला पाहिजे. जो तुम्ही कागदावर निर्णय घ्याल तो आम्हांला याठिकाणी मान्य राहील. पण आपल्याकडन ठाम निर्णय आला पाहिजे. यासाठी या विषयावर फार वेळ न घेता २० लाखाच्या शहरात दोघांसाठी आपण भांडणं

योग्य नाही. प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकांनाही तेच वाटल की हा विषय तातडीने मार्गी लावावा. मा.महापौरांनी त्याप्रमाणे सांगावे की अशाप्रकारचे अधिका-यांचे विषय सभागृहासमोर आले नाही पाहिजे. हा विषय शंभर टक्के प्रशासनाचा आहे नागरीकांशी काहीही संबंध नाही. अशाप्रकारचे विषय सभागृहासमोर येवू नयेत हा आलेला आहेतर आपण निकाली काढावा अशाप्रकारचे आदेश आपण प्रशासनाला दयावेत आणि हा विषय मार्गी लावावा.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सर्व नगरसेवक, नगरसेविका पत्रकार मित्र. सर्व प्रथम सभागृहाच्या वतीने आयुक्तांचे मी अभिनंदन करतो आपल अभिनंदन याकरिता करतो की तुम्हांला याठिकाणी जॉईन होवून बरोबर एक वर्षे झालेले आहे. १० फेब्रूवारी २०१४ ला आपण चार्ज घेतलेला आहे आणि आज बरोबर १० फेब्रूवारीला ही सर्वसाधारण सभा होत आहे. या विषयावर बोलत असताना अनेकांनी आपले मत प्रकट केले. मत प्रकट करत असताना कोणी आनंदाने बोलले नाही, सर्वच दु:खानेच बोलले आहेत. त्याच कारण असं आहे की, प्रशासन हे अकार्यक्षम आहे म्हणून. या सभागृहाने, प्रशासनाने पारीत केलेला निर्णय, डिपार्टमंटली प्रमोशन कमिटी तुमची आहे, त्यावेळेस डॉ.श्रीकर परदेशी साहेबांनी निर्णय घेतला आहे आणि तुम्ही आता सन्मा.राजेंद्र जगताप यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सर्व काही रामायण दिल आहे त्या रामायणातला शेवटचा तुमचाच पॅरेग्रॉफ तुमच्या सहीने आम्हांला दिलेला आहे. दि.३१/५/२०१३ रोजी पदोन्नती समितीने सभा आयोजित केलेली होती. परंतु त्या समितीने डॉ.जगदाळे हे दिनांक ३१/५/२०१३ रोजी सेवानिवृत्त होत असल्याने तत्कालीन आयुक्त यांच्या सूचनेनुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद पदोन्नतीने भरणेकामी निर्णय घेणेत आला. दि.३१/५/२०१२ रोजी प्रसिध्द झालेल्या वैदयकीय अधिका-यांच्या सेवाजेष्ठता सूचीनुसार डॉ.अनिल रॉय हे सेवाजेष्ठ अधिकारी असल्याने त्यांनी आरोग्य वैदयकीय अधिकारी या पदांकरिता आवश्यक असणारी अर्हता धारण केल्याने पदोन्नती बाबत त्यांचा विचार करण्यात आला आहे. असे स्पष्ट तुम्ही उत्तर दिलेल आहे. आणि असा निर्णय एखादया आयुक्तांनी, तुमच्या पदोन्नती समितीने अधिकृतरीत्या घेतल्यानंतर त्या विषयावर या सभागृहामध्ये साधकबाधक चर्चा झाल्यानंतर, आरोप-प्रत्यारोप झाल्यानंतर तुम्हांला सुध्दा सभागृहाने ज्यावेळेला ५ जुलैच्या सभेमध्ये विचारले होते की तुमचे म्हणणे काय आहे. तुम्ही त्यावेळेस स्पष्ट सांगीतलेल आहे की प्रशासनामार्फत डॉ.रॉय यांचा विषय ठेवलेला आहे तो विषय बरोबर आहे आणि तो तुमच्या समोर आहे. हे मत त्यावेळेला तुम्ही प्रकट केलेल होतं. जीबीने या विषयाला मान्यता दिल्यानंतर ताबडतोब, तुम्हांला खुप काम असेलतर पंधरा दिवसानी, महिन्यानी, दिड महिन्यांनी ५ जुलैला सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर, आयुक्त साहेबांनी, प्रशासनाने प्रस्ताव ठेवल्यानंतर त्या विषयाला जी.बी.ने मान्यता दिल्यानंतर बीपीएमसी ॲक्टच्या ४५ (१) प्रमाणे तुम्ही त्याच्यावर निर्णय घेवून हे शासनाला पाठविणे क्रमप्राप्त होते ते तुम्ही का नाही केले. तुम्ही ऑफीसमध्ये फाईल ठेवून दिली. प्रशासनाने त्याची पण काळजी घेतली नाही. तुम्ही सभागृहाचा अपमान केला एखादया फाईलवर निर्णय न घेणं म्हणजे सभागृहाचा अपमान करणं आहे तुम्ही १२ जुलैला शासनाला पत्र लिहीताय. तुम्ही आमच्या सर्वांची दिशाभूल केली. महापालिका सभेने मान्यता दिल्यानंतर तुमच्या अधिकारात ४५ (१) प्रमाणे निर्णय घेणे अपेक्षीत होतं. तुम्ही त्यावेळेस शासनाला पत्र लिहीलं.

शासनाला पत्र लिहीताना कमीत कमी प्रशासनाला सांगून व्यवस्थित पत्र तरी लिहायला पाहिजे होते. त्या पत्रासोबत डीपीसीने हा निर्णय घेतलेला आहे, जी.बी.ने हा निर्णय घेतलेला आहे. डॉ.रॉय बद्दल असं आहे आणि डॉ.साळवे बद्दल असं आहे. उलट तुम्हांला शासनाने १४ जानेवारी २०१५ ला पत्र दिलेले आहे हे पत्र सभागृहाला कदाचित माहिती नसेल. डॉ.पवन साळवे यांच्या पदोन्नती बाबत- आयुक्तांना लिहीलेले पत्र आहे. २०१३ प्रकरण क्र.३९६/नवि-२२, नगरविकास मंत्रालयाच पत्र प्रशासनाला प्राप्त झालेल आहे. त्यामध्ये तुम्हांला त्यांनी स्पष्ट सांगीतलेले आहे की तुम्ही जी.बी.चा ठराव पाठविलेला नाही, तुम्ही घेतलेला निर्णय पाठविलेला नाही. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५ (१) अन्वये, आरोग्य वैदयकीय अधिकारी या पदावरील नेमणूकी बाबत महानगरपालिकेस प्रदान अधिकारान्वये यावर उचित निर्णय घेवून कलम ४५ (४) नुसार योग्य तो प्रस्ताव शासनाला पाठवावा. म्हणजे ४५ (१) अन्वये तुम्ही कारवाई करायला पाहिजे. जानेवारी २०१५ ला पत्र येवून सुध्दा फेब्रूवारी पर्यंत तुम्ही शासनाला प्रस्ताव पाठविलेला नाही. तुम्ही निर्णय का घेत नाहीत. आयुक्त साहेब यावर तुम्ही निर्णय घ्या, याचा तुकडा पाडा. आम्ही म्हणणार नाहीत की चुकीचा निर्णय घ्या. डॉ.श्रीकर परदेशी साहेबांनी घेतलेला निर्णय आमच्या समोर आला. याठिकाणी शिक्षक सस्पेन्डचा विषय आहे, तेजवाणी सस्पेन्डचा विषय आहे. अजूनही नऊ ते बारा आकडा असा असेल की डॉ. श्रीकर परदेशी यांनी जे सस्पेंशन केलेले आहे. त्यावर सुध्दा आपण अदयाप निर्णय घेतलेला नाही. महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे त्या संबंधीत सस्पेन्ड अधिका-यांना/कर्मचा-यांना तीन महिन्या नंतर महानगरपालिकेला त्याला घरी बसून ५० टक्के पगार दयावा लागतो. सहा महिने झाल्यानंतर ७५ टक्के पगार दयावा लागतो. आम्ही त्यांना ७५ टक्के पगार घरी बसून देतो आहोत. ही त्यांना शिक्षा नाहीतर बोनस आहे बोनस. तरी आपण निर्णय घ्यावा. त्यांना घरी बसुन ७५ टक्के पगार देणार मग त्यावर निर्णय का घेणार नाहीत. आपण घाबरुन निर्णय घ्यायचा नाही ही कोणती पध्दत आहे. चुक सगळयाकडंन होती, एखादा डॉक्टर असेल, एखादा शिक्षक असेल, एखादा कर्मचारी असेल चुकलंतर त्यांना कोर्ट आहेना एका गुन्हयामध्ये दोनदा तर शिक्षा होत नाही. तुम्ही त्यांना पहिली शिक्षा केली, दंड केला ठिक आहे, तीन महिने सस्पेन्ड केलं आता कामावर तरी घ्यायला पाहिजे. परंतु आपण निर्णय घेतला नाही. कपिलेनां कोर्टात जावं लागल. कोर्टातून निर्णय आला पण आपल्या प्रशासनाचा निर्णय होत नाही इतकं उत्तम प्रशासनाच काम चाललं आहे. एखादा माणुस कोर्टामध्ये गेलातर कोर्टाचा निर्णय येवू शकतो पण प्रशासन निर्णय घेत नाही ही कोणती पध्दत आहे. कोणाला घाबरायच आणि का घाबरायचं. आता उल्हास शेट्टीनी उल्लेख केला वायसीएम हॉस्पिटलमध्ये १२ बेड आयसीयू एक वर्षे झाले तयार आहे. आपण डॉक्टर भरत नाहीत, तो आयसीयू चालू करत नाहीत. आताच मला फोन आला की ३०१ नंबर मधील पेशंटला आयसीयू प्रोव्हाईड करु शकलो नाही तो आता दगावला. त्यात आपली काही चुक नाही, बेडच शिल्लक नाहीतर काय करणार. त्यांना सांगीतल होत तुम्ही पेशंट दुसरीकडे हालवा, त्यांनी हालवल नाही. माझे सांगायच तात्पर्य असं आहे की ज्या महत्वाच्या गोष्टी आहेत त्यात तरी निर्णय घ्या. मी तुम्हांला मागे एक पत्र दिलं, मी बत्तीस वर्ष नगरसेवक म्हणून निवडून येतो मी आजपर्यंत कधी पत्र दिलं नाही हे पहिलच पत्र तुम्हांला दिलं की एचबीओटी मशीनचा तुम्ही निर्णय घ्या, चालवा. त्याच्यामध्ये आपले पैसे गेलेले आहेत. मशीनतरी चालू करा. दुसरी गोष्ट म्हणजे डॉ.रॉय व डॉ.साळवे यांची डॉ.

श्रीकर परदेशी यांच्यावेळेसची फाईल चाळा. त्यामध्ये जी चुक झाली होती त्याबद्दलचा ऊहापोह याठिकाणी सीमाताई सावळेंनी केला की त्यांनी त्यावेळेंला याठिकाणी काम करत असताना डी.वाय.मध्ये लेक्चररशिप केली. त्यावेळेला चुकीचा कारभार त्यावेळेसच्या प्रशासनाने केलेला आहे. २०१२-१३ मध्ये डॉ.पवन साळवे हे मेडीकल प्रॅक्टीशनर म्हणून त्यांनी इंडियन मेडीकल कौन्सिलमध्ये नोंद करावी लागते किंवा महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलमध्ये. या दोन्ही ठिकाणी नोंद केली नाही. त्यावेळेला २०१२-१३ ला तेथे रजिस्ट्रेशन नसताना प्रॅक्टीस पण करु शकत नाहीत, आणि कायदा काय म्हणतो **he should be panelized.** त्यांना दंड केला पाहिजे. त्याच्या ऊपर तुम्ही २३/१०/२०१३ ला माहिती दिलेली आहे. **As a time when you are not registered as a Medical Practitioner**. **You are rewarded it.** आणि गॅझेट काय म्हणतं**,any person who condemned provision of suspention one shall on conviction will punish**. म्हणजे एखादा कन्व्हेन्ट व्हायला पाहिजे ते सोडल आणि त्यांना अतिरीक्त पदभार आपण दिला. म्हणजे ती चुक, ही चुक. हे सर्व असताना, प्रशासनाने स्वत: विषय मांडलेला असताना त्याला महासभेने मान्यता दिलेली असताना, शासनाने तुम्हांला पत्र दिलेल असताना तुम्ही निर्णय का घेत नाहीत. प्रमोशन कमिटीने निर्णय घेतला, सभागृहाने निर्णय घेतला तुम्ही निर्णय घ्या ज्याला जायचं तो कोर्टात जाईल, कोर्टाचे दरवाजे सर्वांना ओपन आहेत. निर्णय हा चुकीचा होवू शकतो, बरोबरही होऊ शकतोनां. एवढं सगळ असताना तुम्ही निर्णय घेत नाहीत. सगळयांनी याच्यावर निर्णय घ्यावा. तुम्हांला दहा टक्के वर्गचा निर्णय सांगीतला, डीसी रुलमध्ये क्लिअरकट प्रोव्हीजन आहे. आपल्या महापालिकेला जवळ-जवळ तीस ते पस्तीस कोटी रुपये येतील, धन्यवाद.

**मा.महापालिका आयुक्त** - सन्मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. श्री.रॉय आणि श्री.साळवे यांचे प्रकरण हे ब-याचशा दिवसापासून सुरु आहे. त्यामध्ये सुरवातीलाच मी सांगू इच्छितो की, यापुढे जे काही प्रमोशन्स होतील त्यामध्ये अशा काही त्रुटी राहणार नाहीत. त्यामध्ये कोणाचा वाद असेलतर तो प्रशासन आणि आमचे सर्व अधिकारी अतीशय काळजीपुर्वक बघतील. त्यामध्ये ज्या काही तक्रारी येतील त्यांचे म्हणणे ऐकूण घेवून जे नियमानुसार आहे त्याप्रमाणे होईल राज्यशासनाचे धोरण आहे त्या धोरणाप्रमाणे आपण चालतो. कारण ब-याच गोष्टीमध्ये आपले रिक्रूटमेंट रुल्स नाहीत. आपला आकृतीबंध मंजूर आहे परंतु काही पदाला मंजूरी नाही त्यामुळे शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे आपण जाव अशी अपेक्षा आहे आणि शासनाकडचे यापुढचे सर्व प्रस्ताव हे सन्मा.सभागृहासमोर येणार आहेत. कारण हा सभागृहाचाच अधिकार आहे हे अस्थापना अधिकारी म्हणून मी सभागृहाला सांगू इच्छितो. त्यामुळे यापुढे जे काही आमचे प्रस्ताव येतील ते पुर्ण छाननीअंती येतील, परत आपल्या सभागृहाचा वेळ घालवणार नाहीत असे योग्य प्रकारे सादर करण्यात येतील. यापुर्वीचे जे प्रकरण झालेले आहे त्याबद्दल सुध्दा माझी सभागृहास विनंती आहे की सध्या सभागृहाच्या हातात काय आहे आयुक्तांच्या हातात काय आहे, शासन काय करु शकतं याचाही सहानुभूतीन गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. मी स्पष्ट करु इच्छितो की मलाही हे दोन्ही अधिकारी, सर्व शहर नवीन असल्यामुळे हे दोन्ही अधिकारी नवीन आहेत. मी एक वर्षापुर्वी आलो त्यावेळेस या दोघांचीही माझी ओळख नव्हती. मी वैयक्तिकरीत्या कोणाच्याही बाबतीत पुर्वगृहदुषीत असं काही काम मागच्या वर्षात केल नाही

आणि पुढेही करणार नाही. मी सांगू इच्छितो की, पुर्वी सुध्दा या केसमध्ये काही काही गोष्टी झाल्या त्या मी थोडक्यात स्पष्ट करु इच्छितो. या केसमध्ये आता जगताप साहेब, कुमार साहेब, पठाणताई, सोनकांबळेताई, सिमाताई, साने काका, लोखंडे साहेब, उल्हास शेट्टी साहेब, उबाळे मॅडम बोलल्या, प्रशांत शितोळे बोलले शेवटी योगेश बहल साहेब बोलले या सर्वांच्या बोलण्याचा मतीतार्थ आहे की, हे भांडण मिटले पाहिजे आणि आपल्याला शहराच्या विकाससाठी वेळ घातला पाहिजे म्हणूनच मी आपला जास्त वेळ घेणार नाही. त्यामुळे मी सुध्दा थोडक्यात सांगणार आहे. मा.महापौर मॅडमनां विनंती आहे की, आता आपल्या हातात जे काही आहे ते जर आपण करत नसूतर मग आपल्याला प्रश्न विचारले पाहिजेत, आपल्याला उत्तर देता आले पाहिजे. परंतु काही गोष्टी होऊन गेल्या असतील आता काय करता येईल याचा विचार आपण सर्वानी मिळून केलातर योग्य राहील. या केसमध्ये मी रुजू होण्यापुर्वीच तत्कालीन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली डीपीसी झाली (डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटी) खरं म्हणजे या सभागृहाचा निर्णय असतोच ते अंतीम निर्णय ठरवतं प्रशासन यासाठी असतं की सभागृहाला कुठलीही निर्णय प्रक्रिया सोपी व्हावी, निर्णय घेताना काही अडचण येवू नये, त्यावर सादकबाधक चर्चा करुन सभागृहाने निर्णय घ्यावा अशी अपेक्षा असते. या केसमध्ये डीपीसीमध्ये जो काही निर्णय झाला तो तत्कालीन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली डीपीसीने घेतलेला आहे. तो निर्णय सभागृहापुढे आला आहे त्यामुळे मी आता या स्टेजला त्याच्या मिनीटसमध्ये जाउ इच्छित नाही आणि जर भविष्यात ते माझ्या समोर आणि आपल्यासमोर पण आले तर आपण त्यात नक्कीच सखोल विचार करुन पुढे जायला पाहिजे या मताचा मी आहे. त्यामुळे डीपीसी झाल्यानंतर त्यावेळेसचे रिक्रूटमेंट रुल प्रमाणे पात्रता होती ती डीपीसीने बघितली आहे असं सकृतदर्शनी दिसते. मी हेच सांगतो की डीपीसीच्या निर्णयाचा ऊहापोह, डीपीसीचा निर्णय योग्य होता का अयोग्य होता, डीपीसीन काय करण योग्य होत त्यामध्ये न जाता डीपीसीचा निर्णय जो झालेला आहे तो महासभेसमोर आलेला आहे. मा.महापालिका सभा ही अस्थापना अधिकारी आहे. आणि पर्टिक्यूलरली ही जी मोठी पदे आहेत यामध्ये महासभेची, शासनाची पण मान्यता लागते. कार्योत्तर मान्यता पण आपण घेवू शकतो. थोडक्यात हे पद महत्वाचे आहे आणि महापालिकेची मान्यता मिळाल्यानंतर त्यामध्ये शासनाला सुध्दा झालेला निर्णय योग्य आहे का अयोग्य आहे हे बघण्याचा अधिकार आहे. आणि म्हणून या केसमध्ये सुध्दा शासनाचा तो अधिकार अदयापही कायम आहे शासनाने तो अदयाप वापरलेला नाही. एकदा डीपीसीचा निर्णय झाला आणि महासभेसमोर तो आला आणि महासभेने तो मान्य केला की मग माझा हक्क तिथ संपतो, माझा अधिकार तिथ संपतो. मा.महासभेच्या मान्यतेपुर्वी डीपीसीचा निर्णय चुकीचा आहे, बरोबर आहे, त्याचा पुनर्विचार केला पाहिजे, ब-याच तक्रारी येतात, एससी/एसटी कमीशन कळवित आहे, शासनालापण या केसमध्ये विचारलेल आहे की डीपीएच आणि एमबीबीएस या दोन ज्या डिग्री आहेत हया इक्विव्हॅलंट आहेत का किंवा हे दोघंही या पदासाठी पात्र आहेत का आणि त्यानंतर आपण डायरेक्टर हेल्थ यांना या बद्दलची विचारना करण्यात आली. त्यानंतर डायरेक्टर, हेल्थने आपल्याला सांगीतल की एमबीबीएस ही डीपीएच पेक्षा उच्च डिग्री आहे. तरी दोघेही त्या पदासाठी पात्र होवू शकतात असं सकृतदर्शनी दिसतयं आणि तो अहवाल आम्ही शासनाला पाठविलेला आहे. मा.महासभेने पुर्वीचा डीपीसीचा निर्णय शिक्कमोर्तब केलेला असेल आणि आता आपण त्याच्या पुढची प्रक्रिया चालू केलेली

असेल, त्याच्या पुढचा प्रवास चालू केलेला असेलतर आयुक्त म्हणून मला इंडीव्हीज्यूअली काही अधिकार आहेत का आणि मी त्यामध्ये मा.महासभेच्या निर्णयानंतर सुध्दा कितपत बघु शकतो, जर एखादया निर्णयाबद्दल वाद असतील, तक्रारी असतील, बरेच निवेदन आलेले असतील आणि शेवटी हे प्रकरण शासनाकडे जाणारच असेलतर शासनाने त्यावर निर्णय घेण्याच्या ऐवजी परत आयुक्तांनी त्याच्यामध्ये काही पुढाकार घ्यायची आवश्यकता आहे का किंवा घेता येईल का, मी घेतलातरी कुठपर्यंत घेवू शकेल, मी घेतलातरी तुमच्या पुढेच येणार आहे कारण मला महासभेच्या पुढे जाता येईल असं काही वाटत नाही. आणि मी महासभेला डावलून कुठही काहीही काम करतोय असं मला वाटत नाही. त्यामुळे ही महासभा जर सर्वोच्च असेल, या महासभेने एखादा निर्णय घेतलेला असेल आणि आता बहल साहेबांनी सांगीतल त्यावर शिक्कामोर्तब झालेल आहे ही वस्तुस्थिती आहे. इनरेग्यूलर पोस्ट ४५ (१) प्रमाणे कार्योत्तर मंजूरीला हा प्रस्ताव नक्की पाठवू शकलो असतो. सर्व सभागृहाला मी सांगू इच्छितो की शासनाला तो प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यामुळे मा.महासभेचा निर्णय आम्ही शासनाला अवगत केलेला आहे. या तक्रारी तुमच्यापर्यंत माझ्यापर्यंत आलेल्या आहेत असे नाहीतर या शासनाकडे सुध्दा पोहचलेल्या आहेत. शासनस्तरावर सुध्दा याच ४५ (१) प्रमाणे कार्योत्तर मंजूरीचे पण का होईना त्यांचेकडे अधिकार असल्यामुळे शासनाने त्याच्यावर शिक्कामोर्तब करावे अशी अपेक्षा असल्यामुळे अनुसूचित जाती आयोग, महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, नवी दिल्ली, शासनाचा रेफरन्स, डॉ.साळवे यांचे पत्र, बाकी इतर पत्र, महासभेची चर्चा आणि वृत्तपत्रातल्या बातम्या हे सर्व बघीतल्यानंतर आयुक्त म्हणून मी माझा निर्णय घेतला की कॉम्प्लीकेटेड केस आहे मी काही पुर्वीच्या डीपीसीचं, मा.महासभेच्या निर्णयाचा अवमान करावा अशी अपेक्षा नाही. परंतु त्यात योग्य का अयोग्य हे बघण्याचा अधिकार आता फक्त शासनाला आहे. त्यामुळे शासनाचा निर्णय येईपर्यंत आपण थोड थांबल पाहिजे या मताचा मी होतो. आणि यामध्ये शासन स्तरावरच अंतीम निर्णय व्हावा अशी अपेक्षा आहे असं माझे मत आहे, पण शासनाकडे जरी हा प्रस्ताव गेलेला असलातरी ही महासभा ही सर्वोच्च आहे, महासभेला सगळयाच भलं बघायच आहे आणि महासभेन जर आणखी काही असा निर्णय घेतला की या प्रकरणाची पुढे तपासणी करावी, बरेच मार्ग निघणार आहेत. १. कोणालाही काही नको करायला शासनाकडून बोलवा. २. किंवा दोघांचही प्रमोशन करा. ३. दोघानाही पे-स्केल सारख दया. ४. काम वाटून दया असे भरपूर आपल्याकडे पर्याय आहेत. जसे पुर्वी डॉ.नागकुमार आणि डॉ.अय्यर यांच्या बाबतीत त्यावेळेस महासभेने विचारपुर्वक आणि सर्व सम्मतीन जसा निर्णय घेतला तसा आताही घेतलातर तुमचा आणि आमचाही वेळ वाचेल. आणि तुम्ही आमचा अवमान करता असाही प्रश्न उपस्थित होणार नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की आपण एकत्रीत बसून याच्यावर सभेच्या बाहेर आपल एकमत केले आणि त्यानंतर सभेत हा निर्णय घेतलातर मला विश्वास आहे की शासन सुध्दा आपल्या निर्णयाच्या विरोधात जाणार नाही. कारण ही लोकल सेल्फ गव्हर्मेंट आहे आणि हा निर्णय अंतीमत: शासनाकडे काही तक्रारी नसतीलतर ठप्पा मारणार आहे आणि तक्रारी असतीलतर ते बघतील म्हणून माझ्या हातात बरंच काही आहे असं वाटत नाही माझी सभागृहाला विनंती आहे की जास्त वेळ चर्चा करणं योग्य नाही. आपण हा विषय सर्वाना विश्वासात घेवून करण्याचा प्रयत्न करुयात. आपल्याला माहिती आहे की सर्वच अवघड प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन सदैव आपल्यासोबत आहे. आणि

हा सुध्दा अवघड प्रश्न किंवा नागरी प्रश्न कसा सोडवता येईल त्यासाठी सुध्दा प्रशासन सकारात्मक राहील. फक्त आता प्रशासनाच्या हातात तुर्त काही नाही असं माझ स्वत:च मत आहे. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की आपण ठरवाव त्याप्रमाणे आपल्याला शासनाकडे कन्व्हेन्स करण्यासाठी प्रयत्न करता येतील, धन्यवाद.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, आता आयुक्त साहेबांनी खुलासा केलेला आहे यामध्ये थोडक्यात वस्तुस्थिती काय आहे हे सांगतो आणि हा विषय संपवतो. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत गेली पंचवीस वर्षात बढत्या झालेल्या आहेत त्या बेकायदेशिर आणि नियमबाहय बढत्या केल्या त्याची चौकशी लावण्यात आलीतर अनेक अधिका-यांना त्यांनी घेतलेले फायदे आणि वेतनाची रक्कम महापालिकेला परत दयावी लागेल. काही लोकांच्या फायदयासाठी अनेक नगरसेवकांना अंधारात ठेवून बढत्याचे ठराव मंजूर करुन घेतलेले आहेत अशाप्रकारचे नियम धाब्यावर बसवून किती चुकीचे काम करणार आहेत, असा माझा प्रशासनाला सवाल आहे. उदाहरण दयायचे झालेतर डॉ.अनिल रॉय यांना आरोग्य वैदयकीय अधिकारी या पदावर बढती दिलेली आहे. ती बेकायदेशिर व कागदपत्राची हेराफेरी करुन बढती दिलेली आहे. या पदावर डॉ.पवन साळवे यांचा अधिकार असताना त्यांना डावलण्यात आलेले आहे. मागासवर्गीय आयोगाने या संदर्भात पत्र पाठवून डॉ.साळवे यांच्यावर जाणीवपुर्वक अन्याय केलेला आहे असे कळवले असताना सहा.आयुक्त, उदय टेकाळे यांनी हे पत्र लपवून ठेवलेले आहे. याची वाच्छता न केल्याने त्याचा अर्थ काय. आरोग्य वैदयकीय अधिकारी या पदाची डीपीएच ही अर्हता असताना, पाच वर्षाचा अनुभव पाहिजे असे निकष असताना त्यावेळेस डॉ.राजशेखर अय्यर यांना अपात्र ठरविल्यानंतर डॉ.रॉय यांना ३१/५/२०१३ रोजी डीपीएच ही परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे पत्र मिळालेले आहे. पाच वर्षाचा अनुभव पाहिजे असताना त्यांना ही बढती कशी दिली. डॉ.अय्यर अपात्र असतीलतर डॉ.रॉय पात्र कसे झाले याचा खुलासा प्रशासनाने करावा. कारण डॉ.अनिल रॉय यांचे शिक्षण पुर्ण होईपर्यंत जाणुनबूजून हे पद रिक्त ठेवलेले आहे. राज्यशासनाने अधिकार देता येणार नाही असे पालिकेला देखील कळवलेले आहे का? ३१/५/२०१३ रोजी डॉ.साळवे अतिरीक्त वैदयकीय अधिकारी या पदावर कार्यरत होते व डॉ.रॉय हे वर्ग-२ या पदावर कार्यरत होते त्यावेळेला डॉ.साळवे यांच्याकडे आरोग्य वैदयकीय अधिकारी पदाचा पदभार का दिलेला नाही. ३०/५/२०१२ रोजी सेवाजेष्ठता यादीमध्ये डॉ.पवन साळवे हे आरोग्य वैदयकीय अधिकारी या पदाची अर्हता धारण करणारे अधिकारी असताना त्यांचा बढतीसाठी विचार का केला नाही. डॉ.रॉय यांच्या नावापुढे ही अर्हता नव्हती याचे गौडबंगाल काय आहे. दिशाभूल करण्याचा प्रयत्न प्रशासन करत आहे. डॉ.रॉय यांनी ३०/५/२०१३ रोजी अर्हता धारण केली असताना २१/५/२०१२ रोजी प्रसिध्द केलेल्या सेवाजेष्ठता यादीमध्ये डॉ.रॉय यांच्या नावापुढे एमबीबीएस व डीपीएच ही शैक्षणिक अर्हता दाखविणेत आलेली आहे याचा अर्थ परिक्षा अगोदर एक वर्षे डीपीएच ही पदवी धारण कशी केली. याचा अर्थ प्रशासनाने नगरसवेकांची फसवणूक केली की काय त्याबद्दल फसवणूकीचा गुन्हा दाखल करावा तसे न केल्यास सदस्य या नात्याने प्रशासनाने महापालिकेच्या सदस्यांची फसवणूक केली म्हणून फौजदारी गुन्हा दाखल करावा लागेल. महापौर साहेब, नवीन एक विषय आहे. यशवंतराव चव्हाण रुग्णालयामध्ये न्यूरो विभाग आहे का? न्यूरोसर्जन आहे का? निवृत्त वैदयकीय

अधिकारी डॉ.राजशेखर अय्यर आहेत तर मग ही खरेदी ठेकेदाराना पोसण्यासाठी आहे का? कारण निवृत्त वैदयकीय अधिकारी डॉ.राजशेखर अय्यर यांच्या कारकिर्दीत न्यूरो विभागासाठी खरेदी करण्यात आली होती. हे सर्व साहित्य धरून आहे का पुन्हा २ कोटी १३ लाखाचे न्यूरो विभागाचे साहित्य खरेदी करण्याचा खटाटोप ठराविक ठेकेदारांना डोळयापुढे ठेवून निवीदा काढण्याचा उदयोग केला आहे का? सर्वात गंभीर बाब म्हणजे पुण्यातील नामांकित रुग्णालयामध्ये चौकशी केली असता पिंपरीमध्ये मोठी तफावत आहे, सदर मशीनची किमंत १२ लाख आहे आणि २२ लाख प्रमाणे खरेदी करण्यात येणार आहे. हे काय चालले आहे. महापालिकेची लुट सुरु आहे. गोरगरीबांना दहा रुपयाची गोळी सुध्दा आपण बाहेरुन आणायला लावतो. एवढी गडबड असताना याची चौकशी करुन संबंधीतांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी आहे. अशा पध्दतीने सभागृह चालत असेलतर, हे सभागृह भारतीय राज्य घटनेनी घालून दिलेला कायदा, नियमावर चालते. सभागृहास डॉ.रॉय, डॉ.साळवे यांच्याशी घेणे देणे नाही परंतु होणारे कामकाज हे ठरावाप्रमाणे, नियमाप्रमाणे व्हावे एवढीच आमची अपेक्षा आहे. एवढे बोलून थांबतो, धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती करतो की, आपण आयुक्त साहेबांना सभागृहाच्या वतीने निर्णय घेण्याचे आदेश दयावेत त्यांनी भाषण केलेले आहे, त्यांचे पुन्हा अभिनंदन करतो. श्रीनिवास पाटिल यांचे रेकॉर्ड तुम्ही तोडू नका. आयुक्त म्हणून तुमचा अधिकार आहे, सभागृहाने निर्णय घ्यायचा, आमचा अपमान करु नका तुम्ही निर्णय घ्या. आठ दिवसाच्या आत तुम्ही निर्णय घ्यायचा आहे नाहीतर आम्ही सभेला बसणार नाहीत. डीपीसी कमिटीने जे मांडलेले आहे त्यात तुम्हांला फेरबदल करायचा नाही. आम्ही जो निर्णय घेतला त्यात तुम्हांला फेरबदल करायचा अधिकार नाहीतर, मग निर्णय घ्या. तुम्ही सगळयांचे मने सांभाळताय. तुम्हांला आम्ही ठराव पारीत करुन दिलेला आहे त्यावर तुम्ही तुकडा पाडा, निर्णय घ्या आणि शासनाला पाठवून दया.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, डेव्हलपमेंट कामासाठी आपण जास्त वेळ दयायला पाहिजे. योगेश बहल यांनी सांगीतलेल बरोबर आहे. तुम्ही अधिकारी म्हणून उत्तर दिलेले नाही. तुम्ही पॉलीटिशन म्हणून उत्तर दिलेले आहे. तुम्ही चुक झाली असंही म्हणलेले नाही आणि चुक नाही झाली असंही म्हणलेल नाही. तुम्हांला बीपीएमसी ॲक्टमध्ये खुप पॉवर दिलेल्या आहेत. बहल साहेबांनी सांगीतले तुम्ही सगळयांचे मन खुशीत ठेवण्याचे बघता, तसं होऊ शकत नाही. तुम्हांला निर्णय घ्यावा लागेल. तुम्ही हा निर्णय चुकला असंही म्हणलेले नाही, व आम्ही केलेले बरोबर आहे असेही म्हणलेले नाही. प्रमोशन कमिटीचा निर्णय चुकलेला आहे. दि.३०/५/२०१३ ची मार्कलीस्ट आहे त्यादिवशी प्रमोशन दिलेले आहे. यामध्ये चुक झालेली आहे. तुम्ही ते कबुल केल असतंतर आम्ही मानल असतं तुम्ही ते कुठलही उत्तर दिलेल नाही. योगेश बहल यांनी एचबीओटी मशीनबद्दल सांगीतलं. त्या मशीनमध्ये तुम्ही दिड कोटी रुपये खर्च केलेले आहेत. त्या मशीनला पैसे दयायचे का नाही त्याची ईन्क्वॉयरी हा वेगळा भाग आहे. ईन्क्वॉयरी चालू आहे म्हणून आपण दिड कोटीच इन्व्हेस्टमेंट ठेवायचं का? दिड कोटी इन्व्हेस्टमेंट केलेल आहे ती मशीन चालू करा, का मशीन चालू केलेली नाही. दिड कोटी

इन्व्हेस्ट करुन मशीन घेतली ती अशीच ठेवायची का? साहेब, तुम्ही म्हणता डीपीसीने, या सभागृहाने निर्णय घेतला मी आता काही करु शकत नाही, हे चुकीचं आहे. तुम्हांला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. पुरावा दिलेला आहे त्याप्रमाणे जी चुक झाली ती तुम्ही सुधारु शकता आणि म्हणून माझी विनंती आहे एचबीओटी मशीनला पहिलं कार्यरत करा आणि त्यामध्ये सखोल ईन्क्वॉयरी करा आणि चुक झालेली असेलतर ताबडतोब कारवाई करा.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी, गेले सव्वा दोन तास झाले याच्यावर चर्चा चालू आहे. आयुक्त साहेब, आजच्या विषयपत्रीकेत बरेचसे असे विषय आहेत की ते तुम्हांला लागू राहतात परंतू आम्हांला येथे तुम्ही तसे पाठवत जावू नका. हा जो विषय आहे तो कोण अधिकारी कोणाला बोलायला लावतात हे सगळया सभागृहाला माहिती आहे. या अधिका-याना सुध्दा अशी हौस आलेली आहे की माझ्या गटाचा कोण, तुझ्या गटाचा कोण. तु कुठल्या जातीचा, मी कुठल्या जातीचा हे राजकारणामध्ये जिथपर्यंत चालतं तिथपर्यंत ठिक आहे. परंतु याच्यांवर साहेब तुमचा वचक असला पाहिजे कारण तुम्ही या सगळयांचे कर्तेधर्ते आहात. याच्यामध्ये आपला एखादा मुलगा जर चुकत असेलतर त्याला जवळ बोलवून ढोस दिला पाहिजे की तू हे प्रश्न कसे पुरवतो हे सगळ बाहेर पडत असतं कुठंही दडून राहत नाही. मागचा झालेला विषय ती फाईल तुम्ही पुढे पाठवली असतीतर हा विषय आला नसता. परत रिपीट, रिपीट तेच ते चाललेले आहे. डॉ.नागकुमार यांना श्रध्दांजली वाहताना डॉ.अय्यर सांगत होते. आम्ही खुप एकत्र आहोत, आमच्या दोघांची खुप मैत्री आहे. मग आम्हांला तुम्ही कशाला असं करायला लावताय. आयुक्त साहेब आपण हा निर्णय घेतला पाहिजे. हे आठ दिवसात निकाली काढावे. या दोन अधिका-यांना समोर बसवा व कुठेही याची वाच्यता बाहेर झालीतर चालणार नाही असे सांगा. नाहीतर दोघांनाही जिथे होते तिथे वापस पाठवा. यामध्ये आयुक्त साहेब आपण निर्णय घेतला पाहिजे, तुम्ही तुमचे अधिकार वापरणार नाहीत. पुढे दोन चार विषय आम्ही हेच बोलणार आहोत. तुम्ही तुमचा अधिकार वापरा, सभागृहाचा वेळ वाया घालू नये आठ दिवसाची तुम्हांला मुदत दिलेली अहे तरी तुम्ही निर्णया पर्यंत यावे. तुम्हांला सुध्दा सगळेच सारखे आहेत, तुम्ही पण कोणाच्या बाजूने बोलू शकत नाहीत. कोण कोणासाठी बोलतो याच्या अधिका-यांनी नोंदी करुन घेतलेल्या असतात. थोडया वेळाने तुम्ही त्यांचे मोबाईल चेक करा. “थँक्यू”, माझी बाजू घेतली असा प्रत्येकाला मॅसेज जाणार आहे. म्हणून तुम्ही त्या लोकांना तुमच्या केबीनमध्ये बोलून घ्या त्यांना तुम्ही तुमच्या पध्दतीने नीट सांगा. आमच्यापर्यंत अशा गोष्टी आणू नका. मागच्या सुध्दा विषयामध्ये ब-याचशा भगिनी कोर्टात गेलेल्या आहेत. जे प्रशासनाचे कामकाज आहे त्याबाबत प्रशासनाने काय काय आहे ते क्लिअर करावे. काही प्रॉपर्टि असेल किंवा टेंडर असेल ते तुम्ही ठरवानां. मग कोणी कुठेजरी गेलेतरी त्या गोष्टीला सामोरे जाण्यासाठी काही वावगे ठरणार नाही. पर्यावरणाची एनओसी नाही, हे नाही, ते नाही सगळे आमच्यापुढे येतात. आम्ही गुन्हेगार ठरतो, पगार कोण घेतं. आम्ही का गुन्हेगार ठरायचं. मा.महापौर साहेब, विषय सुरु करावेत अशी विनंती करते. आयुक्त साहेब, तुम्ही सुध्दा आठ दिवसामध्ये या सगळया विषयाचा पडदा पाडावा. दोघाना बोलावून समज दयावी. परत कोणीही कुठेही जाता कामा नये. कारण फेसबुकपासून या गोष्टीला सुरवात झालेली आहे. दिड वर्षे झाले यांच महायुध्द सुरु आहे. हे दोघे मिटींगला बसतात, गप्पा मारतात आणि आमच्यामध्ये गटतट पाडण्याचा प्रयत्न करतात.

हे पगार घेतात, गाडया वापरतात त्यांना जे करायच ते करतात आम्हांला कशाला निष्कारण त्यात घेता. तुम्ही तुमचा हाक्क वापरावा आणि त्याप्रमाणे निर्णय घ्यावा, परत हा विषय आमच्या समोर येता कामा नये, विषयाला सुरवात करावी.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह न्यूरो विभागाचे काय झाले याबाबत स्पष्टीकरण दयावे.

**मा.डॉ.अनिल रॉय (आरोग्य वैदयकीय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह वायसीएम हॉस्पिटल येथे गेले पाच-सहा वर्षापासून न्यूरो विभाग आहे. पुर्वी डॉ.फाळके, डॉ.व्होरा, डॉ.पाटकर होते नंतर तीन वर्षापूर्वी डॉ.खान म्हणून होते ते गेल्यानंतर डॉ अभिषेक म्हणून होते आता डॉ.अमीत वाघ म्हणून आहेत. हे डिपार्टमेंट कार्यरत आहे. मागच्या वर्षी २०१३ मध्ये १९० ऑपरेशन झाले व २०१४ मध्ये २५४ न्यूरोचे ऑपरेशन झालेले आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह डॉ.जगदाळे यांनी अशी मशीन घेतली ती कार्यरत नाही, परत एक मागवायची याबाबत आयुक्त साहेबांनी माहिती घेतलेली असेलतर ती सांगावी. ठरावीक कंपनीचीच का ?

**मा.महापालिका आयुक्त -** सन्मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह मागच्या दोन तासात जो काही विषय कलर डॉपलर आणि न्युरो मायक्रोस्कोप बद्दल झालेला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या दोन्ही केसमध्ये आणि एचबीओटी एक आहे तो जूनाच विषय आहे या तीन्ही विषयामध्ये पर्टिक्यूलरली एचबीओटीची चौकशी झालेली आहे त्याची पुढची कार्यवाही करणं बाकी आहे. कलर डॉपलर आणि मायक्रोस्कोप बाबतची माहिती घेवून, ती २० फेब्रूवारी २०१५ ची महासभा आहे त्यापुढे ठेवण्यात येईल.

**मा.शांताराम भालेकर -** मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, सन्मा.सदस्य, पत्रकार मित्र. मा.प्रतिभा भदाणे, उपसंचालक नगररचना यांची बदली झाली त्यांनी याठिकाणी चांगले काम केलेले आहे त्यामुळे त्यांचा सत्कार करणेत यावा.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, अनुमोदन आहे.

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती व सभागृहातील उपस्थित पदाधिकारी व सर्व पक्षाचे गटनेते यांच्या हास्ते मा.प्रतिभा भदाणे तसेच नवनिर्वाचित उपसंचालक मा.प्रकाश ठाकूर व सहा.आयुक्त योगेश कडूसकर यांचा सत्कार करणेत आला व मा.प्रकाश ठाकूर व मा.योगेश कडूसकर यांनी त्यांचा परिचय सभागृहास करुन दिला)

**मा.शांताराम भालेकर -** मा.महापौर साहेब, आज याठिकाणी खरेतर भदाणे मॅडमचा विषय मांडण्यामागचे कारण असं आहे की १९९७ साली तळवडे गांव महापालिकेत गेले. ९० एक्करचे गायरान तेथे आहे, डिअरपार्क साठी मी सातत्याने अनेकवर्षे मा.अजीत दादाना आणि ज्येष्ठ नेते मंडळीना पाठपुरावा करत होतो. अधिकारी, पदाधिकारी या सर्वांनी मला सहकार्य केले. त्यामध्ये भदाणे  मॅडम यांचा सिंहाचा वाटा होता. सर्वानी चांगल्या प्रकारचे सहकार्य केल्यामुळे हा विषय मार्गी लागलेला आहे. भविष्यकाळात चांगल्या प्रकारचे डिअर पार्क करु म्हणून आयुक्त साहेबांनी आश्वासन दिलेले आहे. तरी शहराचे वतीने मी मा.भदाणे मॅडमचे अभिनंदन करतो भविष्यकाळात त्यांच्या कामास शुभेच्छा व्यक्त करतो. मी ज्योतीबा नगर वॉर्डातून काम करत असताना माझ्या वॉर्डात गॅसची लाईन गेलेली आहे, हा जनतेचा विषय असल्यामुळे बोलतो त्याठिकाणी गॅसगळती झालेली आहे. बस्ट झाले असतेतर त्या परिसरात मोठी जिवीत हानी झाली असती. संबंधीत पोलीस स्टेशनला कळवलेले आहे याचा गुन्हा दाखल झालेला आहे. तरी मी पुन्हा आभार व्यक्त करुन थांबतो.

**मा.प्रतिभा भदाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अधिकारी वर्ग. महापालिका सभेने माझा सत्कार केला त्याबद्दल मी आपली अत्यंत आभारी आहे. ॲडीशनल चार्जचा कार्यकाल पुर्ण केलेला आहे. ॲडीशनल चार्जमध्ये फुलफिल काम करनं आणि पुर्ण कार्यकाल व्यतीत करण ते मला सौभाग्याने प्राप्त झालेले आहे. आपण सर्वानी मला मदत केलेली आहे, मी सर्वांची आभारी आहे, धन्यवाद.

-------------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/५९४/२०१४, दि.१३/८/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७७०४ दिनांक २२/०८/२०१४

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७१९ दिनांक ०५/१२/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र. ६१२ दिनांक २३/१२/२००१४

मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.पुणे यांनी दिनांक २१/०३/२०१४ व ३१/०७/२०१४ च्या मागणीपत्रानुसार तसेच शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१३/प्र.क्र.३३८/ नवि-३३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक १८/०२/२०१४ चे पत्र व शासन पत्र क्र.पीएमएल-३०१३/प्र.क्र.८०/ नवि-२२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक ०७/०८/२०१४ अन्वये संचलन तुटीची रक्कम तसेच पासेसपोटीची प्रतिपूर्तीची रक्क्म अदा करणेबाबत आदेशीत केले आहे. त्याप्रमाणे संचलनतुटी (**operational losses**) पोटी र.रु.१० कोटी व विविध प्रकारचे सवलतीचे पासेसपोटी र.रु.५ कोटी असे एकूण र.रु.१५ कोटी सन २०१३-१४ मध्ये येणा-या संभाव्य संचलन तुटीपोटी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे मार्फत लेखा

परिक्षण झाल्यानंतर त्यांच्या शिफारशीप्रमाणे देय होणा-या रकमेतून अग्रीम स्वरुपात दिलेल्या रकमेचे समायोजन करण्याच्या अटीस अधिन राहुन पुणे महानगर परिवहन महामंडळ लि पुणे यांना र.रु.१५ कोटी (अक्षरी र.रु.पंधरा कोटी फक्त) अदा करणेस तसेच सदरचा खर्च लेखा विभागाकडून वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे परिवहन महामंडळाच्या कर्मचा-यांना ६व्या वेतन आयोगाच्या धर्तीवर नवीन वेतनश्रेणी माहे डिसेंबर २००७ पासून लागू करण्यात येवून त्याप्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे. एप्रिल २००७ ते नोव्हेंबर २०११ या कालावधीत ५६ महिन्यांच्या देय असणा-या फरकाची रक्कम महामंडळाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे अदा करण्यात आलेली नाही सदर फरकाची रक्कम कर्मचा-यांना मिळणेकामी पीएमपीएमएल कर्मचारी महासंघाने वेळोवेळी मागणी केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक पीएमएल-३०१३/प्र.क्र.१/नवि-२२ दि.८ ऑगस्ट २०१४ नुसार महामंडळाकडील कर्मचा-यांना सुधारित वेतनानुसार फरकापोटी देय असलेली रक्कम देखील संचलन तुटीचा भाग असल्याने सदर रकमेची महानगरपालिकेकडे मागणी करावी, असे कळविले आहे. त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दायित्वाचे तत्वाने (४०%) र.रु.१२० कोटी महामंडळास मिळणेकामी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी.एम.पी.एम.एल यांनी दिनांक ११/०८/२०१४ रोजी विनंती केलेली आहे. सबब पीएमपीएमएल कर्मचारी महासंघाकडून वेळोवेळी होणारी मागणी तसेच शासन निर्णयाचा विचार करता पुणे परिवहन महामंडळाच्या सेवकांना ५६ महिन्यांच्या देय असणा-या फरकाची रक्कम ४० टक्के प्रमाणे र.रु.१२० कोटी पुणे परिवहन महामंडळास मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,पैसे वाटप करायला, पैसे उधळायला, कोणी मागितले तरी द्यायला त्यासाठी स्पेशल सभा घ्यायला आमची काहीही हरकत नाही. पण आपला एखादा काही उत्पन्नाचा सोर्स बंद होत असेल तर त्यासाठी उदा. एलबीटी बंद होते आहे. एलबीटी बंद होऊ नये म्हणून स्पेशल जी.बी. घ्या. आपण शासनाकडे आपली मागणी मांडायला सुरुवात तरी करु या. एलबीटी बंद करु नका व आम्हाला भिकेला लावू नका. म्हणून मी स्पेशल सभेची मागणी केली होती. पण याकडे कोणी लक्ष दिले नाही. विशेष सभा बोलवली त्याबद्दल आपले अभिनंदन. सर्व नगरसेवकांना बोलवले होते. ही विशेष सभा होती. माजी आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी त्या सभेसाठी आले होते. त्यांच्यासाठी विशेष सभा बोलवली होती. आम्ही आलो होतो. पैसे उधळायचे असतील तर विशेष सभा घेत जा. याठिकाणी सन्मा.चेअरमन व आमदार साहेब इथे बसलेले आहेत. त्यांनी पीएमपीएलसाठी निधी मंजूर केला आहे. मंजुरीसाठी आमचा विरोध नाही परंतू पुढे लिहिलेले आहे मी विषय मधूनच वाचते. तसेच म्हणजे लेखा विभागाकडून वाहन व्यवहार विभाग यातून खर्ची टाकायला मान्यता देण्यात येत आहे. पुढे आहे पुणे मनपाच्या  कर्मचा-यांना ६व्या वेतन आयोगाच्या धर्तीवर नवीन वेतनश्रेणी माहे डिसेंबर २००७ पासून लागू करण्यात येऊन त्याप्रमाणे वेतन अदा करण्यात येत आहे. ५६ कोटींची देय असणारी रक्कम आपण त्यांना द्यायची आहे. खालूनच

सहावी ओळ आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या दायित्वाचे तुम्हाला हे पत्र आले असेल. त्याप्रमाणे तुम्ही आमच्यापुढे हा विषय मांडलेला आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे दायित्व तत्वाने ४० टक्के म्हणजे १२० कोटी महामंडळास मिळणेकामी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी.एम.पी.एम.एल यांनी दिनांक ११/०८/२०१४ रोजी विनंती केलेली आहे. पुढील रु.१२० कोटी देण्याचा विषय आहे. आपण लगेच मंजूर म्हणून महापौर आपण सांगितले आहे. १२० कोटी. ते आपल्याला द्यावेच लागतील. ४० टक्के प्रमाणे १२० कोटी इथे होत आहेत. मा.आमदार साहेब मला सांगायचे आहे, आयुक्त साहेबांकडून मला खुलासा हवा आहे. पीएमपीएमएल २००७ पासून पूर्व पीसीएमटीतील किती कामगार आज रोजी काम करत आहेत. जे होते त्यापैकी जवळजवळ २५० लोक आपल्याकडे मर्ज करुन घेतले आहेत. आम्हाला ते पेलवत नव्हते. आज पीएमपीएमएलमध्ये पूर्व पीसीएमटीचे किती कामगार काम करत आहेत. आम्हाला त्यांचा फरक द्यायला आमची कोणती हरकत नाही. परंतू पूर्व पीसीएमटीचे जे कामगार आहेत, त्यांना सहाव्या वेतन आयोगाचा फरक द्यावा अशी आमची याठिकाणी मागणी आहे. आम्ही का म्हणून पुणेकरांचा बोजा उचलायला. आम्हाला तुसडेपणाने वागवतात. नेहमी नेहमी आम्हाला कमी लेखतात.

**मा.सुलभा ऊबाळे** - बाई पुणेकर म्हणू नका.

**मा.शमिम पठाण-** पुणेकर म्हणजे त्यांचे सभासद. त्यावेळी आपल्या सर्व सन्माननिय सदस्यांनी, आम्ही आमची पीसीएमटी वेगळी करु, आम्ही आमची चालवू अशा प्रकारच्या वल्गना केलेल्या होत्या. तसा ठराव केलेला होता. मी महापालिकेत बोलले होते, आमचा मोडकातोडका संसार आम्ही आमच्या पद्धतीने चालूव. आजपर्यंत एवढे २ अब्ज पैसे दिले आहेत. त्यादिवशी मी परदेशी साहेबांशी सविस्तर बोलले होते. मला वाटले होते, त्यावर कोणीतरी विचार करेल. कोणीही विचार केला नाही. त्यावेळी जरी करार झाला होता किंवा तोंडी सांगितले असले तरी ४० टक्क्यांचा हिशोब आपण त्यांना द्यावाच असा काही नियम नाही. तशी त्यावेळी नियमावली केलेली नाही. कंपनी रजिस्ट्रेशन करताना त्यांनी तशी नियमावली केली असेलतर ती नियमावली आधी आम्हाला द्यावी. मा.महापौर साहेबांना, मा.आयुक्त साहेबांना, सर्व सभागृहाला विनंती करते की, पूर्व पीसीएमटीचे जे कर्मचारी आहेत, त्यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची जेवढी रक्कम होते, तेवढीच रक्कम त्यांना अदा करावी. आमदार साहेबांना देखील मी विनंती करते. आपण कशाच्या जोरावर बोलतोय, आपण हवेत बोलतोय. १२० कोटी म्हणजे काय. एवढा पैसा कुठून आणायचा. इथे पुनर्वसनाचा प्रकल्प रखडला आहे. जेएनएनयूआरएमचे पैसे यायचे बंद झाले आहेत. पैसे कुठून आणणार आहोत. आपण गोरगरीबांना घरे देऊ शकत नाही. पिंपरी चिंचवडमध्ये समाविष्ट झालेली जी काही गावे आहेत, त्यांची गा-हाणी मन लावून, जीवापाड ज्यांनी ऐकली ते आमदार साहेब इथे आहेत. ते त्यांचे प्रतिनिधित्व करत आहेत. आपण त्यांची कोणतीही गरज भागवू शकत नाही. खरेतर याचा साकल्याने विचार करावा. आपल्या लोकांना फरक कसा देता येईल, इथपर्यंत हा विषय आहे. याठिकाणी माझी सूचना आहे, पूर्व पीसीएमटीतील जे लोक आहेत, तेवढ्याच आपल्या कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाचा फरक द्यावा. आपला हिस्सा आहे तो आम्हाला मान्य

नाही. त्यांनी अजून नियमावली केलेली नाही. ऑडीट नाही, हिशोब नाही. पीएमपीएल स्थापन झाल्यापासून आम्ही त्यांना २ अब्ज इतकी रक्कम दिलेली आहे. पीसीएमटीसाठी एखादे कोटी खर्च केले होते. आपण देतच जावे त्यांनी खर्च करत जावा. परदेशी साहेब प्रामाणिकपणे पैसे खर्च करतील, पैसे वाया जाणार नाहीत याची काळजी करतील. पण पैसे द्यायला कोणाकडे आहेत. पुढील महिन्यात एलबीटी बंद होते आहे. आहात कुठे तुम्ही. तुम्हाला निर्णय घ्यायला सांगितले होते का. आम्ही इथे बॉंब मारू द्यात, तुम्ही तिथे पैसे मंजूर करायचे मी याचा निशेध करते. एकतर आम्हाला मिटींगला बोलवायचे नाही. परत असा अचानक निर्णय घ्यायचा.

**मा.महेश लांडगे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, पीएमपीएमएलची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत सभागृहातील प्रत्येक सभासद आपआपल्या पद्धतीने पीएमपीएमलच्या असलेल्या समस्या वेळोवेळी मांडतो. जेव्हा निधी देण्याची वेळ आली आहे, त्यावेळी सुद्धा विषय मांडला होता. आज हा विषय मंजूर केल्यानंतर माझ्याकडे काही कामगारांच्या प्रश्नांची पत्रे आहेत. पीएमपीएमएलमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना फरकाच्या रकमेपोटी किंवा त्यांच्या रिटायरमेंट फंडसाठी आपण वेळोवेळी पैसे दिले आहेत. मी गेल्या ब-याच दिवसांपासून या गोष्टीचा पाठपुरावा करतोय. पीएमपीएमएलमध्ये ज्या-ज्या वेळी आमची मिटींग झाली. सदस्य म्हणून मी प्रत्येक वेळी पीएमपीएमएलमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना न्याय मिळेल असाच प्रयत्न केला. रिटायर्डमेंट फंड का द्यावा. हे सुद्धा सर्व सभासदांना कळाले पाहीजे. हे जवळजवळ सगळ्या सभासदांना माहिती पाहीजे. उदाहरण सांगतो. सूर्यवंशी नावाचे रिटायर्ड ड्रायव्हर होते. त्यांना काही मूलबाळ नाही. ते दवाखान्यात ॲडमिट आहेत. मृत्यूशी झगडत आहेत. त्यांची पत्नी त्यांचा अर्ज घेऊन पीएमपीएमएलमध्ये आली होती. त्या मला भेटल्या. त्यांनी मला पत्र दिले होते. मला यासाठी भांडले पाहीजे. कर्मचा-याला कमीत कमी रिटायरमेंटनंतर आधार म्हणून पैसे मिळावेत. फरकाची रक्कम या गोष्टी सुद्धा त्यांचा अधिकार आहे तो त्यांना दिला पाहीजे. पुणे महापालिकेने गेल्या महिन्यात रु.५० कोटी दिले. ज्यावेळी पीएमपीएमएलकडे हे पैसे जमा झाले, त्यावेळी परदेशी साहेबांनी आपल्या पीएमपीएमएलला रु.१०७ कोटी देणे असे मला सांगितले. ते पहिल्यांदा दिले पाहीजेत. त्यानंतर फरकाची रक्कम द्यावी असे सूचविले होते. परंतू पुणे महापालिकेचे चेअरमन व मी परदेशी साहेबांना भेटलो. त्यांना सांगितले, पहिली फरकाची रक्कम द्या. रु.१०७ कोटी राहीले आहेत. ते कशामुळे बाकी राहीले आहेत हे शोधून पहिल्यांदा कर्मचा-यांना फरकाची रक्कम द्या. त्यावेळी त्यांनी रु.५० कोटी पुणे महापालिकेकडून आलेले त्यांना वाटले. ते फक्त पीएमटी नाहीतर पीसीएमटीचे कर्मचा-यांना सुद्धा ॲड करुन वाटले आहेत. हे रु.४० कोटी आपण देणे इतके गरजेचे आहे. असे पाहिलेतर कर्मचा-यांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. ३० ते ४० वेळा कर्मचा-यांनी निवेदन सादर केले आहे. रिटायरमेंटला आलेले आहे. तिथे डॉ. परदेशी तिथे काम करतात. या लोकांसाठी निश्चितपणे पीएमपीएमएल चालली पाहीजे. जाणारे पैसे कमी झाले पाहीजेत. त्यांचे उत्पन्न वाढले पाहीजे. दुसरीकडे एकिकडे कर्मचा-यांना सुद्धा पाहायचे आहे. म्हणून दोघांसाठी कमीतकमी कर्मचा-यांसाठी तरी हे पैसे त्यांना देणे गरजेचे आहे. सरकारी कर्मचारी असले तरी त्यांना तिथे फार त्रास होतो आहे. ही रक्कम आपण मंजूर करावी. नंतर जो काही आपला

प्रॉब्लेम असेल  त्यासाठी सर्व सभासदांना घेऊन त्यांच्याशी बोलू. माझी आपल्याला विनंती आहे की, १२० कोटी मंजूर करतोय. पण फक्त रु.४० कोटी देतोय. तसेच पुणे महापालिकेनेसुद्धा ६० टक्के रक्कम मंजूर केली होती. त्यांनी रु.५० कोटी दिले होते. आपण हळूहळू आपली रक्कम देणार आहोत. हा विषय मंजूर केला आहे. त्याबद्दल सगळ्यांना धन्यवाद, अभिनंदन!

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आजचा हा विषय पीएमपीएमएलला पैसे देण्याबाबतचा आहे. आमच्या कर्मचा-यांना पैसे मिळू नयेत असे आमचे अजिबात म्हणणे नाही. जेव्हा आपण ऑटोक्लस्टरला मिटींग घेतली होती. त्यात आम्ही सगळे विषय मांडले होते. त्यावेळी परदेशी साहेबांना आम्ही सांगितले होते, शंभर टक्यांमधील २५ टक्के प्रश्न मार्गी लागू देत. त्यातील आमचे २५ टक्के तरी प्रश्न मार्गी लागलेत का. आज अष्टेकर साहेब मागे बसले आहेत. कंपनीतील सगळे कर्मचारी आमचेच आहेत. त्यामुळे आम्हाला पैसे द्यायला दुमत नाही. पुणे व पिंपरी चिंचवड हा ६०:४० असा रेशियो करतो, याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. या रेशियोप्रमाणे आमच्या कर्मचा-यांना प्रमोशन द्या. पूर्व पीएमटीतील पुण्यातील क्वालिफिकेशन नसलेल्यांना देखील प्रमोशन दिले गेले आहेत. आमच्याकडील जे कर्मचारी प्रमोशनसाठी केपेबल आहेत त्यांना प्रमोशन द्या. आमच्या निगडी किंवा देहूरोड,किवळे साईडला राहणा-या कर्मचा-यांना थम्ब करण्यासाठी स्वारगेटला जावे लागते. हा आमचा प्रश्न मिटवा. अशा २४ लोकांची यादी त्यादिवशी मी साहेबांच्या हातात दिली होती. हे कर्मचारी कामावर जाऊ शकत नाहीत. याबाबतीत निर्णय घ्यावा. त्या लोकांना त्यांच्या एरियामध्ये ड्युटी द्या. कोंढवा, मांजरीत राहणा-याला निगडीला थम्ब करायला पाठवायचे, कोणाला त्रास देऊन काही मिळणार नाही. हा प्रश्न सुद्धा मार्गी लागला नाही. मी परेदशी साहेबांना त्यादिवशी सांगितले होते. आमच्या सातशे दिवस काम केलेल्या कर्मचा-याचा मृत्यू झाला परंतू त्याला पर्मनन्ट केले नसल्यामुळे आज त्याची बायको वयाने इतकी लहान आहे. २७ वर्षाची मुलगी दोन मुलांना घेऊन दारोदार भटकते आहे. कर्मचा-याला किती दिवसांत पर्मनन्ट करायला पाहीजे. तुम्ही कामावरच घेऊ नका. ती प्रत्येक नगरसेवकाकडे जाते. ती कोर्टात गेलीतर तिला तुम्हाला अधिकृतरित्या घ्यावेच लागेल. तिचा नवरा पर्मनन्ट नव्हता म्हणून आज तिची परिस्थिती अशी आहे की, ती सांगवीत फ्लॅटमध्ये रहात होती. आज भिमशक्तीनगरच्या झोपडपट्टीत राहते आहे. आज त्या मुलीवर काय वाईट परिस्थिती आली आहे. हा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला होता. २४० दिवस झाल्यानंतरही त्या कर्मचा-याला पर्मनन्ट का केले गेले नाही. तसे नसेल तर भरतीची जाहिरात कशाला काढतो. कर्मचा-याला पर्मनन्ट करणार नसाल तर त्याला घेऊ नका. बसेस बाहेरुन भाड्याने घेतोय. दोनशे ते पाचशे बसेस भाड्याने घेताय. या विषयावर काय झाले. याचे उत्तर द्या. आपण आत्ता रु.४० कोटींची परमिशन देणार आहोत. आमच्याकडून तुम्हाला १२० कोटींची परमिशन मिळणार नाही. हे सुद्धा आपण आमच्या कर्मचा-यांना दि.३१ मार्च पर्यंत द्यावेत. आमच्या अडचणी, शंभर टक्के आम्ही जे काही मागितले होते, त्यातील २५ चक्के तरी मंजूरी दिली पाहीजे. तुम्ही त्यांच्याकडून काय दुरुस्ती केली, त्यांचा किती कि.मी.चा रूट आहे. आमच्याकडे किती कि.मी.चा रुट आहे. आमचा एरिया लहान आहे. आमच्याकडे बसेस कमी धावतात. हडपसरला जाणारे लोक, सिम्बायोसिसला जाणा-या विद्यार्थ्यांसाठी, लोकांसाठी बस नाही. पीएमपीएल नक्की चांगली चालेल. २/३ वर्षांत ते

नक्कीच चांगली सुधारणा करतील. आमच्या मागण्या २५ टक्के पूर्ण झाल्याशिवाय, आम्हाला अधिकार दिला असेल ४० कोटींची मान्यता देणार आहोत. आत्ता ३ वर्षांची मान्यता देणार नाही. नंतर काय घडेल ते घडेल. आम्हाला आमच्या कामगारांना दुखवायचे नाही. ते सुद्धा दि.३१ मार्च पर्यंत द्यावेत. दि. २० मार्चच्या मा.महापालिका सभेमध्ये याचा खुलासा करावा. पूर्व पीसीएमटीच्या कर्मचा-यांचे हे ५ प्रश्न मार्गी लावावेत अशी मी विनंती करते. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पुणे परिवहन महामंडळाच्या सेवकांना देय असणा-या फरकाचे रक्कमेपैकी र.रु. ४० कोटी ३१ मार्च २०१५ पुर्वी त्यांना अदा करणेत यावी परंतु ऑटो क्लस्टर येथे झालेल्या मिटींगमध्ये ठरलेप्रमाणे आम्ही केलेल्या मागण्यांपैकी उदा.पीसीएमटी कडील जे सेवक पदोन्नतीस पात्र आहेत त्यांना प्राधान्याने पदोन्नती देणेत यावी. तसेच देहु रोड, किवळे, निगडी असे लांबुन स्वारगेट, हडपसर येथे जाणा-या कर्मचा-यांचे त्यांच्या नजिकच्या डेपोमध्येच थंब इंप्रेशनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच रोजंदारी सेवेत अंदाजे ७०० दिवस पुर्ण केलेल्या कर्मचा-याचे निधन झाले आहे. परंतु सेवेत कायम नसलेने त्याचे पत्नीस अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेत आलेले नाही. त्याचा सुध्दा विचार करावा. इत्यादी मागण्या सदरची रक्कम देणेपुर्वी किमान २५% मागण्या पुर्ण झाल्याशिवाय अदा करणेत येऊ नये, तसेच ६०:४० या रेशोप्रमाणे आमच्या पीएमपीएमएल च्या कर्मचा-यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पक्षनेत्या मा.मंगलाताई कदम यांनी जी उपसूचना मांडली त्याला मी अनुमोदन देतो.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६२५ विषय क्रमांक - १
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/५९४/२०१४, दि.१३/८/२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७७०४ दिनांक २२/०८/२०१४
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७१९ दिनांक ०५/१२/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र. ६१२ दिनांक २३/१२/२००१४

मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.पुणे यांनी दिनांक २१/०३/२०१४ व ३१/०७/२०१४ च्या मागणीपत्रानुसार तसेच शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१३/प्र.क्र.३३८/ नवि-३३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक १८/०२/२०१४ चे पत्र व शासन पत्र क्र.पीएमएल-३०१३/प्र.क्र.८०/ नवि-२२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक ०७/०८/२०१४ अन्वये संचलन तुटीची रक्कम तसेच पासेसपोटीची प्रतिपूर्तीची रक्कम अदा

करणेबाबत आदेशीत केले आहे. त्याप्रमाणे संचलनतुटी (**operational losses**) पोटी र.रु.१० कोटी व विविध प्रकारचे सवलतीचे पासेसपोटी र.रु.५ कोटी असे एकूण र.रु.१५ कोटी सन २०१३-१४ मध्ये येणा-या संभाव्य संचलन तुटीपोटी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे मार्फत लेखा परिक्षण झाल्यानंतर त्यांच्या शिफारशीप्रमाणे देय होणा-या रकमेतून अग्रीम स्वरुपात दिलेल्या रकमेचे समायोजन करण्याच्या अटीस अधिन राहुन पुणे महानगर परिवहन महामंडळ लि पुणे यांना र.रु.१५ कोटी (अक्षरी र.रु.पंधरा कोटी फक्त) अदा करणेस तसेच सदरचा खर्च लेखा विभागाकडून वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे परिवहन महामंडळाच्या कर्मचा-यांना ६व्या वेतन आयोगाच्या धर्तीवर नवीन वेतनश्रेणी माहे डिसेंबर २००७ पासून लागू करण्यात येवून त्याप्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे. एप्रिल २००७ ते नोव्हेंबर २०११ या कालावधीत ५६ महिन्यांच्या देय असणा-या फरकाची रक्कम महामंडळाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे अदा करण्यात आलेली नाही सदर फरकाची रक्कम कर्मचा-यांना मिळणेकामी पीएमपीएमएल कर्मचारी महासंघाने वेळोवेळी मागणी केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक पीएमएल-३०१३/प्र.क्र.१/नवि-२२ दि.८ ऑगस्ट २०१४ नुसार महामंडळाकडील कर्मचा-यांना सुधारित वेतनानुसार फरकापोटी देय असलेली रक्कम देखील संचलन तुटीचा भाग असल्याने सदर रकमेची महानगरपालिकेकडे मागणी करावी, असे कळविले आहे. त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दायित्वाचे तत्वाने (४०%) र.रु.१२० कोटी महामंडळास मिळणेकामी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी.एम.पी.एम.एल यांनी दिनांक ११/०८/२०१४ रोजी विनंती केलेली आहे. सबब पीएमपीएमएल कर्मचारी महासंघाकडून वेळोवेळी होणारी मागणी तसेच शासन निर्णयाचा विचार करता पुणे परिवहन महामंडळाच्या सेवकांना ५६ महिन्यांच्या देय असणा-या फरकाची रक्कम ४० टक्के प्रमाणे र.रु.१२० कोटी पुणे परिवहन महामंडळास मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे परिवहन महामंडळाच्या सेवकांना देय असणा-या फरकाचे रक्कमेपैकी र.रु. ४० कोटी ३१ मार्च २०१५ पुर्वी त्यांना अदा करणेत यावी परंतु ऑटो क्लस्टर येथे झालेल्या मिटींगमध्ये ठरलेप्रमाणे आम्ही केलेल्या मागण्यांपैकी उदा.पीसीएमटी कडील जे सेवक पदोन्नतीस पात्र आहेत त्यांना प्राधान्याने पदोन्नती देणेत यावी. तसेच देहुरोड, किवळे, निगडी असे लांबुन स्वारगेट, हडपसर येथे जाणा-या कर्मचा-यांचे त्यांच्या नजिकच्या डेपोमध्येच थंब इंप्रेशनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच रोजंदारी सेवेत अंदाजे ७०० दिवस पुर्ण केलेल्या कर्मचा-याचे निधन झाले आहे. परंतु सेवेत कायम नसलेने त्याचे पत्नीस अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेत आलेले नाही. त्याचा सुध्दा विचार करावा. इत्यादी मागण्या सदरची रक्कम देणेपुर्वी किमान २५% मागण्या पुर्ण झाल्याशिवाय अदा करणेत येऊ नये, तसेच ६०:४० या रेशोप्रमाणे आमच्या पीएमपीएमएल च्या कर्मचा-यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६२६ विषय क्रमांक - २
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/८१७/१४ दि.१०/११/२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.९२१३ दिनांक १४/११/२०१४
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७२० दिनांक ०५/१२/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र. ६१३ दिनांक २३/१२/२००१४

सन २०१४-१५ साठी वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षावर र.रु.४० कोटी एवढी तरतुद करणेत आली असुन संपूर्ण तरतूद खर्ची पडली आहे पीएमपीएमएल यांना दि.२९/१०/१४ च्या पत्रानुसार संचलन तुटीपोटी रक्कम अदा करावयाची असल्याने नगररचना विभागाकडील भूसंपादन निधी या लेखाशिर्षातुन वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षावर र.रु.१२ कोटी वर्ग करुन त्यापैकी र.रु.१० कोटी फक्त पीएमपीएमएल यांना अदा करता येईल. तरी सदरचे वर्गीकरण प्रस्तावास मान्यता देवून पीएमपीएमएल यांना शासन निर्णय क्र.एनयुआर२०१३ प्रक३३८/नवी३३ दि.१८/२/२०१४ व मा.सह व्यवस्थापकीय संचालक यांचे उक्त पत्रानुसार संचलनतुटी (**operational losses**) पोटी र.रु.१० कोटी सन २०१३-१४ मध्ये येणा-या संभाव्य संचलन तुटी (**operational losses**) पोटी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेमार्फत लेखापरिक्षण झाल्यानंतर त्यांच्या शिफारशीप्रमाणे देय होणा-या रकमेतून अग्रीम स्वरुपात दिलेल्या रकमेचे समायोजन करण्याच्या अटीस अधीन पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. पुणे यांना र.रु.१० कोटी (अक्षरी र.रु.दहा कोटी फक्त) अदा करावयाचे असल्याने तसेच सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने व भूसंपादन निधी या लेखाशिर्षातुन वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षावर र.रु.१२ कोटी वर्गीकरण करावयाचे असल्याने मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ३

दिनांक - १०/०२/२०१५

विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.सावा/२/कावि/१९६/२०१४ दि.११/१२/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.९९८० दिनांक २३/१२/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने चालविण्यात येणा-या सार्वजनिक वाचनालयातील जीर्ण व गहाळ पुस्तकांवर यापूर्वी मार्च १९९८ अखेर मा.महापालिका सभा ठराव क्र.४३३७ दि.१८/०९/२००० व शासन निर्णयानुसार आदेश क्र.सावा/२/कावि/४५/०६ दि.१०/०३/२००६ अन्वये निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर ठरावानुसार दर पाच वर्षांनी सार्वजनिक वाचनालयातील जीर्ण व गहाळ पुस्तके निर्लेखित करण्याबाबत निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांनी नेमलेल्या पुस्तके निर्लेखन त्रिसदस्य समितीतील सदस्य १) मा.मुख्यलेखापरिक्षक, २) मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) व ३) मा.सहा.आयुक्त (शाखाप्रमुख) यांचेमार्फत १) केंद्रशासनाचे आदेश क्र.ओ.एम.क्र.२३(७) इ ११(ओ)/८३ आणि सी.ऐ.जी.यु.ओ.क्र.१९६४ टी.ए. दोन २१-८३ दि.२३/१२/८३ व २) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.म.आ.ख.१०८८/ प्र.क.३०/विनिमय मंत्रालय, मुंबई -४०००३२ दि.२/१२/१९९१ अन्वये १८ सार्वजनिक वाचनालयातील प्रस्तावात नमूद प्रपत्र "अ "मधील १८ सार्वजनिक वाचनालयातील एकूण २,७८८ गहाळ पुस्तके र.रू.१,७७,२०५=३५ (अक्षरी र.रू.एक लाख सत्त्याहत्तर हजार दोनशे पाच पैसे पस्तीस फक्त) यावर निर्लेखित करण्याची कार्यवाही केली असून त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, हा सार्वजनिक वाचनालयांचा पुस्तकांचा विषय आहे. आज पिंपरी चिंचवड शहरात जेवढ्या जिम आहेत वाचनालये आहेत, लोकांसाठी तसा दिला पाहीजे तशी बुद्धीला चालना देण्यासाठी वाचनालये दिलीच पाहीजेत. पण ती चालवणे तेवढे सोप्पे आहे असे वाटत नाही. शिपाई व लायब्ररीयन नेमला गेला असेलतर आपला रु.७०,०००/- इतका खर्च आहे. जिम चालवायची असेल तर दोन माणसे ठेवण्यासाठी रु.७०,०००/- महिन्याला खर्च येतो. एक महिला बचत गट असेल, ज्येष्ठ नागरीक संघ असेल, प्रतिष्ठाण असेल मी उपसूचना देते, या लोकांना काम द्यावे. त्यांच्यावर स्कॉड नेमावे. ते खरोखर जिमचा वापर करतात का. शहरात किती जिम आहेत. पुस्तके गहाळ झाली आहेत. बजत गट किंवा मित्रमंडळाला चालवायला दिलेतर आपला माणूस जातो. किती दिल्या होत्या. त्याची लिखापढी होते. नंतरच प्रतिकार केला जातो. या पद्धतीने त्याचे नियोजन व्हावे. वेळ नाही. सहा महिन्यांतून अहवाल घ्यावा. आपण यांना या कामासाठी रु.१०,०००/- द्यावेत अशी विनंती करते. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणा-या सर्व प्रभागातील सार्वजनिक वाचनालय त्या-त्या प्रभागातील ज्येष्ठ

नागरीक संघ, महिला बचत गट यांच्याकडे चालविण्यास देण्यास व त्यांना प्रतिमहा १०००० रु. मानधन देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६२७ विषय क्रमांक - ३
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.सावा/२/कावि/१९६/२०१४
दि.११/१२/२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.९९८० दिनांक २३/१२/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या सार्वजनिक वाचनालयातील जीर्ण व गहाळ पुस्तकांवर यापूर्वी मार्च १९९८ अखेर मा.महापालिका सभा ठराव क्र.४३३७ दि.१८/०९/२००० व शासन निर्णयानुसार आदेश क्र.सावा/२/कावि/४५/०६ दि.१०/०३/२००६ अन्वये निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर ठरावानुसार दर पाच वर्षांनी सार्वजनिक वाचनालयातील जीर्ण व गहाळ पुस्तके निर्लेखित करण्याबाबत निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांनी नेमलेल्या पुस्तके निर्लेखन त्रिसदस्य समितीतील सदस्य १) मा.मुख्य लेखापरिक्षक, २) मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) व ३) मा.सहा.आयुक्त (शाखाप्रमुख) यांचेमार्फत १) केंद्रशासनाचे आदेश क्र.ओ.एम.क्र.२३(७) इ११(ओ)/८३ आणि सी.ऐ.जी.यु.ओ.क्र. १९६४ टी.ए. दोन २१-८३ दि.२३/१२/८३ व २) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.म.आ.ख.१०८८/ प्र.क.३०/विनिमय मंत्रालय, मुंबई -४०००३२ दि.२/१२/१९९१ अन्वये १८ सार्वजनिक वाचनालयातील प्रस्तावात नमूद प्रपत्र “अ ”मधील १८ सार्वजनिक वाचनालयातील एकूण २,७८८ गहाळ पुस्तके र.रू.१,७७,२०५=३५(अक्षरी र.रू. एक लाख सत्त्याहत्तर हजार दोनशे पाच पैसे पस्तीस फक्त) यावर निर्लेखित करण्याची कार्यवाही केली असून त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या सर्व प्रभागातील सार्वजनिक वाचनालय त्या-त्या प्रभागातील ज्येष्ठ नागरीक संघ. महिला बचत गट यांच्याकडे चालविण्यास देण्यास व त्यांना प्रतिमहा १०००० रु. मानधन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.सुनिता वाघेरे,मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१००८७ दिनांक २३/१२/२०१४

नमूद केलेल्या व्यक्तींना घरगुती वापरासाठी एक नळ कनेक्शन हद्दीबाहेर से.२३ आशीर्वाद कॉलनी अप्पू घर शेजारी,निगडी,पुणे येथे देणेस मान्यता देणेत येत आहे.

१) श्री.गणेश श्रीपती लिमये, २) अरुंधती गणेश लिमये,
३) सुरेश के. शर्मा, ४) नरेश शर्मा,
५) श्री.लगड, ६) श्री.पाटील

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४चा विचार माहे मे २०१५ चे सभेत करणेत यावा, अशी मी सूचना मांडते.

**मा.सुनिता गवळी** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६२८ विषय क्रमांक - ४
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सुनिता वाघेरे,मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१००८७ दिनांक २३/१२/२०१४

विषय क्रमांक ४ चा विचार माहे मे-२०१५ चे सभेत करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/५/कावि/४०१/१४ दि.१६/१२/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०१९४ दिनांक ३०/१२/२०१४

सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींची फी/शुल्क सोबतचे प्रपत्र अ व ब प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे कर व करेत्तर बाबींचे दर हे सन २०१४-२०१५चे दराप्रमाणे कायम ठेवून कोणतीही करवाढ न करता मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या कराच्या विषयावर माझी सूचना आहे की, सध्या आपल्या पालिकेची करप्रणाली संगणकीकृत आहे. नागरीक ऑनलाईन पद्धतीने मिळकत कर भरतात. त्यामुळे पूर्ण कर भरला जातो मिळकत कर थकबाकी नसल्याचा दाखला कोणाला हवा असेलतर तो ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात यावा. दाखला मिळण्यासाठी दोन/तीन दिवसांचा कालावधी लागतो तो लागणार नाही व नागरीकांची गैरसोय होणार नाही याची निश्चितपणे दखल घ्यावी.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कर बदलाचा हा विषय आहे. मला एका गोष्टीची माहिती हवी आहे. जेएनएनयूआरएममार्फत जे पुनर्वसन प्रकल्प राबविले आहेत, त्या घरांवर जो टॅक्स लावला आहे तो प्राधिकरणाच्या रेटनुसार आहे. इथे झोपडपट्टीतून पुनर्वसित झालेले नागरीक आहेत. ते गोरगरीब नागरीक आहेत. त्यांना हे दर लावणे हे त्यांच्यावर अन्यायकारक आहे. ७/८ हजार भरायचे असतील तर त्यांनी काय करायचे. हा दूजाभाव आहे. शासनाने मागासवर्गीय कल्याणमधील लोकांसाठी कमी दर लावावेत असे निकष आहेत. आपण असे का केले याची माहिती हवी आहे.

**मा.महापालिका आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सदस्यांनी नोटीस केलेला मुद्दा रास्त व योग्य आहे. आपण एका बाजूला झोपडपट्टीतील, दारिद्रयरेषेखालील लोकांचे पुनर्वसन करतो. परत त्यांच्यावर प्रॉपर्टी टॅक्स लावतो. यात शहरासाठी महाराष्ट्र शासनाच्या ज्या काही पुनर्वसन स्किमस् आहेत, त्यात हाऊसिंग विभागाने एक जी.आर काढला आहे. त्यांनी ५ वर्षांचा गॅप दिलेला आहे. सहाव्या वर्षी संपूर्ण टॅक्स भरायचा आहे. गॅप दिलेला आहे. हा निर्णय आपल्याकडे अद्याप लागू केलेला नाही असे दिसतेय. महाराष्ट्रात लागू असल्यामुळे आपल्याकडे सुद्धा लागू करावा. त्याचा काही फायदा बीएसयूपी व इडब्ल्यूएस घरांना आहे. तो

द्यावा असे आपल्याला वाटते आहे. तो स्लॅब आहे, पहिल्या वर्षी २० टक्के नंतर ४० टक्के अशी योजना आहे. आपले वेगळे धोरण न ठेवता आपण शासनाचे धोरण अवलंबवू या. शासनाने दिलेल्या सवलतीचा आधी फायदा घेऊ. करसंकलन विभाग आहे त्याचा आधी अभ्यास करु. गरज वाटली तर परत येऊ. पण त्याची अंमलबजावणी आधी करु.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, नागरीकांना ज्या नोटीसा दिल्या आहेत, त्या मागे घ्याव्यात.

**मा.महापालिका आयुक्त** - नोटीसा दिलेल्या आहेत. पण जी.आर. लागू करुन जेवढे रिकव्हरेबल आहेत, तेवढे घेऊ या. काही लोक ३ वर्षांपूर्वी रहायला आले असतील तर तो कालावधी गृहित धरु.

**मा.महेश लांडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,जे एक्ससर्वीसमन आहेत त्यांना आपण करात सवलत देत होतो ती सवलत बंद का केली आहे. यासंदर्भात अधिका-यांनी मला माहिती द्यावी. या गोष्टीला कारण काय. कराचे शुल्क वाढवताना कमीत कमी त्या विभागाचा प्रस्ताव आला किंवा माहिती आलीतर त्याच्या आधारे एवढे शुल्क वाढवू नका किंवा कमी करु नका अक्षरशः त्यांना करणे अवघड आहे. एक एक्ससर्वीसमन माझ्याकडे आला होता, त्याने पत्र दिले आहे. याटॅक्ससंदर्भात महापालिकेने नियम परत बदललेला आहे. टॅक्स वाढविताना कमीत कमी त्या ठिकाणी टॅक्स न वाढवता, दुस-या ठिकाणी शुल्क न वाढवता, जिथे जास्त प्रमाणात उत्पन्न मिळू शकते तिथे टॅक्स वाढवला तर त्याला माझी हरकत असणार नाही. जिथे लोकांची नाराजी ओढवून घ्यावी लागते अशा ठिकाणी कोणत्याही प्रकारचे शुल्क वाढवू नये.

**मा.प्रशांत शितोळे** -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, हा कराचा विषय पाहिलातर कोणतीही करवाढ न करता असे म्हटले आहे. मागे तक्ता दिला आहे त्यात बघा. प्रपत्र या विषयाला लागू होणार का ते सांगा.

**मा.महापालिका आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, आमचा प्रस्ताव काढला आहे. स्थायी समितीचा ठराव आपल्या समोर आला आहे. मूळ प्रस्ताव व स्थायी समितीचा ठराव याचा विचार करुन निर्णय घ्यावा अशी अपेक्षा आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,कुठलीही करवाढ न करता याला शंभर टक्के मान्यता आहे. परंतू मागील चार वर्षांपूर्वीचे ब-याच लोकांना आठवत असेल, आम्ही थोड्या करवाढीला मान्यता दिली. अग्निशामक करात टक्के वाढ केली आहे. शासनाने अग्निशामक कर बंधनकारक केला आहे. अग्निशामक कर घेत असलोतरी आमचे सर्वसाधारण मत आहे, ज्या घरांना अग्निशामक व्यवस्था लागत नसेल तर अशा घरांची टक्केवारी कमी असावी. शासनाचे बंधन मान्य आहे. शंभर टक्के निवासी आहेत तिथे २ टक्के कर वाढला पाहीजे. तिथे अग्निशामक यंत्रणा बसवायची गरज नसते. तुम्ही आम्हाला हा तक्ता दिला आहे.

प्रत्येक तक्त्यात एक ते दोन टक्के वाढ आहे. ही वाढ कोणत्याही परिस्थितीत आम्हाला मंजूर नाही. विषय मंजूर करत असताना आहे त्याच परिस्थितीत मंजूर करा. कोणतीही दरवाढ मंजूर न करता हा विषय मंजूर करावा.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय पहिल्यांदा मा.स्थायी समितीकडून विषय आला आहे. त्यात दुरुस्ती करण्यात आली होती. त्यात उपसूचना देते, सन २०१४-१५ असे म्हटले गेले आहे तिथे सन २०१५-१६ असा मजकूर समाविष्ट व्हावा. त्यात दिले आहे, सामान्य करात एक्ससर्वीसमन असेल, अंध-अपंग असेल, महिला असेल तसेच सामान्य करातील सर्व सुधारीत दर मागील वर्षी जसे होते, ते तसेच समाविष्ट करण्यात यावेत. अंध/अपंगांचे राहून गेले आहे, तो विषय त्यात घेण्यात यावा. उपसूचना दिली आहे. ऑन लाईन पद्धतीने मिळकत कर भरला जात असेल तर पूर्ण मिळकत कर भरणा-याला तो भरल्याचा थकबाकी नसल्याचा दाखला व मिळकत उतारा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात यावा. मा.प्रशांत शितोळे यांनी सांगितले होते, जसा मा.स्थायी समितीने विषय घेतला होता, कोणत्याही मिळकतीवर वाढ नाही. मागील वर्षी जो विषय होता, एक्ससर्वीसमन यांना सामान्य करात सवलत देण्यात यावी, याची दखल घेण्यात यावी. ही उपसूचना देते. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - जर ऑनलाईन पद्धतीने मिळकतकर भरला जात असेल तर पूर्ण कर भरणा-या मिळकतधारकास मिळकत कर थकबाकी नसलेचा दाखला व मिळकतकर उतारा ऑनलाईन उपलब्ध करुन देणेत यावा. तसेच सन २०१४-१५ ऐवजी सन २०१५-१६ हा मजकुर समाविष्ट करावा व सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे कर व करेत्तर बाबींचे दर हे या मजकुरानंतर “तसेच सामान्य करातील सर्व सवलत योजना” हा मजकूर समाविष्ट करणेत यावा. उदा. माजी सैनिक, महिला, अंध, अपंग यांना सामान्य करात मागील वर्षी जशी सवलत दिली आहे तशी सवलत देणेत यावी. या उपसूचनेसह विषय मंजुर करणेत यावा.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डॉ.श्रीकर परदेशी साहेब असताना पिंपरी चिंचवड शहरासाठी शहरातील सर्व वैद्यकीय व्यावसायिकांसाठी उद्योग परवाना फी म्हणून रु. १२००/- शुल्क आकारणार होते. तो नियमबाह्य आहे. कोणत्याही महापालिकेत अशा प्रकारचे शुल्क घेण्यात येत नाही. याबद्दल कोर्टाच्या साईटवर दिलेले आहे. सर्व डॉक्टरांनी, डॉक्टरांच्या युनियनने या विषयाला कडाडून विरोध केला आहे. एक प्रकारे व्यवसाय करताना मेडीकल प्रॅक्टीशनर यांना कर लागू होत नाही. मी इथे उपसूचना देतो. मघाशी पक्षनेत्यांनी माहिती दिली आहे, स्थायी समितीने हा विषय पारित केलेला आहे. आयुक्तांकडे डॉकेट आले आहे. या विषयाला उपसूचना देतो. कारण फेब्रुवारीमध्ये विषय मंजूर करावा लागतो. म्हणजे हा विषय दि.२० फेब्रुवारीच्या महापालिका सभेमध्ये येईल. मी उपसूचना देतो की, पिंपरी चिंचवड शहरातील सर्व वैद्यकिय व्यवसायीकांसाठी उदयोग परवाना शुल्क रद्द करणेत यावेत.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.धनंजय आल्हाट-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,यानिमित्ताने सूचना आहे. कर दरपत्रक निश्चित आहे. पाणीपुरवठा क्र.४ यात ४ टक्के कर लावला आहे. आपण नागरीकांकडून पाणीपट्टी घेतो. मग हा पाणीपुरवठा लॅपस करणार हे कोणत्या नियमाच्या आधारे घेतो, याचा खुलासा करावा. ताथवडे गाव महापालिका हद्दीत समाविष्ट झाले आहे. त्यामुळे पूर्वी शहरात विलिनीकरण झालेल्या गावांना ज्या काही सुविधा दिल्या होत्या, तेच या गावाला द्यावे अशी सूचना करतो. यासंदर्भात आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. ताथवडे गावाला जो कर लावला आहे तो जुन्या दराप्रमाणे घ्यावा अशी सूचना मांडतो. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये समाविष्ट ताथवडेगाव करण्यात आलेले आहे. परंतु ग्रामपंचायत अस्तित्वात असताना ज्या मिळकतीची नोंद ग्रामपंचायतमध्ये होती त्या मिळकतींना म्हणजे पुर्वीच्या विलीन झालेल्या गावांना कर होता म्हणजे १९९७ चा कर निश्चित करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.महेश लांडगे** - मा.महापौर साहेब, उपसुचनेला अनुमोदन देतो.

**मा.महापालिका आयुक्त-**मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, पाणीपट्टी लाभकराबद्दल खुलासा करण्याबद्दल सांगण्यात आले होते. आपल्याकडे पाणीपट्टी व पाणीपट्टी लाभकर हे वेगवेगळे आहेत. जलनिस्सारण व जलनिस्सारण लाभ कर हे वेगळे आहेत. यात कलम २३३ च्या ॲक्टमध्ये तसे आहे. ॲक्टमध्ये दोन कर ठेवायचे कारण असे आहे की, प्रत्यक्षात जे पाणी वापरायला मिळते त्यासाठी कर आहे व जे पाणी वापरतो त्यासाठी पाणीपट्टी आहे. पूर्ण शहरात वसूली करण्यासाठी जो खर्च लागतो, तो छोट्या प्रमाणात पाणीपट्टी लाभकर ठेवलेला आहे. सहा.आयुक्त, करसंकलन यांनी सांगितले तर दोन लाभकर कसे लावले जातात ते कळेल.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, करयोग्य मूल्यावर ५ टक्के ही छोटी वाढ नाही.

**मा.महापालिका आयुक्त** - हा मूळ प्रस्ताव आहे, तो स्थायी समितीसमोर गेला होता. त्यांनी वेगळा निर्णय घेत असाल, मा.महापालिका सभा कायम करत असेल तर त्याप्रमाणे रिवाईज चार्ज येईल. त्यामुळे करवाढ न करायचा निर्णय मंजूर करत आहोत.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सामान्य कर घेताना शंभर रुपये टॅक्सवर पाच टक्के वाढवलेतर रु.१०५/- झाले. ही टक्केवारी तुम्ही कशी लावली आहे. सफाई कर, अग्निशामक कर, मलप्रवाह कर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर, विशेष साफसफाई कर व वृक्ष कर हे सगळे मिळून मला किती टॅक्स लागला तो कसा कॅलक्युलेट करतो याचा खुलासा द्यावा. माझी आपल्याला विनंती आहे की, हे टॅक्सेशन टक्केवारीवरुन किती टक्के पाडतेय याचे सविस्तर स्पष्टिकरण द्या.

**मा.महेश लांडगे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आपण सिनेमा,मराठी सिनेमा,वातानुकुलित थिएटर, नाटक, तमाशा, संगित जलसे व सहावे कुस्ती व मुष्टीयुद्ध यांनासुद्धा तुम्ही कर आकारताय. कमीतकमी खेळावर तरी कर आकारु नका. शहरामध्ये फक्त कुस्ती व मुष्टीयुद्ध हे दोनच इव्हेंट होतात का. आपल्याला शहरात या स्पर्धा होऊ नयेत असे वाटतेय का. काय त्रास आहे. क्रिकेटच्या इव्हेंट होतात, फूटबॉलच्या होतात, हॉकीच्या होतात, लॉनटेनिस, टेबलटेनिस होते, स्केटिंग होते, मॅरेथॉन होते. तुम्हाला बलवान कोण दिसेल. या खेळावर कर लावावा असे का वाटले. जरी हा विषय तुमच्यासाठी मजेचा असला तरी तो मा.महेश लांडगे यांच्या स्वाभिमानाचा विषय आहे. महेश लांडगे हा कुठल्याही शहराशी निगडीत नाही. पिंपरी मतदार संघात गौतम चाबुकस्वार बॉक्सर आहेत. मा.सदगुरु कदम हे नगरसेवक चांगले बॉक्सर आहेत. तुम्हाला नक्की काय करायचे आहे ते कळत नाही. मी प्रत्येक वेळी सभागृहामध्ये ओरडलो आहे. तेवढी तरी जागा सोडा. कोणाला त्रास होऊ नये असे ठिकाणी खेळ खेळायला द्या. परत असे विषय येऊ देऊ नका. जर विषय आलेच तर पूर्ण खेळाबाबतींत येऊ द्या. तुम्ही एकप्रकारे खेळाचा व आमच्या खेळाडूंचा अपमान करताय. एकंदरीत या महापालिकेत दोन्ही खेळांकडे दूर्लक्ष होते आहे भोसरीतले कै.खाशाबा जाधव यांनी भारतात पहिले मेडल आणले होते. आत्ता कुस्ती व हॉकी मध्ये विजय, नरसिंग व बॉक्सिंगमध्ये मेरीकॉमला मेडल दिले आहे. तुमच्या दुस-या खेळांनी दिले का. त्यांचा अपमान का करताय. हे खेळाडू देशात तुमचे नाव काढतात. त्यांचा अपमान का करताय. असे विषय पुन्हा या सभागृहापुढे किंवा कोणत्याही विषयपत्रिकेवर आले नाही पाहीजेत.

**मा.धनंजय आल्हाट-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, पाणीपुरवठा लाभ कर, तो ऍक्ट वाचून दाखवा. मलप्रवाह सुविधा कर जेएनएनआरएम मधून फंड मिळतो. ब-याच भागांत ड्रेनेज सुविधा झालीतर तिथे मलप्रवाह सुविधा कर घेतला जातो. दोन्ही ऍक्ट वाचून दाखवावेत.

**मा.महापालिका आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, आपल्याकडे महाराष्ट्र मनपा अधिनियमात कलम १२९ (ब) आहे. यानुसार मलप्रवाह सुविधा लाभ कर असे म्हणतो. कलम ११९ (क) आहे, यानुसार पाणीपुरवठा लाभ कर लावला जातो. आत्ता त्यात काही वाढ नाही, मागील वर्षांचेच दर लावतोय. सरसकट कोणतीही वाढ मंजूर करत नाही आहोत.

**मा.दत्ता साने-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जे करयोग्य मूल्य लावले आहे. डॉकेट आहे. त्यात सामान्य कर शंभर रुपये आहे. त्यावर किती टॅक्स येणार आहे. करआकारणी कशी केली जाते ते सभागृहाला कळू द्या

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, मा.सभागृह, करआकारणी केली जाते तेव्हा पहिल्यांदा मिळकतीचे करयोग्य मूल्य निश्चित केले जाते. त्या टक्केवारीमध्ये सामान्य कर, शिक्षण कर लावला जातो. करयोग्य मूल्य निश्चित करण्यासाठी वर्षातून एकदा एप्रिलमध्ये दर निश्चित करतो. रेडी रेकनरच्या दराच्या प्रपोर्शनमध्ये व मिळकतीच्या प्रकाराची प्रोव्हीजन केली आहे. आर.सी.सी. बांधकाम आहे, पत्राशेड आहे, वीट बांधकाम आहे, त्याप्रमाणे दर आकारला जातो. तसेच महापालिका क्षेत्राचे अ,ब,क व ड असे चार भाग केलेले आहेत. त्या

प्रत्येक भागाचे दर वेगळे आहेत. निवासीचा दर वेगळा आहे, बिगरनिवासीचा दर वेगळा आहे. निवासीसाठी अ भागामध्ये रु.२८/- प्रति स्क्वे. फूट दर आहे, बिगरनिवासीसाठी रु.८५/- प्रति स्क्वे.फूट असा दर आहे. पार्किंग एरियासाठी सुद्धा दर आहेत. औद्योगिक मिळकतीला वेगळा दर आहे. ज्यादिवशी आपल्या मिळकतीचे करयोग्य मूल्य निश्चित करण्यासाठी १ एप्रिलपासून दर निश्चित केले जातात. हे दर त्या मिळकतीला कायम लागू राहतात. करयोग्य मूल्य निश्चित झाल्यानंतर करयोग्य मूल्याच्या किती टक्के सामान्य कर लावला जाईल याचा तक्ता आहे. तो आत्ता प्रस्तावित केला होता. सामान्य कर करयोग्य मूल्याच्या १३ टक्यांपासून २४ टक्यांपर्यंत पूर्ण केला जातो. त्यानंतर वेगवेगळ्या करयोग्य मूल्याच्या प्रमाणात किती टक्के आहेत, म्हणजे आत्ता जे दर निश्चित आहेत, ते एकूण करयोग्य मूल्याच्या ४२ टक्यांपासून ५३ टक्यांपर्यंत निवासीसाठी व बिगरनिवासीसाठी ५८ टक्यांपासून ६८ टक्यांपर्यंत दर निश्चित आहेत.

**मा.दत्ता साने-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, एक सोप्पा प्रश्न विचारतो, माझी १,००० स्क्वे.फूटाची निवासी प्रॉपर्टी आहे, त्याचे कॅल्क्युलेशन करुन किती कर येणार आहे ते सांगावे.

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त)-**मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, १,००० स्क्वे.फूटाची मिळकत असेल तर रु.२८/- प्रमाणे करयोग्य मूल्य निश्चित होईल रु.२८,०००/- आणि त्याच्या ४२ टक्यांप्रमाणे मूल्य लागेल.

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.महापौर साहेब, सामान्य कराच्या किती टक्के कर लावताय ते सांगा.

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त)-**मा.महापौर साहेब सामान्य कर ४२ टक्के असेल. तर १३ टक्केच्या अगेंस्ट जी वाढ होते ती.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.दत्ता साने तुमचे करयोग्य मूल्य रु.२८,०००/- होणार आहे. त्या रु.२८,०००/- वर ४२ टक्के टॅक्स लागणार आहे. आपले याकडे दूर्लक्ष होते आहे हे मला सभागृहाला सांगायचे आहे.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.गायकवाड साहेब याचे कॅल्क्युलेशन करुन सांगा. माझी अ प्रभागात १,००० स्क्वे. फूटाची निवासी प्रॉपर्टी आहे, त्याचे करयोग्य मूल्य सविस्तर सांगा.

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त)**-मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, १,००० स्क्वे. फुटाचे आर.सी.सी. बांधकाम असेल, तर रु.२८.५१/- प्रमाणे त्या मिळकतीचे करयोग्य मूल्य रु.२८,५१०/- होईल. त्याचे ४२ टक्के प्रमाणे रु.१३,०००/- वार्षीक कर होईल. टोटल सांगतोय. त्यात सामान्य कर १५ टक्के म्हणजे ४२ टक्यांमध्ये १५ टक्के आहे.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आपण शासनाकडे किती रक्कम भरतोय व महापालिकेकडे किती जातात ते सांगा.

**मा.महापालिका आयुक्त** - आत्ता त्यांनी जे सांगितले ते प्रथम करा करयोग्य मूल्य काढायला ४२ टक्के ते १५ टक्के मूल्य करा असे ते सांगत आहेत १५/१६ टक्यांमध्ये ३२/३३ टक्के मूळ कर व बाकी इतर कर आहेत असे त्यातून दिसते आहे. टोटल ४२ टक्के कर आहे.
**मा.गायकवाड** - सामान्य कर जास्त आहे. बाकी कर ५ टक्के, २ टक्के, ४ टक्के असा आहे.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, यात सामान्य कर एकपट व सगळे कर दुप्पट आहेत.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमच्याकडे सर्वसामान्य नागरीक येतात. त्यांना आलेले टॅक्सचे बील दाखवतात. हे कॅल्क्युलेशन कसे करावे हे आमच्या कधी डोक्यात येत नाही. आपला माणूस कशा पद्धतीने टॅक्स लावतो ते समजून सांगत नाहीत. सामान्य कराला ५ टक्के, २ टक्के असा वाढीव कर किती जातो. एकूण शासनाला आपण किती कर भरतो व सामान्य कर किती याची एक हजार स्क्वे. फूटाप्रमाणे माहिती द्या.

**मा.महापालिका आयुक्त** - मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, एकूण करमूल्य याचे ४२ टक्के, यातून १५ टक्के मूळ कर तो प्राईम कर येतो. ४२ टक्के मूळ कर व सगळे इतर कर असे मिळून म्हणजे रु.१००/- हा मूळ कर व बाकी सगळे कर रु.२००/- असे मिळून रु.३००/- होतात.

**मा.महापौर** - नाव सांगितल्यानंतर उभे रहावे.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच करासंदर्भात आपल्यासमोर प्रश्न आहे. त्यात मी सांगू इच्छितो की, बोपखेल गणेशनगर, रामनगर इथे एसटीपी प्लँट नाही. म्हणून तिथे महापालिकेकडून ड्रेनेजचे कनेक्शन करुन दिले जात नाही. लोकांनी स्वतःचे सेफ्टी टँक बनवले आहेत. महापालिकेची गाडी मागवल्यानंतर रितसर फि घेतली जाते. तरीसुद्धा या भागात मल सुविधा कर इथे लावतोय, तो लावू नये. किंवा तुम्ही इथे गाडी पाठवताय त्याची फी तरी आकारु नये. इथे फी घेतात. कनेक्शन करुन देत नाहीत. हा तिथे राहणा-या नागरीकांवर अन्याय आहे. माझी आपल्याला विनंती राहील की, मा.महापौर आपण आयुक्तांना सूचना कराव्यात. बोपखेल इथे एसटीपी प्लॅन होत नाही, तोपर्यंत मल सुविधा कर आकारु नये. पुढीलप्रमाणे उपसूचना मी या विषयाला देतो - बोपखेल,रामनगर,गणेशनगर तसेच शहरात ज्या-ज्या ठिकाणी STP Plants नाहीत अशा परिसरातील करसंकलन विभागाकडून मलसुविधा लाभकर आकारण्यात येतो तो कर आकारु नये किंवा सेफ्टी टँक (घरगुती) मधुन उपसा करण्यासाठी महापालिकेकडून जी फी/कर आकारला जातो तो आकारु नये.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, आत्ता मा.संजय काटे यांनी मल सुविधा कराबाबत जो विषय मांडला. परंतू आपण पिंपरी चिंचवडच्या एमआयडीसीमध्ये ड्रेनेज सुविधा कुठेही देत नाही. मी अनेक वर्षांपासून लघुउद्योजकांचा प्रतिनिधी म्हणून बोलत असतो इथे सुद्धा बोपखेल प्रमाणे हा कर लावू नये अशी अपेक्षा आहे. कर योग्य मूल्य, सामान्य करातील रक्कम रु.३०,०००/- पुढे किंवा रु.१,००,०००/- कर योग्य मूल्य असेलतर तुमचे २४ टक्के कर आहे.

त्याप्रमाणे सुविधा ५ टक्के येते. रु.५,०००/- अशी टोटल. कर योग्य मूल्य रु.१,००,०००/- असेल तर वर्षाला रु.४७,०००/- इतका टॅक्स होतो. मा.दत्ता साने यांनी विचारलेल्या प्रश्नांना जी उत्तरे दिली आहेत, ती बरोबर आहेत का. ही सामान्य करावरील टक्केवारी नाही. ही कर योग्य मूल्यावर डायरेक्टली आहे. म्हणजे ४७ टक्के टॅक्स हा डायरेक्टली कर योग्य मूल्यावर होतो आहे.

**मा.बाबासाहेब धुमाळ-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, तुमच्या आकडेवारीचा हा घोळ काय चालला आहे. समजत नाही. जो टॅक्स भरतो, त्याला टॅक्स का लावतोय. महिलांच्या नावावर घर आहे त्याला कमी टॅक्स लावतोय. याचा भविष्यात विचार केला आहे का. म्हणजे जो रु.८८,०००/- टॅक्स भरतोय, त्याने बायकोच्या नावावर घर घेतले तर त्याला रु.५०,०००/- इतकाच टॅक्स येईल. महिलांच्या नावावर घर करणे याला माझा विरोध नाही. जो टॅक्स जास्त भरतो, त्याला १६ ते १८ टक्के जास्त काय देताय. जो पहिला टॅक्स देत होतो, तोच परवडतोय. पाणीपुरवठा लाभ कर ही काय भानगड आहे. महापालिकेच्या सुविधेचा लाभ घेतात त्यावर सुद्धा वेगळा कर लावताय. टॅक्स भरणा-यांना जास्त टॅक्स लावताय. पाणी बील भरतोय, सुविधा कर भरतोय. वर्षाला रु.१२,०००/- टॅक्स भरतोय, त्यानंतरही २ टक्के टॅक्स लावताय. मूळ रकमेवर भरणार का. त्याचे करयोग्यमूल्य कोण भरतोय.

**मा.महापालिका आयुक्त** - मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, रु.१२,०००/- टॅक्स आहे. त्याचे करयोग्यमूल्य वेगळे आहे. रु.१२,०००/- ही रक्कम सगळे मिळून आहे. जे जास्त पैसे भरतात त्यांना जास्त टक्के आहे हे सगळ्या महापालिकेतच आहे. जो जास्त एरिया सांभाळतो, त्याच्याकडे जास्त पैसे असतात. एरियाच्या प्रपोर्शनप्रमाणे दर आहेत.

**मा.बाबासाहेब धुमाळ-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुम्ही चुकीचे उत्तर दिले आहे ज्याच्याकडे जास्त एरिया असतो, त्याच्याकडे जास्त पैसे असतात पण असे कधी कधी नसते. त्या माणसाचा मुले कधी परदेशी किंवा बाहेरगावी असतील,तो घरात एकटाच असतो. घरात ज्येष्ठ नागरीक असतात. महिलांना सूट दिली आहे अशा ज्येष्ठ नागरीकांना मिळकत करामध्ये सूट द्या. तशी रु.१२,०००/-करयोग्य मूल्य लिहून त्याच्यावर टॅक्स ॲड करणार का मूल्य रु.८,०००/- दिलेले आहे, त्यावर टॅक्स लावणार का.

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,मघाशी सांगितल्याप्रमाणे ज्या इमारतीचे पहिल्यांदा करयोग्य मूल्य निश्चित केले जाते. ज्यावेळी आकारणीसाठी ते माझ्याकडे येईल. करयोग्य मूल्य निश्चित करण्याचे निकष आहेत. आरसीसी बांधकाम, वीट बांधकाम याचे दर वेगवेगळे आहेत. आपल्या बीलावर स्पष्टपणे एरिया स्पष्ट केला आहे. तुमचे एकूण क्षेत्र किती आहे, त्याचे करयोग्य मूल्य किती आहे. त्याचबरोबर त्या बीलाच्या डाव्या बाजूला सामान्य कर किती घेतोय, साफसफाई कर किती टक्के घेतोय, शिक्षण कर किती घेतोय, हे स्पष्टपणे नमूद आहे. त्याच्या आधारावर दरवर्षी कराचे बील निश्चित केली जातात. ज्यावेळी आपल्याकडे ही इमारत असेसमेंटसाठी येईल, त्या वर्षाचे कर योग्य मूल्य निश्चितच दिले आहे. त्यावरच पुढे किती टक्के लावायचे हे दि.२० फेब्रुवारी पूर्वी मा.महापालिका सभेत

निश्चित करतो. आपल्या महापालिकेचा कर निश्चितीचा दर ४२ टक्यांपासून ४७ टक्यांपर्यंत आहे. त्याचे करयोग्यमूल्य रु.१२००/- पर्यंत आहे. तेवढ्या ठिकाणी निश्चित असेल. रु.८,०००/- असेल तर रु.८,०००/- लावणार. त्याठिकाणी रु.१२,०००/- मध्ये असेल तर रु.१२००/- असेल, तर हा रु.१२००/- चा स्लॅब आकारला जाईल. या सगळ्या गोष्टी बीलावर स्पष्टपणे नमूद केलेल्या असतात हे सगळ्यांनी लक्षात घ्यावे.

**मा.सुलभा ऊबाळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,मा.दत्ता काकांचे अभिनंदन आहे. खरेतर या विषयाकडे सभागृहातील नगरसेवकांचे लक्ष वेधले आहे त्याबद्दल मी धन्यवाद देते. आमच्याकडे नागरीक मिळकत कराची पावती घेऊन येतात. एकही नगरसेवक नीट उत्तर देऊ शकत नाही. येथे मिळकत कराचा विषय आहे. त्याची विभागणी कायद्याप्रमाणे सुरु आहे. यात सामान्य करापेक्षा इतर कर आहेत. ते आपल्याकडे त्या पटीत जास्त भरतोय. त्याप्रमाणात शहरात सुविधा उपलब्ध होत नाहीत. त्यांच्यावर अन्यायकारक कर लादला जातोय. रेडी रेकनरप्रमाणे करयोग्य मूल्य ठरवले जाते आहे. आपल्याकडे झोनिंग केले जाते. अ,ब,क,ड असे झोनिंग आहे. त्यात आकुर्डी ते निगडी हा परिसर अ झोनमध्ये आहे. पिंपळेगुरव, सांगवी हा भाग ड झोनमध्ये आहे. परंतू प्राधिकरण भाग तो पहिल्यापासून डेव्हलप वॉर्डात असल्यामुळे, अ झोनमध्ये असल्यामुळे त्याचा रेट जास्त ठेवला होता. ड प्रभागातील पिंपळेगुरव, पिंपळे सौदागर, वाकड हा भाग पूर्वी ग्रामिण भागात येत होता, म्हणून त्याचा रेट कमी ठेवला आहे. आज रेडी रेकनरचा दर बघितला तर सगळ्यात जास्त डेव्हलपमेंट या दुसऱ्या भागात आहे. सगळीकडे समान आकारणी पाहीजे. पण तुमचे धोरण चालूच आहे. जे प्राधिकरणात राहतात ते पहिल्यापासून जास्त दराने कर भरत आले आहेत. प्राधिकरण असल्यामुळे पहिल्यापासून टॅक्सचे धोरण लावले जातेय, ते अन्यायकारक होत नाही का. मा.आयुक्त साहेब, तुम्ही महाराष्ट्राचे नेहमी उदाहरण देता. डॉ.श्रीकर परदेशी आयुक्त असताना या गोष्टीवर चर्चा केली होती. त्यांना शासनाचे आदेश लागू करायची सगळ्यात जास्त घाई असायची. तुम्हाला आत्ता विठ्ठल भोसले यांचे पत्र आणून दिले आहे. त्याची दखला घ्या. त्याचा खुलासा करा. जिथे ड्रेनेज लाईनच टाकली नाही, तिथे मलप्रवाह लाभ कर लावू नये अशी सूचना करु शकतो का. किंवा जेव्हा जुने घर पाडून नवीन बांधकाम करतो, त्यावेळी नवीन बांधकामाला सरसकट नव्या रेडिरेकनरप्रमाणे टॅक्स लावतो हे चुकीचे आहे. ही जुनी घरे अधिकृत आहेत. समजा ८०० स्क्वे.फूटाचे जुने घर पाडून प्लॅनप्रमाणे अधिकृत नवीन १५०० स्क्वे. फूटाचे घर बांधलेतर त्यावर जुना ८०० स्क्वे. फुटाचा दर मायनस केला पाहीजे. जुना दर नवीन दराप्रमाणे का लावत नाही. त्यांनी प्रिमियम भरुन प्लॅन पास करुन घर बांधलेले असते. प्राधिकरणात या प्रश्नाला सर्वांना सामोरे जावे लागले. तुमचा नवीन रेडी रेकनरचा रेट प्रचंड आहे. माझ्या माहितीप्रमाणे प्राधिकरणात कोणीतरी माहिती अधिकारात माहिती घेऊन तो कोर्टात गेला. पर्टीक्युलर केसमध्ये त्याला जुन्या रेटप्रमाणे अ किंवा ब प्रभागात करुन दिले आहे. आपल्याकडे अजून कोणी कोर्टात केस केलेली नाही. अ प्रभागात जुन्या रेटप्रमाणे आकारणी करुन दिली आहे. कोर्टापर्यंत कोणी व्यक्ती गेल्यानंतर कोर्टाने आदेश दिल्याप्रमाणे तुम्ही करणार आहात का याचा खुलासा तुम्ही करा. अधिकृत घर पाडून अधिकृत घर बांधतोय तर तो जुना दर त्या प्रपोर्शनेटप्रमाणे मायनस झाला पाहीजे.

**मा.वसंत लोंढे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आपण हा कर लावतो तो सुविधा दिल्यानंतरच लावला पाहीजे. तिथे ड्रेनेज व्यवस्था नाही, रस्ता नाही, पाण्याची पाईपलाईन नाही अशा ठिकाणी कर लावता येतो का. सरसकट कर लावताय, तिथे काही सुविधा नाही. रेडझोनमध्ये ब-याच ठिकाणी ड्रेनेज लाईन नाही, रस्ता नाही, पाणी नाही, एक शाळा नाही, बालवाडी नाही, त्यांना सुद्धा कर लावतोय. यावर विचार व्हावा. रेड झोनमध्ये राहतो, तिथे काही सुविधा नाही, यावर विचार व्हावा अशी विनंती आहे.

**मा.संजय काटे-**मा.महापौर साहेब,मी मघाशी उपसूचना दिली आहे, ती आपण स्विकारली आहे का.

**मा.महापालिका आयुक्त-**मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मलनिस्सारण लाभ कर सुविधा देत नसताना हा कर घ्यायचा का नाही हा मूळ मुद्दा आहे ॲक्टमधील तरतूद व्यवस्थित सांगितली, परंतू ज्या अर्थी या सुविधा नसल्यामुळे सुविधा निर्माण करायच्या आहेत. सुविधा असेल नसेल तरी हा पाणी लाभ कर सरसकट सगळ्यांना लावला आहे. मी तुम्हाला ॲक्टमधील तरतूद दाखवतो. तुम्ही शहरात राहता ही वस्तुस्थिती आहे.

**मा.वसंत लोंढे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण सर्व कर लावताय याला आमचा विरोध नाही. पण आपण आम्हाला पाणी देत नाही मग कर कशाला लावताय.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, लाभकराचे दर तुम्ही लावले आहेत का शासनाकडून आले आहेत.

**मा.महापालिका आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, हे दर आपणच लावले आहेत. सुविधा दिल्यानंतर पाण्याचे कनेक्शन नसेल तर महापालिकेच्या हद्दीत आपण पाणीपट्टी घेत नाही.

**मा.वसंत लोंढे**-मा.महापौर साहेब, रस्त्याचे सुद्धा पैसे लावले आहेत. तिथे रेडझोनमध्ये कोणतीही सुविधा नाही. रस्ते सुद्धा केलेले नाहीत.

**मा.सुरेश म्हेत्रे-**मा.महापौर साहेब, याठिकाणी जो पाणीपुरवठा लाभकर लावला आहे, तो इन्फ्रास्ट्रक्चर धोरणानुसार आणला आहे. इन्फ्रास्ट्रक्चरवर हा कर लावला आहे का याचा खुलासा करावा. पाणीपट्टी म्हणजे पाणी वापरायचे बील आहे असे म्हणायचे आहे का. . तसे असेल तर आपल्याला जेएनएनयूआर योजनेअंतर्गत मोठा निधी मिळतोय. पाईपलाईन पुरवठाकर निधी मिळतोय. सर्व्हिस टॅक्सद्वारे केंद्राकडून पैसा मिळतोय. मग यात वाढ करायचे कारण काय. जी पद्धत लागू आहे याचा विचार करायला पाहीजे. कारण केंद्र आपल्याला याच कामासाठी पैसे देतोय. मग टॅक्स रुपाने हे पैसे जात आहेत. हा कर परत का लावताय.

**मा.गायकवाड (सहा.आयुक्त, करसंकलन)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या संदर्भातील चर्चा करत असताना सन्मा. नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केला आहे. अधिनियमाच्या कलम १२९ (अ) प्रमाणे पाणीपुरवठा सुविधा पुरवण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी भांडवली कामासाठी केलेला संपूर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागवण्यासाठी मनपाला आवश्यक वाटेल त्या कामाच्या करयोग्य मूल्याची यथास्थिती या नावाने ओळखले जाणारे अतिरिक्त पाणीपट्टी असा या पाणीपुरवठा लाभकर याचा मूळ अर्थ आहे. मिळकतधारक पाण्याचा जेवढा वापर करता, तेवढी पाणीपट्टी त्याला लागू होते. त्यासाठी त्याला सुविधा दिली जाते तो लाभकर याच्या संज्ञेअंतर्गत लावला जातो. हे करयोग्य मूल्य टक्केवारीमध्ये आकारले जाते. ज्या जुन्या मिळकती पाडल्या जातात, ती मिळकत पाडल्यानंतर त्याचा पूर्वीचा कर होता तो रद्द केला जातो आणि त्याची नवीन मिळकत म्हणून आकारणी केली जाते. ज्या तारखेला नवीन मिळकत उभी राहील त्या तारखेपासून त्याची आकारणी केली जाईल.

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, असा नियम आहे का?

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, तुम्ही पाहीले असेल तर करप्रणाली किचकट आहे. प्रशासनाला एका बाजूला वाटते, यांना काही कळू नये. तुम्ही किती समजून सांगायचा प्रयत्न केला आहे. गोंधळात वाढ केली आहे. यातले लक्षात आलेले नाही. दोन्ही बाजू आहेत. बीपीएमसी ॲक्टने शासनाने काही अधिकार दिला असेल, सर्वसामान्य सदस्यांच्या लक्षात आले असेल आपल्याला करप्रणाली ठरविण्याचे काही अधिकार दिलेले आहेत. आपण किती अधिकार वापरतोय. पण हे सगळे करत असताना शासनाकडे कमीत कमी निधी जावा. शासनाने ही टक्केवारी बंधनकारक केलेली आहे. हे बंधनकारक करत असताना आपला प्रत्येक रहिवासी म्हणून आपल्याला वाटते, धरणातून पाणी येत नाही का? एकिकडे असा विचार करत असताना दुसरीकडे असाही विचार केला पाहीजे, आपल्या शहरात जो नागरीक राहतो, त्याला प्रत्येक सुविधा देणे आपले काम आहे. गेल्या दहा वर्षातील शहराची डेव्हलपमेंट पाहिलीतर ती कराच्या जोरावर पाहीली आहे. कर काही ठिकाणी जाचक आहे. आजच्या परिस्थितीत जिथे फ्लोरेक्स टॅक्स लागतो. १६०० स्क्वे.फूटावर फ्लॅट जातो, तिथे हा कर नक्कीच जास्त वाटतो. ते कमी करणे नक्कीच तुमच्या हातात आहे. प्रशासनाने हे नक्की आमच्या समोर ठेवले आहे.
जरी आपण म्हटले की उच्चभ्रू गटांना जास्त कर असावा. हे मान्य आहे. तरी काही मिळकती अशा आहेत, आपण प्रत्येकाला वैयक्तिक विचारू शकत नाही. आत्ता मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितले, एका विशिष्ट केसमध्ये असे झाले. परंतू एका केसमध्येच असे झाले नाही पाहीजे. ती सुविधा आपण देत नाही, ती देणे योग्य होईल. मी कुठले कुठले सुख घेणार हे माझे स्वातंत्र्य आहे. आपण सगळे विचार करु. तुम्ही पाण्याची सुविधा करत नाही, ड्रेनेजची सुविधा करत नाही. च-होलीवाल्यांना, नवीन समाविष्ट गावातील लोकांना वाटते, आम्हाला काहीच सुविधा दिलेली नाही. नुसताच कर आहे, ते त्यांना पटवून द्यायला पाहीजे. भविष्यात जी डेव्हलपमेंट करणार आहोत त्यासाठी पैसे घेतोय. त्याला कदाचित वेळ लागत असेल, पण तसा ॲश्युरन्स सुद्धा दिला पाहीजे. तुम्ही त्यांना पटवून सांगितले पाहीजे ते म्हणतात, आम्हाला निधी वाढवून द्या. १० रुपयातला ५ रु. कमी करु. जुन्या गावात कमी व नवीन

गावात जास्तीत जास्त पार्ट वळवता येईल. कराचा भाग जास्तीत जास्त लोकांकडे कसा नेता येईल. आम्हाला सुद्धा वाटते, नागरीकांवर कराचा बोजा वाटू नये म्हणून करप्रणाली वाढवली तर आम्ही त्याला मान्यता देणार नाही. सगळे असताना तुम्ही करप्रणाली सुटसुटीत ठेवली पाहीजे. मला सदस्य म्हणून येऊन १३ वर्षे झालीत. या १३ वर्षांत करवाढ कमी किंवा जास्त केली आहे. त्यावर पहिल्यांदा विचार होतो आहे. साफसफाई कर, रस्ता कर किती प्रकारचे कर लावले आहेत, यात खोलात कोणी जात नाही. पण आता अशी वेळ आली आहे. जी नागरीकांची परिस्थीती आहे, काही प्रमाणात सदस्यांची तीच परिस्थिती आहे. सुविधा कमी आहेत. कुठे सुविधा कमी तर कुठे जास्त आहेत. साफसफाई व पाणीपुरवठा चांगल्या प्रमाणात असता तर कदाचित आम्ही या गोष्टीवर आज भांडलो नसतो. कर चांगल्या प्रमाणात देऊन सुद्धा आम्हाला सुविधा देत नसतील तर आम्ही सदस्यांचा यासाठी आटापिटा चालला आहे. कोणतेही अवास्तव कर घेऊ नका. त्याला मान्यता न देता मा.स्थायी समितीने सुचविलेला मूळ प्रस्ताव आहे. परिपत्रक अ,ब दिलेले आहे. त्याला सुद्धा आमची मान्यता नाही. मघाशी मा.पक्षनेत्यांनी सांगितले आहे, परिपत्रकासह मान्यता रद्द करायची आहे. आम्ही फक्त विषयाला मान्यता देतो. परिपत्रक अ व ब याचा विषयात उल्लेख करा. त्याच्यासह रद्द करावे. कोणतीही करवाढ करु नये अशा प्रकारच्या विषयाला मान्यता द्यावी म्हणून मा.महापौर यांना विनंती आहे. हा विषय मंजूर करावा.

**मा.वसंत लोंढे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,मा.प्रशांत शितोळे यांनी विचार मांडले ते योग्य आहेत. परंतू माझ्या वॉर्डात काहीच सोयी नाहीत, पाणी नाही, पाईपलाईन नाही, ड्रेनेज लाईन नाही, रस्ता नाही. ज्या भागात सुविधा दिल्या नाहीत, त्या भागातील नागरीकांच्या बीलातून १४ ते १५  टक्के कमी करा किंवा या नागरीकांना सुविधा द्या. मनुष्य पाण्यावाचून राहू  शकत नाही. तो कुठूनतरी पाणी आणणारच. तुम्हाला अधिकार आहे. टॅक्स कमी/जास्त करायचा आहे तर या नागरीकांना सुविधा द्या.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,मा.मंगलाताई कदम, मा.योगेश बहल, मा.धनंजय आल्हाट यांनी ज्या उपसूचना मांडल्या, त्या तिनही उपसूचना स्विकारण्यात येत आहेत व मा.संजय काटे यांनी मांडलेली उपसूचना स्विकारली नाही.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६२९ विषय क्रमांक - ५
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/५/कावि/४०१/१४ दि.१६/१२/२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०१९४ दिनांक ३०/१२/२०१४

सन २०१४-२०१५ ऐवजी “सन २०१५-२०१६” या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबींची फी/शुल्क सोबतचे प्रपत्र अ व ब प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देणेची

मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे कर व करेत्तर बाबींचे दर हे “तसेच सामान्य करातील सर्व सवलत योजना” उदा. माजी सैनिक, महिला, अंध अपंग यांना सामान्य करात मागील वर्षी जशी सवलत दिली आहे तशी सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे. सन २०१४-२०१५ चे दराप्रमाणे कायम ठेवून कोणतीही करवाढ न करता मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच जर ऑनलाईन पध्दतीने मिळकतकर भरला जात असेलतर पुर्ण कर भरणा-या मिळकतकरधारकास मिळकतकर थकबाकी नसलेचा दाखला व मिळकतकर उतारा ऑनलाईन उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरातील सर्व वैद्यकिय व्यवसायीकांसाठी उदयोग परवाना शुल्क रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये समाविष्ट ताथवडेगाव करण्यात आलेले आहे. परंतु ग्रामपंचायत अस्तित्वात असताना ज्या मिळकतीची नोंद ग्रामपंचायतमध्ये होती त्या मिळकतींना म्हणजे पुर्वीच्या विलीन झालेल्या गावांना कर होता म्हणजे १९९७ चा कर निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/९२५/१४ दि.२६/१२/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०२४४ दिनांक ३०/१२/२०१४

पाणीपुरवठा विभागाकडील विशेष योजना निधीमधून ररु.१२ कोटी वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षावर वर्ग करुन शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१३/प्रक.३३८/नवि-३३ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १८/०२/२०१४ अन्वये सन २०१३-१४ मध्ये येणा-या संचलनतुटीच्या ४०% रक्कमेपैकी उर्वरीत रक्कम रुपये ६/- कोटी व विविध प्रकारच्या पासेसपोटीची र.रु.६/- कोटी असे एकूण र.रु.१२,००,००,०००/- (अक्षरी र.रु.बारा कोटी) अग्रीम स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.जितेंद्र ननवरे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - प्रभाग क्र. ३९ जी.जी.स्कूल मागील नाल्याची सुधारणा करणे व दुरुस्ती काम ठेकेदार मेडी.एस.कुलकर्णी हे निविदा क्रमांक १९/२४-२०१३/१४ अन्वये करीत आहेत. विषयांकित काम जी.जी.स्कुल मागील नाल्याची सुधारणा करणे व दुरुस्तीची कामे करणे असून सदर कामाची निविदा रक्कम रु ६३,००,०१४/- इतकी आहे. जी.जी. स्कूल मागील नाल्याच्या महात्मा फुलेनगर कडील

सी.डी.वर्कच्या बाजूने नाल्याचे काम करणेची आवश्यकता असलेने ते सदर कामामधून करणेकामी सदर कामास आवश्यक र.रु. ९३,००,०१४/- पर्यंत सुधारित मान्यतेची आवश्यकता आहे. तरी प्रभाग क्र.३९ जी.जी. स्कूल मागील नाल्याची सुधारण करणे (नि.क्र.१९/२४-२०१३/१४) कामास निविदा र.रु.६३,००,०१४/- अधिक र.रु. ३०,००,०००/- असे एकुण र.रु.९३,००,०१४/- चे सुधारित खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - प्रभाग क्र. ६ मोशी येथील डीपी रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकणेचे काम चालू आहे. अद्याप बरेच डीपी रस्ते ताब्यात आलेले नाही. तापकीरनगर, इंद्रलोक कॉलनी, संतज्ञानेश्वर कॉलनी इतर परिसरामध्ये ड्रेनेजलाईन कामे झालेली नाहीत, तरी वरीलप्रमाणे चालू असलेल्या कामातून उपरोक्त वस्त्यांचे ड्रेनेज लाईन टाकणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पीएमपीएमएलच्या सगळ्यात झिरो पॉईंटवर नोटीस अशी लागली आहे की, ज्येष्ठ नागरीकांकडे पॅनकार्ड नसेलतर आम्ही तुम्हाला पास देणार नाही. मी मघाशी या विषयावर मुद्दाम बोललेले नाही. आज पासेसचा हा विषय दिला आहे. झिरो पॉईंटवर नोटीसवर नोटीस लागली आहे. यापूर्वी तुम्ही ज्येष्ठ नागरीकांना पास दिला आहेत. गेली १० वर्षे हे पास देताय. मग पॅनकार्ड कशाला घेतले पाहीजे. एखाद्या ज्येष्ठ नागरीकाकडे पॅनकार्ड नसेलतर तो कुठून देणार? त्या माणसांनी आधार कार्ड नक्की द्यावे. एस.टी. बसचे कार्ड ज्येष्ठ नागरीकांना पूर्वीपासून आहे, पण त्यांना तेथे पॅनकार्ड देणे बंधनकारक नाही. अष्टेकर साहेब तुमच्याकडून झिरो पॉईंटवर सांगितले गेले पाहीजे. नवे ज्येष्ठ नागरीक असतील तर त्यांच्याकडे एस.टी.बस चे कार्ड असेलतर या लोकांची अडवणूक झाली नाही पाहीजे. हे जे रु.१२ कोटी दिले आहेत. ते तुम्हाला अदा केलेले आहेत. ज्येष्ठ नागरीकांची अशी अडवणूक होणार असेलतर आम्हाला विचार करावा लागेल. तुम्ही नोटीसीत दिले आहे, दि.३१/३ पूर्वी हयातीचा दाखला द्यावा हे मान्य आहे. पॅनकार्ड देण्याची अट रद्द करावी अशी विनंती करते.

**मा.नंदा ताकवणे**-मा.महापौर साहेब,मा.जितेंद्र ननवरे व मा.धनंजय आल्हाट यांनी मांडलेल्या दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६३० विषय क्रमांक - ६
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/९२५/१४ दि.२६/१२/२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०२४४ दिनांक ३०/१२/२०१४

पाणीपुरवठा विभागाकडील विशेष योजना निधीमधून र.रु.१२ कोटी वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षावर वर्ग करुन शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१३/प्रक.३३८/नवि-३३ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १८/०२/२०१४ अन्वये सन २०१३-१४ मध्ये येणा-या संचलनतुटीच्या ४०% रक्कमेपैकी उर्वरीत रक्कम रुपये ६/- कोटी व विविध प्रकारच्या पासेसपोटीची र.रु.६/- कोटी असे एकूण र.रु.१२,००,००,०००/- (अक्षरी र.रु.बारा कोटी) अग्रीम स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ३९ जी.जी.स्कूल मागील नाल्याची सुधारणा करणे व दुरुस्ती काम ठेकेदार मे.डी.एस.कुलकर्णी हे निविदा क्रमांक १९/२४-२०१३/१४ अन्वये करीत आहेत. विषयांकित काम जी.जी.स्कुल मागील नाल्याची सुधारणा करणे व दुरुस्तीची कामे करणे असून सदर कामाची निविदा रक्कम रु. ६३,००,०१४/- इतकी आहे. जी.जी. स्कूल मागील नाल्याच्या महात्मा फुलेनगर कडील सी.डी.वर्कच्या बाजूने नाल्याचे काम करणेची आवश्यकता असलेने ते सदर कामामधून करणेकामी सदर कामास आवश्यक र.रु. ९३,००,०१४/- पर्यंत सुधारित मान्यतेची आवश्यकता आहे. तरी प्रभाग क्र.३९ जी.जी. स्कूल मागील नाल्याची सुधारण करणे (नि.क्र.१९/२४-२०१३/१४) कामास निविदा र.रु.६३,००,०१४/- अधिक र.रु. ३०,००,०००/- असे एकुण र.रु.९३,००,०१४/- चे सुधारित खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ६ मोशी येथील डीपी रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकणेचे काम चालू आहे. अद्याप बरेच डीपी रस्ते ताब्यात आलेले नाही. तापकीरनगर, इंद्रलोक कॉलनी, संतज्ञानेश्वर कॉलनी इतर परिसरामध्ये ड्रेनेजलाईन कामे झालेली नाहीत, तरी वरीलप्रमाणे चालू असलेल्या कामातून उपरोक्त वस्त्यांचे ड्रेनेज लाईन टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.बाळासाहेब तरस, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०२५५ दिनांक ३०/१२/२०१४

मनपा हद्दीलगत असलेले गहुंजे येथील सईनगरमधील वाघजाई सोसायटी, श्री हरीदर्शन सोसायटी व संकेत विहार येथील भागातील नागरिकांस मनपातर्फे पिण्याचे पाणीपुरवठा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वनिता थोरात** - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ चा विचार माहे मे-२००५ चे सभेत करणेत यावा.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६३१ विषय क्रमांक - ७

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.बाळासाहेब तरस, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०२५५ दिनांक ३०/१२/२०१४

विषय क्रमांक ७ चा विचार माहे मे-२०१५ चे सभेत करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४
६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५२ दि.१९/०८/२०१४
७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५७९ दि.१०/११/२०१४
८) मा.महापालिका सभा ठ.क्र.५९९ दि.२०/११/२०१४
९) मा.महापालिका सभा ठ.क्र.६१६ दि.२३/१२/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण,देहू,आळंदी,हिंजवाडी,म्हाळुंगे मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्यीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या पश्चिमेकडील १) गहुंजे, २) जांबे, ३) मारुंजी, ४) हिंजवडी, ५) माण, ६) नेरे, व ७) सांगवडे ही सात गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत असून विषय क्र.८ मध्ये नमुद केलेली अन्य गावे वगळणेस मान्यता देणेत यावी.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६३२ विषय क्रमांक - ८
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४
६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५२ दि.१९/०८/२०१४
७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५७९ दि.१०/११/२०१४
८) मा.महापालिका सभा ठ.क्र.५९९ दि.२०/११/२०१४
९) मा.महापालिका सभा ठ.क्र.६१६ दि.२३/१२/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्यीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीच्या पश्चिमेकडील १) गहुंजे, २) जांबे, ३) मारुंजी, ४) हिंजवडी, ५) माण, ६) नेरे, व ७) सांगवडे ही सात गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत असून विषय क्र.८ मध्ये नमुद केलेली अन्य गावे वगळणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५३ दि.१९/०८/२०१४

७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५८० दि.१०/११/२०१४

८) मा.महापालिका सभा ठ.क्र.६०० दि.२०/११/२०१४

९) मा.महापालिका सभा ठ.क्र.६१७ दि.२३/१२/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दीत समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे- आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई,निघोजे, देहू, विठ्ठलनगर. मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे- हिंजवडी, जांबे, माण, मारुंजी, नेरे, गहुंजे, सांगवडे वरीलप्रमाणे प्रस्ताव पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी, चाकण, मोई, कुरुळी, निघोजे, चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेत येत आहेत.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६३३ विषय क्रमांक - ९
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४
६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५३ दि.१९/०८/२०१४
७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५८० दि.१०/११/२०१४
८) मा.महापालिका सभा ठ.क्र.६०० दि.२०/११/२०१४
९) मा.महापालिका सभा ठ.क्र.६१७ दि.२३/१२/२०१४

विषय क्रमांक ९ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. भूजि/६/कावि/३६५/२०१४ दि.६/१२/२०१४
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.६२१ दि.२३/१२/२०१४

म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे ना नफा ना तोटा या तत्त्वावर मेडीकल स्टोअर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघाची मागणी आहे.सदर मेडीकल स्टोअरमधून म.न.पा.तील अधिकारी,कर्मचारी व सेवानिवृत्त्त कर्मचारी यांना योग्य व रास्त दरात औषधे उपलब्ध होणार आहे.सदर बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६६(१८), ७९(क) व ७९ (ड) चे अनुषंगाने व स्थायी ठराव क्र.७५७१ दि.५/८/१४ नुसार पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघास म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअरसाठी ५ (पाच) वर्षे भाडेकराराने व नगररचना विभाग ठरविल त्या भाडेदराने निविदा न मागविता थेट पध्दतीने जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघाची मागणी आहे.सदरची संघटना म.न.पा.कडील एकमेव शासन मान्यताप्राप्त संघटना आहे. कर्मचारी महासंघ नियोजित मेडिकल स्टोअरमधून म.न.पा.चे अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त मन.पा.कर्मचारी यांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर औषधे उपलब्ध करून देणार आहे. त्याचा फायदा म.न.पा.कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांना होणार आहे. सदरची बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६ (१८) नुसार महापालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार महापालिका कर्मचाऱ्यांच्या किंवा त्यांच्या वर्गाच्या कल्याणासाठी अन्य कोणत्याही उपाययोजना करणेबाबत तरतूद आहे.

मा.नगरसदस्या पारीत मा.स्थायी समिती ठराव क्र.७५७१ दि.५/८/२०१४ अन्वये यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअरसाठी पिं.चिं.कर्मचारी महासंघास ५ वर्षे कालावधीसाठी भाडेकराराने जागा देणेबाबत ठराव मंजूर आहे.पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघाने कर्मचा-यांच्या विविध समस्यांचे निराकरण करणेकामी मा.आयुक्त यांचे दालनामध्ये दि.२४ डिसे.२०१२ रोजी आयोजीत केलेल्या बैठकीमध्ये कर्मचारी महासंघास प्रस्तुत मेडिकल स्टोअरसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयमध्ये जागा उपलब्ध करुन देणेचे मान्य करणेत आले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे ना नफा ना तोटा या तत्त्वावर मेडीकल स्टोअर सुरु करणेबाबतची बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र अधि.कलम ६६ (१८) चे अनुषंगाने तसेच कलम ७९(क) व ७९(ड) व मा.स्थायी समिती ठराव क्र.७५७१ दि.५/८/२०१४ नुसार पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघास म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडिकल स्टोअरसाठी ५ (पाच) वर्षे भाडेकराराने नगररचना ठरविल त्या भाडेदराने निविदा न मागविता थेट पध्दतीने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,या विषयाचा आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. या विषयाची सविस्तर माहिती द्यावी. या विषयाला आमचा विरोध नाही. त्या लोकांच्या ज्या-ज्या अटी आहेत. त्यांना पूर्वी परवानगी दिली होती. त्यांनी फर्नीचर सगळे केले आहे. सगळ्या गोष्टी आहेत मग हा विषय आमच्याकडे पुन्हा कशाला आला आहे? कर्मचा-यांसाठी, नागरीकांसाठी ज्या काही योजना आहेत याला आमचा विरोध असणार नाही. पण हे तुम्हाला करता येणार आहे का? याची जबाबदारी आमची असणार नाही. सर्व जबाबदारी तुमची असणार आहे.

**मा.महापालिका आयुक्त -** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सर्वसाधारणपणे महापालिकेची कोणतीही मिळकत ११ महिन्यांच्या बेसिसवर देण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात देऊ शकतो. परंतु ३०/४० वर्षांसाठी देण्यासाठी टेंडर काढावे लागते त्याप्रमाणे आपण पुढे जायला पाहीजे असे माझे

मत आहे. याठिकाणी महापालिकेचा कर्मचारी वर्ग असल्यामुळे त्यांच्यासाठी कल्याणकारी योजनांसाठी महाराष्ट्र अधिनियमाचा कलम ६६ (१८) मध्ये मनपाच्या कर्मचा-यांच्या कल्याणासाठी आपल्याला योजना आखता येते. त्या योजनेखाली ही योजना घेतली आहे. त्यात जो शॉप देऊ केला आहे. रेडीरेकनर धोरणाप्रमाणे नगररचना यांनी ठरविल्याप्रमाणे देतोय. या दूकानातून जे मेडीसिन्स आपण कर्मचा-यांना देणार आहोत ते ना नफा ना तोटा या बेसिसवर द्यायचे ठरवले आहे. मा.सभागृह हा ठराव मंजूर करत असेल तर ती वाक्ये त्यात टाकली तर आपण इन्श्युअर होऊ की, कर्मचा-यांच्या कल्याणासाठी ही योजना केलेली आहे. अधिनियमाच्या कलम ६६ चा आधार घेतला आहे. माझा तसा प्रस्ताव नाही. नो लॉस नो प्रॉफीट या बेसिसवर देण्याचे ठरवले आहे. नो लॉस नो प्रॉफिट या बेसिसवर ही संस्था किंवा दूकान कर्मचा-यांसाठी द्यावे अशी अपेक्षा आहे.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्वांनाच ना नफा ना तोटा तत्वावर ते देणार आहेत.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, ही योजना चांगली आहे यात दुमत नाही. परंतू यात एकंदरीत ब-याचशा गोष्टी झालेल्या होत्या. आयुक्तांमार्फत हा विषय आला असला तरी भविष्यात याची काय शाश्वती आहे फक्त कर्मचा-यांसाठीच का, मग बाकी नागरीकांचा यात काय दोष आहे, या मागचा हेतू काय आहे? एखादा प्रस्ताव मनपाच्या माध्यमातून गेलाही नाही. नाव नाही. ते ना नफा ना तोटा या माध्यमातून औषधे पुरवणार आहेत. शहरात मेडीकल स्टोअर किंवा औषध याबद्दल आज सर्वांना माहित आहे,मेडीकल स्टोअरमध्ये काय चालते? हॉस्पिटलमध्ये काय चालते? हॉस्पिटलमध्ये कोणी रुग्ण ॲडमिट असेल तर एवढे बॉंडींग असते की, अमुक-अमुक मेडीकलमधून औषध आणा असे सांगतात मेडीकल स्टोअर कोणाला चालवायला द्यायचा आहे. त्यांची ते चालवायची पात्रता आहे का त्यासाठी क्वॉलिफीकेशन किंवा एज्युकेशन लागते,ते त्याच्याकडे आहे का? उद्या रोटरी क्लबसारख्यांनी कोणी म्हटले, आम्हाला महापालिका चालवायला द्या. तर ना नफा ना तोटा या तत्वावर असे होऊ शकते का? मला आठवते, काही वर्षांपूर्वी जकात नाका चालवायला देण्यासाठी मागणी केली होती. असे बरेच एनजीओ शहरात असतील. यामागील उद्देश चांगलाही सुद्धा असू शकतो. मग कर्मचा-यांप्रमाणे गोरगरीब नागरीकांनासुद्धा मेडीकल स्टोअरमधील औषधे दिलीत तर ते फायद्याचेच आहे. हार्टचे स्टॅंड पाच/सहा हजारांना असेलतर तो मार्केटमध्ये चाळीस हजारांना मिळतो. मेडीकलमध्ये पन्नास रुपयांना मिळणारी औषधाची बाटली दोनशे रुपयांना मिळते याचा सुद्धा विचार करायला पाहीजे. पण हे कितपत शक्य आहे. फक्त कर्मचा-यांपुरता विचार नाही ठेवला पाहीजे. शहरात २० लाख लोक आहेत. वायसीएममध्ये येणा-यांचा लोंढा खूप मोठा आहे. आज आमच्या माध्यमातून बील माफ करण्यासाठी नागरीक मदत मागतात. माझा स्वतःचा अनुभव आहे. वायसीएममध्ये तिथे कशा पद्धतीने ठराविक लोकांना मेडीकल स्टोअरमधून औषधे मिळतात. आमच्यासारख्या नगरसेवकांनी फोर्स केल्यावर आतमधून स्टोअरमधून औषधे पुरविली जातात. मग हे योग्य आहे का. आमचे दुमत नाही. किंवा कर्मचारी आमच्या संबंधित आहे म्हणून आम्ही त्यांच्याबद्दल सॉफ्टकॉर्नर घ्यावा इतपत

सुद्धा आम्हाला अधिकार नाहीत. तुम्ही महापालिकेच्या माध्यमातून बऱ्याचशा गोष्टी देता. मग तुम्ही देणार का याचा खुलासा तुम्हाला करावा लागणार आहे. याचसंदर्भातून भविष्यात तुमच्याकडे ब-याचशा गोष्टी येऊ शकतील. यांच्यावर ५ वर्षांनी कंट्रोल राहणार नाही. अशा गोष्टी तुमच्याकडे येऊन ठराव करुन सगळ्या गोष्टी करतात. पण प्रॅक्टीकलमध्ये त्याचे इम्प्लिमेंटेशन होते का. आम्ही सभागृ-हात बोलणार, त्यावर चर्चा करणार, तुम्ही ऐकणार, ठराव मंजूर होणार. कालांतराने यावर कोणाचे कंट्रोल राहील. मग आम्ही यावर भांडत बसायचे का? प्रत्येक गोष्टीसाठी तुमच्याकडे यायचे का.

**मा.सुलभा ऊबाळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,हा विषय सरळ जर वाचला. कोणी आम्हाला सांगितले नाही, विषय पास करण्यासाठी बोला. यात मला काही वावगे दिसत नाही. महत्वाचे म्हणजे वायसीएममधून बहुतेक वेळा बाहेरुन औषधे आणण्यासाठी चिठ्या दिल्या जातात. दहा ते बारा टक्के औषधे उपलब्ध असतात. ऑपरेशनसाठी तर काहीच नसते. आजूबाजूला मेडीकलची दुकाने आहेत त्यांचे साटेलोटे आहे असा आरोप बरेच वेळा झाला आहे. हे उघड गुपित आहे. कोणकोणाच्या पाठीमागे आहे. कोण कोणाला व्यवसाय करायला लावतोय. निश्चितपणे असे तर नाही ना, आतमध्ये सेटलमेंट झालीतर त्याच्यावर खर्च नाही, नाव नाही, तोंडी करत आहेत का. जसे मा.उल्हास शेट्टी आत्ता म्हणारे. त्यांच्यावर कोणाचे कंट्रोल आहे? रुबी अलकेअर भाड्याने दिले आहे. तिथे डॉ.कन्नोज यांची मोनोपॉली आहे. ते म्हणतील ते. त्याचप्रमाणे यांच्यावर कंट्रोल ठेवू शकणार असू तर निश्चितपणे कर्मचा-यांबरोबर इतर नागरीकांना सुद्धा सुविधा देणार आहेत. नगररचना विभागाने ठरविलेल्या दराप्रमाणे ते घेणार आहेत. म्हणजे त्यांनी फुकट मागितलेले नाही. कर्मचारी महासंघ आपला आहे म्हणण्यापेक्षा एक चांगला उपक्रम आहे. आपल्या किती मिळकती धूळ खात पडलेल्या आहेत. कोणाचे काय चालले आहे कोणाचे लक्ष नाही. जर ते मागणी करतात तर आपले काही नुकसान होत नाही मग या विषयाला विरोध का होतो आहे? ५ वर्षांसाठी आहे. तुम्ही म्हणाल त्या पलिकडे होणार नाही. डायरेक्ट स्टँडींगला एक्सटेण्ड करायचा अधिकार राहणार नाही. पुन्हा मा.महासभेपुढे विषय येईल. किंवा तुम्हाला तो ब्रेक करण्याचा अधिकार राहील जर जास्त पैसे घेतले असे करु शकता. पण करायला हरकत नाही. त्या एरियाचे जे दर आहेत त्याप्रमाणे आपल्याला भाडे मिळणार आहे. गोरगरीबांची सुद्धा सेवा होणार आहे. बरेचसे मेडीकल कोर्सेस झालेले मुले आहेत. ते स्वतः खर्च करुन या कंपन्यांची औषधे घेतात व मेडीकल स्टोअर उघडायचा पास मिळत नाही म्हणून कन्सेशनमध्ये औषधे रुग्णांना पुरवतात. आमच्याकडे नोंदणी केलेली आहे. ज्येष्ठ नागरीक संघ यांना त्यांनी सरळ सरळ सांगितले आहे, बी.पी किंवा शुगरच्या गोळ्या मेडीकल स्टोअरमध्ये शंभर रुपयाला मिळणारी गोळी आमच्याकडे रु.७५/- ला मिळेल. तुम्ही आमच्याकडे नोंदणी करा. जो मार्जिन आहे तो डायरेक्ट स्वरुपात नागरीकांपर्यंत फायद्याच्या स्वरुपात येत असेल तर करायला काही हरकत नाही. वायसीएममध्ये लो कॅटेगरी किंवा मिडल क्लासमधील लोक उपचारासाठी येतात. त्यांचा कुठेतरी फायदा होईल. माझी आपल्याला विनंती आहे, आपण काही अटीशर्ती टाकून हा ठराव मंजूर करावा.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमचा विरोध नाही. आम्ही मा.आयुक्त साहेबांना पहिल्यांदाच सांगितले होते, फक्त कर्मचारी महासंघाचीसुद्धा दिशाभूल यात होता कामा नये. यात सरळ सरळ खाली लिहिलेले आहे. ६६ (१८) चा कलम साहेबांनी सांगितला. यात काही करायचे असेल तर इतके ढकलून देता. ही आमची मंडळी आहेत. आम्हाला काही हरकत नाही. कर्मचारी असेल, अधिकारी असेल, त्यांच्या कुटूंबियांना देखील सगळ्यांना कमी रेटमध्ये औषधांचा पुरवठा करणार आहेत. मनपातील सगळ्या नागरीकांना देणार आहेत. परंतू इथून पुढे गेल्यानंतर त्यांची कुठे आडकाठी होऊ नये म्हणून प्रश्न विचारला होता. ते तुम्हाला करता आले पाहीजे. म्हणून तुम्हाला म्हटले. तुम्ही नाही म्हणू नका. कर्मचारी महासंघाचा आमच्याबद्दल गैरसमज कशाला व्हायला पाहीजे. आमचे काही म्हणणे नाही. तुम्ही सगळ्या जबाबदा-या घ्या. यात उन्नीस बीस झालेतर ती देखरेख करायची जबाबदारी प्रशासनाची, आयुक्तांची राहील. आमचा या ठरावाला विरोध नाही. सगळ्या कर्मचारी संघटना आपल्या आहेत. त्यांनी सांगितले, कर्मचारी महासंघाने यामध्ये पाच ते सहा लाख इतकी गुंतवणूक केली आहे. फर्नीचर करुन ठेवले आहे. त्यांना मंजूरी दिली पाहीजे. त्यांना आज लायसन मिळत नाही. मग तुम्ही देऊ शकणार आहात का? आम्ही परत मंजूरी देणार परत ती फाईल तुमच्याकडे येण्यासाठी धडपडणार याचा खुलासा करावा. तुम्ही सगळे करुन त्याचे कंट्रोल प्रशासनाकडे, वैद्यकीय विभागाकडे द्या. उद्या काही घडले तर ही सगळी जबाबदारी तुमची, प्रशासनाची असणार आहे सभागृहाची नाही. सभागृह त्यात सहानुभूतीपूर्वक आमची कर्मचारी संघटना चांगले काम करणार आहे. आमचा विरोध नाही. आमचे त्यांच्याशी बोलणे झालेले आहे. परत अजून ६ महिने हा विषय अडकून पडू नये हे सगळे गृहित धरुन हा विषय मंजूर करावा.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सदरचा विषय येत असताना मा.सुलभाताई ऊबाळे यांनी उल्लेख केला. परंतु यात स्पष्ट म्हटले आहे, मनपाचे कर्मचारी आजी माजी कर्मचारी म्हटले आहे,सर्वांसाठी सुविधा उपलब्ध नाही. इतर लोकांना बिझनेस करतील, एमआरपीप्रमाणे रेट असेल तो लावतील. कलम ६६ (१८) पळवाटा घेतलेल्या आहेत. कोणत्याही प्रकारची निविदा काढत नाही. कोणत्याही प्रकारची स्पर्धा करत नाही. हे करत असताना थेट पद्धतीने आपण देतोय. थेट पद्धतीने देत असताना ख-या अर्थाने व्यवसाय करायला परवानगी देतोय. मा.उल्हास शेट्टी यांनी उल्लेख केला होता. रोटरी क्लब यांनी मागे अशीच मागणी केली होती. जगभर प्रसिद्धी करणारी चॅरीटी करणारी संस्था आहे. स्वतःचे पैसे घालतात. कोणताही मोबदला घेत नाहीत. आपण त्यांना बिनानिविदा देऊ शकत नाही असे त्यांना सांगितले होते. आयुक्त साहेबांनी ११ महिन्यांसाठी परमिशन दिली होती. म्हणून त्यांनी फर्नीचर केले. याचा मा.मंगलाताई कदम यांनी उल्लेख केला आहे. किमान ५ वर्षांच्या कराराची अनुमती पाहीजे. त्यांना लायसन मिळत नाही. आयुक्तांनी आपल्या अधिकारात दिले आहे. परंतू जर त्या जनरल मेडीसीनमध्ये इतर मेडीसीन शॉपपेक्षा पिंपरी चिंचवड पालिका परिसरातील इतर शॉपसच्या तुलनेने एकदम कमी रेटमध्ये औषधे मिळाली पाहीजेत. त्यांना प्रॉफीट असावा. परंतू टक्क्यांनुसार इतर तुलनेने प्रॉफीट कमी असले पाहीजे. इतर नागरीकांना सुद्धा याचा फायदा व्हावा. यात भूमि आणि जिंदगीकडे रेफर केले. आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव

गेला. यात वैद्यकीय विभागाला अजिबात विचारलेले दिसत नाही. त्यांच्याकडे फाईल रेफर झाली नाही. जिथे मेडीसीन आहे तिथे एक्सपायरी डेट आली. चुकीचे मेडीसीन आले, तिथे गल्लत झालेतर याला कोण जबाबदार असणार आहे. ते बाईंडीग करुन घ्यावे लागणार आहे. ज्याने कोणी डीफार्म/बीफार्म केले असेल त्याला लायसन मिळणार आहे. लायसन महासंघाच्या किंवा महापालिकेच्या नावाने मिळणार नाही. म्हणून मा.मंगलाताईंनी उल्लेख केला आहे. या गोष्टी बारकाईने जबाबदारीने पहा. जागा कोणालातरी द्यायचीच आहे यात दुमत नाही. पण देताना त्यात या अटी असल्या पाहीजेत. संबंधित मेडीसीन डिस्ट्रीब्युटर जो कोणी असेल त्याची जबाबदारी असणार आहे. महापालिकेची जबाबदारी असणार नाही हे स्पष्ट नमूद केले आहे. जागा भाड्याने देण्याएवढीच आपली जबाबदारी असली पाहीजे. यात प्रशासन व सभागृह सुद्धा प्रॉब्लेममध्ये येऊ नये. कायदेशीररित्या तशा प्रकारची ॲग्रीमेंट असली पाहीजे. एमओयू तसा असला पाहीजे. वैद्यकीय विभागाकडून अभिप्राय घ्या. उद्या भूमि जिंदगी विभागाकडून मंजूरी घेतली, वैद्यकीय विभागाचा त्यात काही भाग नाही असे न होता त्यांचा कन्सर्न सुद्धा घेणे गरजेचे आहे. सवलतीच्या संदर्भात इतर नागरीकांना सुद्धा बाहेरच्या तुलनेत २/४ टक्के फायदा व्हावा. नगररचना विभाग भूईभाडे ठरवणार किंवा भूमि आणि जिंदगी विभाग ठरवेल हे भाडे इतके प्रचंड असते. हे भाडे कुठे भरणार? त्यांनी बिझनेस करावा व लोकांची सेवा सुद्धा करावी. या अटीवर त्यांना द्यावे अशी विनंती करतो.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.योगेशजी बहल म्हणाले फक्त मनपा कर्मचा-यांना ही सुविधा देणार आहोत. मा.मंगलाताई कदम म्हणाल्या नागरीकांना सुद्धा ही सुविधा देणार आहोत. सर्वांदेखत दोघांची वेगवेगळी वक्तव्ये आलेली आहेत. जर इतर लोकांनाही त्या मार्जिनल रेटमध्ये देत असतील तर काही हरकत नाही. कुठे दुखतेय तेच मला कळत नाही. विषय करायचे आहे पण गोडीत ढोससुद्धा मिळाला आहे. नक्की काय प्रॉब्लेम आहे कळत नाही. मा.आयुक्त साहेब, यापूर्वी देखील अशाप्रकारची कामे झाली आहेत. चांगल्या गोष्टीसाठी होते आहे. करायचेच आहे. आपलेच कर्मचारी आहेत. सर्वांना दृष्टीकोणात ठेवून तुम्ही करत आहात. आयुक्त साहेब, तुम्ही इथे कायम राहणार नाही त्यामुळे लिगल डिपार्टमेंटला फाईल पाठवा. सगळ्या गोष्टी तपासूनच करा. अपेक्षित गोष्टीच करा. करुच नये अशा प्रकारचे सगळे होत असेल तर मला कळत नाही नक्की त्यातून काय साध्य करायचे आहे?

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब,वास्तविक पाहता बोलण्याची आवश्यकता नव्हती. पण सुलभाताईंना का मोह आवरत नाही मला कळत नाही. या सभागृहात जे निर्णय होतात त्यात ज्यावेळी प्रशासन चुकले आहे, तेव्हा प्रशासनाला झोडपण्याआधी सत्ताधा-यांना आधी झोडपले जाते. हेच पुढे बसलेले मान्यवर ते करतात. म्हणून या गोष्टीचा खुलासा केला. उद्या आमच्यावर बोट यायला नको. हेच आज यांची बाजू खूप प्रेमाने घेत आहेत उद्या हेच म्हणतील, सत्ताधारी तुम्ही होता. तुम्ही काय केले. अशा वेळेला त्यामुळे मला महासभेत बोलावे लागते आहे. म्हणून निर्णय घेत असताना आम्ही आमची भूमिका स्पष्ट केली आहे. आम्ही या विषयाला विरोध केलेला नाही. मा.मंगलाताई यांनी काय बोलले, मा.योगेश बहल हे

काय बोलले यापेक्षा अजेंडा नीट वाचा. त्यात काय लिहिले आहे. कर्मचा-यांसाठी असे स्पष्ट म्हटले आहे. सर्व नागरीकांसाठी असे नाही. म्हणून इतर नागरीकांना त्याची सवलत देत असताना दुस-याच्या तुलनेने नागरीकांनासुद्धा सवलतीच्या दरात मिळावे अशी माझी उपसूचना आहे. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - ना नफा ना तोटा या तत्वावर मनपा कर्मचा-यांना ज्या प्रकारे औषधे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत त्याच प्रमाणे मनपा परिसरातील नागरिकांना देखील इतर सर्वसामान्य मेडिकलच्या दुकानातून मिळणाऱ्या औषधांच्या किमंतीत ५% सुट देऊन औषधे उपलब्ध करुन देण्यात यावीत म्हणजेच इतर बाजारपेठेतील जनरल मेडिसिन विक्रेत्यापेक्षा ५% कमी दराने विकण्याचे अटीवर मान्यता देणेत येत आहे तसेच सर्व अटी शर्ती, महासंघाच्या जबाबदा-या, वैदयकीय विभागाची मान्यता, कायदा विभागाचे अभिप्राय आदी गोष्टींची समायोजन करुन रितसर करारनामा मा.आयुक्त यांनी करुन घेण्याच्या अटीवर मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, उपसुचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेसहित ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६३४ विषय क्रमांक - १०
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. भूजि/६/कावि/३६५/२०१४ दि.६/१२/२०१४
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.६२१ दि.२३/१२/२०१४

म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे ना नफा ना तोटा या तत्त्वावर मेडीकल स्टोअर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघाची मागणी आहे. सदर मेडीकल स्टोअरमधून म.न.पा.तील अधिकारी,कर्मचारी व सेवानिवृत्त्त कर्मचारी यांना योग्य व रास्त दरात औषधे उपलब्ध होणार आहे.सदर बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६६(१८), ७९(क) व ७९ (ड) चे अनुषंगाने व स्थायी ठराव क्र.७५७१ दि.५/८/१४ नुसार पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघास म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअरसाठी ५ (पाच) वर्षे भाडेकराराने व नगररचना विभाग ठरविल त्या भाडेदराने निविदा न मागविता थेट पध्दतीने जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघाची मागणी आहे.सदरची संघटना म.न.पा.कडील एकमेव शासन मान्यताप्राप्त संघटना आहे.

कर्मचारी महासंघ नियोजित मेडिकल स्टोअरमधून म.न.पा.चे अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त म.न.पा.कर्मचारी यांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर औषधे उपलब्ध करुन देणार आहे. त्याचा फायदा म.न.पा.कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांना होणार आहे. सदरची बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६ (१८) नुसार महापालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार महापालिका कर्मचाऱ्यांच्या किंवा त्यांच्या वर्गाच्या कल्याणासाठी अन्य कोणत्याही उपाययोजना करणेबाबत तरतूद आहे.

मा.नगरसदस्या पारीत मा.स्थायी समिती ठराव क्र.७५७१ दि.५/८/२०१४ अन्वये यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअरसाठी पिं.चिं.कर्मचारी महासंघास ५ वर्षे कालावधीसाठी भाडेकराराने जागा देणेबाबत ठराव मंजूर आहे.पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघाने कर्मचा-यांच्या विविध समस्यांचे निराकरण करणेकामी मा.आयुक्त यांचे दालनामध्ये दि.२४ डिसे.२०१२ रोजी आयोजीत केलेल्या बैठकीमध्ये कर्मचारी महासंघास प्रस्तुत मेडिकल स्टोअरसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयमध्ये जागा उपलब्ध करुन देणेचे मान्य करणेत आले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे ना नफा ना तोटा या तत्त्वावर मेडीकल स्टोअर सुरु करणेबाबतची बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र अधि.कलम ६६ (१८) चे अनुषंगाने तसेच कलम ७९ (क) व ७९ (ड) व मा.स्थायी समिती ठराव क्र.७५७१ दि.५/८/२०१४ नुसार पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघास म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडिकल स्टोअरसाठी ५ (पाच) वर्षे भाडेकराराने नगररचना ठरविल त्या भाडेदराने निविदा न मागविता थेट पध्दतीने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच ना नफा ना तोटा या तत्वावर मनपा कर्मचा-यांना ज्या प्रकारे औषधे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत त्याच प्रमाणे मनपा परिसरातील नागरिकांना देखील इतर सर्वसामान्य मेडिकलच्या दुकानातून मिळणाऱ्या औषधांच्या किमंतीत ५%  सुट देऊन औषधे उपलब्ध करुन देण्यात यावीत म्हणजेच इतर बाजारपेठेतील जनरल मेडिसिन विक्रेत्यापेक्षा ५% कमी दराने विकण्याचे अटीवर मान्यता देणेत येत आहे तसेच सर्व अटी शर्ती, महासंघाच्या जबाबदा-या, वैदयकीय विभागाची मान्यता, कायदा विभागाचे अभिप्राय आदी गोष्टींची समायोजन करुन रितसर करारनामा मा.आयुक्त यांनी करुन घेण्याच्या अटीवर मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/२/कावि/५९८/२०१४ दिनांक ११/१२/२०१४

केंद्रशासनाचे पर्यावरण आणि वन मंत्रालय यांचा प्लॅस्टिक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०११ चे नियम २० नुसार किरकोळ व्यवसायिकाने कोणतीही कॅरीबॅग ग्राहकाला विनामुल्य उपलब्ध करुन देऊ नये, प्लॅस्टिक कॅरीबॅग्जचा पुर्नवापर व प्लॅस्टिक कचरा निर्मिती कमी होणेच्या दृष्टीने ग्राहकांना कॅरीबॅग्ज देण्याकरिता व्यवसायिकाने आकारावयाचे किमान दर निश्चित करण्याचे अधिकार संबंधित महापालिकांना देण्यात आले आहेत. तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा महाराष्ट्र प्लॅस्टिक पिशवी (उत्पादन व वापर) नियम २००६ नुसार ज्या प्लॅस्टिक पिशव्या मुळ प्लॅस्टिकपासून अथवा पुर्नचक्रीत प्लॅस्टिक पासून तयार करणेत आल्या असून त्यांची जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी व आकारमान ८ इंच x १२ इंच यापेक्षा कमी असू नयेत. महाराष्ट्र प्रदुषण नियमन मंडळ यांचे परिपत्रकानुसार महाराष्ट्र प्लॅस्टिक पिशवी (उत्पादन व वापर) नियम २००६ नुसार महाराष्ट्र राज्यामध्ये ज्या प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर वस्तुंची ने-आण करणेसाठी होतो. अशा पिशव्यांची जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी नसावी तसेच कॅरी करणेची सुविधा नसणा-या पिशव्यांची जाडी ४० मायक्रॉन पेक्षा कमी असून नये.

उक्त नियमांनुसार व्यवसायिक आणि ग्राहक यांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

६. प्लॅस्टिक कॅरी बॅगची जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी नसावी आणि सेल्फ कॅरी करणेची सुविधा नसणा-या धान्य वाहतुकीसाठी वापरत असणा-या प्लॅस्टिकच्या पिशव्यांची जाडी ४० मायक्रॉनपेक्षा कमी नसावी.

७. प्लॅस्टिक कॅरी बॅगचा आकारमान ८ x १२ इंच (२० x ३० सेमी) पेक्षा कमी नसावा.

८. किरकोळ व्यवसायिकांनी ग्राहकांना कोणतीही प्लॅस्टिक पिशवी विनामुल्य देऊ नये.

९. व्यवसायिकाने आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी स्पष्टपणे दिसेल अशा रितीने कॅरीबॅगचा आकार आणि त्याचे किमान दर तसेच ग्राहकांना स्वताची कॅरीबॅग आणण्याचे स्वातंत्र्य असून, कॅरीबॅग न आणल्यास व दुकानदाराकडून कॅरीबॅग पुरविण्याची मागणी केल्यास त्याकरिता त्याची किंमत द्यावी लागेल, असे दर्शनी भागात प्रदर्शित करावे.

१०. ग्राहकांना त्यांची स्वतःची कॅरीबॅग आणण्याचे स्वातंत्र्य आहे. ग्राहकाने कॅरीबॅग आणली नसेल आणि कॅरीबॅग देण्याची मागणी व्यवसायिकाकडे केली तर अशा परिस्थितीतच व्यवसायिकाने कॅरीबॅग विनामुल्य न देता त्यासाठी खालीलप्रमाणे दर आकारणे बंधनकारक आहे.

| अ.क्र. | प्लॅस्टिक कॅरीबॅगचा आकार | कॅरीबॅगची किमान किंमत |
|---|---|---|
| १ | साधारणत: ८ x १२ इंच | रुपये २/- |
| २ | साधारणत: १६ x२० इंच | रुपये ४/- |
| ३ | साधारणत: २० x २५ इंच | रुपये ५/- |
| ४ | साधारणत: २० x २५ इंच पेक्षा जास्त | रुपये ६/- |

**स्पष्टीकरण**

१. प्लॅस्टिक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०११ मधील प्लॅस्टिक पिशव्या (कॅरीबॅग्ज)ची व्याख्या उपरोक्त नियमांमधील कॅरीबॅग्ज किंवा प्लॅस्टिक कॅरीबॅग्ज सारखीच आहे.

२. निविदेमधील किरकोळ विक्रेते म्हणजे, दुकानदार, घाऊक विक्रेता, फेरीवाला आणि पिंपरी चिंचवड मनापा परीसरातील इतर कोणताही विक्रेता, धान्य अथवा इतर सामान वितरण करणारा, मोठे व्यवसायिक, प्लॅस्टिक कॅरीबॅगसाठी / दुकानदार / किरकोळ विक्रेते / फेरीवाले यांनी प्लॅस्टिक कॅरी बॅगसाठी वरील प्रमाणे दर आकारणे बंधनकारक आहे.

**टिप -** प्लॅस्टिक कॅरीबॅग्जचा पुर्नवापर, आणि प्लॅस्टिक कचरा कमी होणेच्या उद्देशाने प्लॅस्टिक कॅरीबॅग्जची किंमत ही पिशवी निर्माण करणेसाठी वापरावयाच्या साहित्याची किंमत व कचरा हाताळणी किंमत मिळुन निश्चित केलेली आहे.

वरील अधिसुचनांची अंमलबजावणा त्वरीत चालू करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, शहराच्या दृष्टिकोणातून महत्वाचा विषय आणला आहे. मला कळत नाही पर्यावरण मंत्रालयाने कोर्टाने प्लास्टीकच्या वापरावर बंदी घातली आहे. मग त्याच्या प्रॉडक्शनवर बंदी का घालत नाही. निर्मितीलाच बंदी घाला. पाच रुपये, एक रुपयला पिशवी आपल्याला काय करायचे आहे. माझे मत आहे, पक्षाची बैठक झाली. आम्ही याच विचाराने बोललो. आपल्या महापालिकेत कच-याची परिस्थिती इतकी भयानक आहे. प्लॅस्टीक मातीत पुरले गेलेतरी ते जमिन खराब करुन टाकते. कोणत्याही प्रकारचे तिथे येत नाहीत. याचे जागेवर सर्व समाजावर अतिशय विघातक परिणाम होत आहेत. असा विषय आला तर उद्यान विभाग, पर्यावरण विभाग एकदम ॲक्टीव्ह होणार. सगळे प्लॅस्टीक उचलणार. वैद्यकीय विभागाचे निरीक्षक आहेत. तो पैसे घेतो, सेटलमेंट करतो. रु.१०/- घेतो, रु.२०/- घेतो. मग दर उठवायला अशी बंदी ऑलरेडी आहे का. कशासाठी नागरीकांसाठी परमिशन घेतोय. पिशवीची साईज दिलेली आहे. त्या पिशव्यांची विल्हेवाट लावता येत नाही. माझी विनंती आहे, या दृष्टीने हा विषय समोर आलेला आहे. संपूर्ण शहरात आपल्या परवाना विभागाला जबाबदारी द्या. ज्या-ज्या दुकानांत अशा प्रकारची पिशव्यांची विक्री केली जाते. यातून आपल्याला उत्पन्नाचे साधन मिळणार नाही. या दुकानांना कमीत कमी ६ महिने सुट्टी दिली पाहीजे. यातून

त्रास होत असेल, हे लोकांच्या जीवाशी खेळणारे उद्योग आहेत. अशा प्रकारची प्लॅस्टीकच्या निर्मितीला बंदी असताना आपण त्याकडे दूर्लक्ष करतोय. परवाना विभाग व आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन केंद्र शासनाच्या एफडीआयकडून कंट्रोलिंग केले जाते. त्यांना आपण निर्देश द्या. अशा प्लॅस्टीकच्या वापरावर बंदीची अंमलबजावणी झाली पाहीजे. याबाबतीत कठोर निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी. मा.महापौर साहेब, हा विषय दप्तरी दाखल करा व मा आयुक्त साहेबांना असा आदेश द्यावा की,कोणत्याही स्वरुपात जीवनाला घातक आहेत. संपूर्ण पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत प्लॅस्टीकच्या वापराला व निर्मिती या दोन्ही गोष्टींना बंदी घाला.

**मा.सुलभा ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,प्लॅस्टीक बॅगजला बंदी करतोय हा स्वागतार्ह निर्णय आहे. त्याचबरोबर शहरातील बचत गट कागदी पिशव्यांचे उत्पादन करु शकतात. त्यांनाही जोडधंदा मिळेल. तशा प्रकारच्या कागदी पिशव्यांचा वापर बंधनकारक करावा. मा.महापौर साहेब, आपण आयुक्त साहेबांना तसे सांगा अशी विनंती करते. कापडी पिशव्यांच्या वापराला मंजूरी द्या. फक्त प्लॅस्टीक नको, सगळ्या प्रकारच्या पिशव्या वापरू द्या.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय योग्य आहे. प्लॅस्टीक कॅरीबॅगची जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी नसावा. त्याची साईज किती असावी. मुळात आपण या विषयाला परवानगी दिली नाही पाहीजे. आपण पर्यावरण विभागामार्फत माझ्या माहितीप्रमाणे मनपाच्या वतीने कित्येक भाजी मंडईला इथे कमी रेटमध्ये कापडी पिशल्या ठेवल्या आहेत. लोक प्लास्टीकच्या पिशव्यांमध्ये अन्न बांधून ते रस्त्यावर ठेवतात. आई अन्य जनावरे ते घेतात व खातात, ते पाडतात. प्लॅस्टिक विरघळणारे नाही. त्याची विल्हेवाट लागत नाही. तो प्राणी दगावतो. याच्यावर कोण काम करतोय ते सांगा. गार्डनमध्ये बघा. पाण्याची बॉटल घेऊन जात नाही. उदा. बर्डव्हॅलीमध्ये पाण्याची बाटली घेऊन जायला, खाद्यापदार्थ घेऊन जायला बंदी असेल तर तिथे बाटल्यांचा किती ढिगारा लागला आहे. तुम्ही बघा. तुम्ही किती ठिकाणी परवा वॉर्डात व्हिजिट केली. तुमच्या आवडीचा विषय आहे. ओपन प्लॉटमध्ये कचरा उचलायचा प्रयत्न केला. दूर्गा टेकडी इथे किती प्लॅस्टीक आहे. डिव्हायडरमध्ये किती प्लॅस्टीक बसलेले आहेत. एका संस्थेने प्लॅस्टीक उचलायचा प्रयत्न केला. लोक मेंटेनन्स करतात का हा पण प्रश्न आहे. थरमॅक्स चौकात एका वेड्या माणसाने अक्षरशः प्लॅस्टीकचा पिशव्यांचा इतका ढिगारा लावला आहे. प्लॅस्टीकच्या पिशव्यांमध्ये त्याचे अन्न होते. इथे लक्ष आहे का. नुसताच विषय आणायचा याला अर्थ आहे का. किती वर्षांपूर्वीचे प्लॅस्टीक शहरात झाले आहे. ज्या लोकांनी घेतले आहे त्यांनी काय केले आहे. याची अंमलबजावणी झाली का, झाली नाही. परत परत त्याच्यावर बरीच चर्चा झाली. सगळे बंद करा. काही प्रॉब्लेम नाही. कठोर निर्णय झाले पाहीजेत. प्रत्येकाने आपली स्वतःची पिशवी घरून आणावी. ६ महिन्यांत दूकाने बंद झाली पाहीजेत असे म्हटले तरी कमीत कमी ३ महिने तरी ही दुकाने बंद झाली पाहीजेत सगले म्हणतो गुटखा बंदी आहे. आज मेडीकल स्टोअरवर नवीन प्रकारची नशा मिळते. परवा मिलिटरी पोलिस स्टेशनमध्ये गुटखा सुद्धा मिळत होता. ११ वा.पर्यंत मेडीकल स्टोअर उघडे

राहतात. नशा करायच्या पट्ट्या मिळतात. कशासाठी आज गुटखा बंदी आहे. पान टप-या अधिकृत ठिकाणेच आहेत. हॉटेलच्या आवारात टप-या चालवतात. फूटपाथवर राजरोस २५ फूटावर टपरी असते. अधिकृतपणे हा व्यवसाय केला जातो. नुसता गुटखा नाही इतरही गोष्टी विकल्या जातात. गुटखा किती हानीकारक आहे. गुटखा पोटात विरघळला जात नाही. शंभर टक्के शहरात मिळतो. डॉ.नागकुमार कुणचगी असताना गुटखाविरोधी मोहीम झाली होती. आता ही मोहीम चालवणारे कोण आहेत. प्लॅस्टीकच्या पिशव्या जिथे मिळतात त्यांच्यावर जप्तीकरण झाले का. रोजच्या रोज हे झाले पाहीजे. शहरात जेवढ्या-जेवढ्या टप-या आहेत, तिथे दुकानांवर लिहिलेले असते, कॅन्सरला आमंत्रण. तरीसुद्धा त्याची विक्री थांबत नाही. कुठेतरी कायदे कडक केले गेले पाहीजेत. शहरात प्लॅस्टीकवर वेळीच बंदी होते, त्याचा पहिल्यांदा खुलासा करा. पहिली बंदीची अंमलबजावणी काय झाली ते पहा. आज पिंपरीमधील सगळ्या दूकानांवर रेड टाकायला सांगा. सध्या भाजीच्या दूकानांपासून मासे विक्रेत्यापासून सगळीकडे प्लॅस्टीकच्या पिशव्या मिळणार आहेत, याचा खुलासा करावा. यावर काय केले आहे. पूर्वी किती वेळा रेड टाकली आहे आणि कोण टाकणार आहे.

**मा.महापालिका आयुक्त**-मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, हा विषय ५० मायक्रॉन पिशव्यांसाठी आहे. ५० मायक्रॉन आतील पिशव्यांना राज्य शासनाने बंदी घातलेली आहे. ५० मायक्रॉनवरील पिशव्या लोकांनी घेऊ नयेत तो प्लॅस्टीकच आहे. कमीत कमी दोन रुपये ते चार रुपये भाव असावा. त्यांना डिसकरेज करण्यासाठी हा विषय आणला आहे. इनडायरेक्टली ५० मायक्रॉनवरील पिशव्या बंद करण्यासाठी हा विषय आणला आहे. ५० मायक्रॉनवरील पिशव्यांना बॅन करता येईल का. हे महाशय नाही म्हणाले. ५० मायक्रॉनवरील दर ठरवायचा अधिकार आपल्याला नाही. तो अधिकार वापरता येणार नाही अशी अपेक्षा आहे.

**मा.कुलकर्णी (कार्य.अभियंता,पर्यावरण)** - मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य,पिंपरी चिंचवड मनपाने आयुक्त यांच्या निर्देशानुसार सगळ्या प्रभागांमध्ये ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्यांवर अंमलबजावणी करण्याचा अधिकार सर्व आरोग्य कार्यकारी अधिकारी यांना २०१२ मध्ये जी.आर. काढून दिला आहे. त्यानुसार कारवाई करुन त्रैमासिक अहवाल हेडऑफीसवर पाठविण्याचे निर्देश होते. माझ्याकडे डाटा आहे. ऑक्टोबर २०१३ ते डिसेंबर २०१४ या कालावधीत ब प्रभागात चार ठिकाणी कारवाई झाली. २५ किलो प्लास्टीक व रु.१८,०००/- दंड गोळा झाला. क प्रभागात ९९ ठिकाणी कारवाई झाली. ३७.२४ किलो प्लास्टीक जप्त केले. रु.५३,८००/- दंड वसूल केला. ड प्रभागात १५ किलो प्लास्टीक जप्त केले. निरंक, दंड वसूली नाही. झिरो कारवाई झाली. इ प्रभागाचा डाटा प्राप्त नाही. फ प्रभागात १७ ठिकाणी कारवाई झाली. १८ किलो प्लास्टीक जप्त केले. रु.७६,५००/- दंड वसूल केला. २०१४ मध्ये १२० ठिकाणी डिसेंबर २०१४ पर्यंत कारवाई झाली. ११५ किलो प्लास्टीक जप्त झाले. रु.१,४८,०००/- इतका दंड वसूल केला. पुणे महापालिकेची माहिती घेतली. ५० मायक्रॉनपेक्षा कोणत्या कॅरीबॅगवर रु.१५/- दंड नियमानुसार लाएबल आहे. जी.बी.ने निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी पुढे चालू केली. त्याला व्यापा-यांनी चॅलेंज केले. मुंबई महानगरपालिका यांनी दर फायनल केले. मिनिमम अंमलबजावणी होईल, कमीतकमी रेट रहावा, प्लास्टीकचा वापर कमी व्हावा म्हणून किचकच

नियम केला आहे. नुसत्या कॅरीबॅगचा विषय आहे. प्लास्टीक नियम २००६ मध्ये अलाऊ केले आहे. अधिकार आहेत. त्यांच्यावर दंड लागू करतो. दर निश्चित करुन सांगतो.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, हे दर लावायचा अधिकार आम्हाला नाही. आम्ही त्याला परवानगी देणार नाही. कोर्टात जाणार त्याला चॅलेंज करा. दोन प्रभागांत कारवाईच केलेली नाही. अ, फ व क प्रभागात कारवाई झालेली नाही. तिथे निरंक आहे. कारवाई का होत नाही. अ प्रभागात रु.७६,०००/- दंड वसूल करुन दिले त्या तरवडे नावाच्या कर्मचा-याचा सत्कार करा. त्याला अक्षरशः चालता सुद्धा येत नाही. त्याने लोकांचा वाईटपणा का घ्यायचा. दोन प्रभागांमध्ये कारवाई का झाली नाही याची चौकशी करा. त्यांच्या अधिका-यांवर कारवाई झाली पाहीजे.

**मा.महापालिका आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सभागृहाच्या भावना योग्य आहेत. काही ठिकाणी काम करायचे व काही ठिकाणी आराम करायचा हे योग्य नाही. सरसकट सगळ्याच प्रभागांमध्ये टार्गेट दिले पाहीजे. त्याप्रमाणे कारवाई झाली पाहीजे. आत्तापर्यंत ई प्रभागाने माहिती दिली नाही. दुस-या प्रभागाने काहीच वसूली केली नाही म्हणून प्रभाग अधिका-यांना शो-कॉज नोटीस देण्यात येईल की, त्यांनी कारवाई का केली नाही.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी अत्यंत महत्वाचा विषय आहे. प्लास्टीक बंदीबद्दल व त्याच्या रेटबद्दल मोठ्या प्रमाणात डिस्कशन मोठ्या प्रमाणात चालू आहे. मा.संजय कुलकर्णी यांना अनेक वेळा फोन केला. मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जाळले जाते. त्यात सध्या काय कारवाई केली आहे. काही अधिकारी खूप चांगल्या पद्धतीने शहरात काम करतात. जे करत नाहीत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे. पकडण्याचे प्रमाण फार कमी आहे. पाहीले तर रोज प्रत्येक प्रभागात २५ ते ३० फेरिवाले असतात. त्यांच्याकडे प्लास्टीकचा वापर खूप मोठ्या प्रमाणात होतो. त्या प्रमाणात मोहीम पौर्णिमा अमावस्या अशी कारवाई कधीतरी होते. यावर निर्णय झाला पाहीजे. माझ्याकडे प्लास्टीक असेल तर कारवाई कधी होऊ शकते अशी दहशत पाहीजे. अशा प्रकारे पर्यावरण विभागाला चांगल्या प्रकारे राबता आले पाहीजे. शहरात मोठ्या प्रमाणात प्लास्टीक जाळले जाते. आजपर्यंत त्यांच्यावर काय कारवाई केली ते सांगा.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी बाकी सुद्धा विषय आहेत. किराणा मालाच्या दुकानांमध्ये लहान मुलांच्या खाऊचे इतके छोटे-छोटे पॅकेटस् असतात. त्याचे प्लॅस्टीक इतके पातळ असते,तो मुलगा खाऊ खाताना ते प्लास्टीक सुद्धा खाऊ शकतो. किराणा मालाच्या दुकानांत वेगवेगळे खाऊ असतात. त्याचबरोबर घरी भेळ इ. वस्तू आणतो. नागरीक ते कच-यात टाकत असतात. किराणा मालाच्या दुकानांवर सुद्धा तपासणी करुन कारवाई झाली पाहीजे ही विनंती आहे.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता अधिका-यांनी जो पण उल्लेख केला की, इतके इतके किलो प्लास्टीक जप्त केले. आता नवीन दुकानदारी चालू झाली आहे

आता जिथे प्लास्टीक जप्त झाले, तिथे दंड का झाला नाही. याचे काय कारण असू शकते. याच्यावर अंकुश कसा ठेवला माहिती नाही. तिथे अधिकारी जातोय. क्वांटीटी मोठ्या प्रमाणात आहे. किती ठिकाणी तडजोड केली याचा उल्लेख केला पाहीजे. यांना कुठेतरी टार्गेट द्या तेव्हा कुठेतरी कारवाई समोर येणार आहे.

**मा.भारती फरांदे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, भाजीवाले किंवा किराणा माल दुकानदार सकाळी ७.४५ पासून १०.०० वा. पर्यंत व संध्याकाळी साडे पाच सहाच्या पुढे चौकात बसलेले असतात. त्यांचा सुद्धा विचार केला गेला पाहीजे. सकाळी १० ते संध्याकाळी ६ हे वर्कींग अवर्स आहेत. त्यानंतर येऊ द्या. याचा विचार व्हावा.

**मा.जितेंद्र ननवरे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आत्ता कुमार साहेबांनी खुलासा केला. काही प्रभागांनी प्लास्टीक जम केले तर काही प्रभागांनी काहीच केले नाही. पक्षनेत्यांनी सांगितले, एकाच व्यक्तीने रु.७६,०००/- जमा केले. बाकी प्रभाग निष्क्रिय आहेत का. मध्यंतरी मुंढे साहेब होते. जकातीवर, फायनान्शियल डिस्ट्रिब्युशन यांच्यावर जबाबदारी लावली. हा भाग वेगळा आहे. पिंपरी इथे मोठमोठे डिलर, डिस्ट्रीब्युटर आहेत. त्यांच्यावर पहिली कारवाई करा. सोर्स बघा. कुठून येणार आहे. किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई केलीतरी तेथे काळा बाजार नक्की होणार आहे. सदर विभागाला सक्षम करण्यासाठी अशी कारवाई करावी.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या प्लास्टीक कचरा नियमांनुसार आपण हा विषय इथे विचारला जातो आहे. अनेकांनी उपसूचना सुद्धा मांडली आहे. पर्यावरण संदर्भात व पर्यावरणपूरक अशा गोष्टी इथे मांडू इच्छितो - खरेतर पर्यावरण हा विषय आपल्या जिवीताशी निगडीत आहे. आरोग्याशी निगडीत आहे. महापालिकेच्या वतीने पर्यावरण हा एक स्वतंत्र विभाग आहे. तिथे चांगल्या प्रकारचे काम सुरु सुद्धा आहे. परंतू प्लास्टीकच पर्यावरणासाठी जबाबदार आहे असे नाही. पर्यावरणाचा विषय चर्चेला जातो आहे. काही गोष्टी निदर्शनास आणून देऊ इच्छितो, त्यात मोशीची दगड खाण व त्याच्या बाजूला असलेले सिमेंटचे कारखाने, तिथे सिमेंटचे पाईप, ब-याच वस्तू बनतात. तिथे कारखाने आहेत. तिथे संध्याकाळी फिरलात तर तिथे हवेत सिमेंटचे प्रचंड कण दिसतात. जबरदस्त धुराचे लोट असतात. पूर्ण वातावरण दुषित झालेले असते आपल्याकडे पर्यावरण विभाग आहे. त्याठिकाणी वायू प्रदूषण इतके आहे. अनेक प्रकारे तक्रारी आल्या आहेत. वायू प्रदूषण मंडळाला तक्रारी गेल्या आहेत इथे सूचना करतो. तिथे असलेले वायू प्रदूषण दूरकरावे. लोक दूषित हवा घेतात, ते खरे आरोग्याला किती उपयोगी आहे. किती प्रदूषित आहे. जवळ जवळ ३ कि.मी. परिसरात हे प्रदूषण होते असते. आश्चर्याची गोष्ट प्रशासनाच्या निदर्शनास आणून देतो की, या कारखान्यांना पर्यावरणाची कोणत्याही प्रकारची नाहरकत प्रमाणपत्राची गरज नाही. अशा गोष्टी माझ्यासमोर आल्या पाहीजेत. मनपा हद्दीत असताना अशा प्रकारचे प्रदूषण करणारे, अशा प्रकारच्या ज्या काही बाजू आहेत. त्यांचे संपूर्ण नोंदणीकरण झाले पाहीजे. अटीशर्तीवर या परवानग्या दिल्या पाहीजेत. मनपातील नागरवस्ती असलेला हा भाग आहे. अशा ठिकाणी हा प्रोजेक्ट ठेवू नये. पर्यावरण विभागाने याची दखल घ्यावी. याचा सविस्तर अहवाल सभागृहापुढे मांडावा कुदळवाडी, चिखली परिसरात पाहिलेतर

प्रचंड प्रमाणात भंगारचा व्यवसाय चाललेला असतो. याकडे पर्यावरण डोळेझाक करते आहे. एकिकडे आपण प्लास्टीकवर बोलणार त्याला दंड ठोकणार हे सुद्धा झाले पाहीजे. इतके प्रचंड प्रदूषणात तिथे दुसरीकडे पर्यावरणाचा -हास होतो आहे, इतके प्रदूषण होते आहे. त्याकडे मात्र पर्यावरण विभाग कुचकामी ठरलेले आहे. याकडे अजिबात लक्ष दिले जात नाही. तो विभाग सक्षम असण्याची गरज आहे. पाहीजे तेवढे लक्ष दिले जात नाही. जल प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते आहे. एकिकडे पर्यावरणाचे संतुलन करताना जलपर्णी याचे टेंडर दिले आहे. त्यामुळे पाहिले तर इंद्रायणी नदी असेल, पवना नदी असेल टेंडर देऊन सुद्धा त्या ठिकाणी जलपर्णी आहे त्याच परिस्थितीत आहे. मोठ्या प्रमाणात डास,मच्छर झाले आहेत. हे प्रदूषण सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे. आपला पर्यावरण विभाग सक्षम असणे गरजेचे आहे. मोठ्या प्रमाणात कचरा निर्मूलन झाले पाहीजे. अनेक प्रोजेक्ट अंमलात आणतोय. वायू प्रदूषण, कचरा विघटन, जल प्रदूषण असेल सर्व क्षेत्रांवर स्वतंत्र अहवाल तयार करुन सादर करावा. शहरात किती प्रदूषण आहे त्याची चाचणीचे युनिट प्रत्येक प्रभागात, भागात बसवले जावेत. आपण घेतलेली हवा खरेच प्रदूषणमुक्त आहे का याची चाचणी करुन शहरात प्रत्येक भागात बसवावेत अशी सूचना करतो.

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आत्ता कॅरीबॅगचा विषय आहे.याच्यावर नंतर विषय केला आहे. या बॅगांवर आपण बंदी आणावी. शहरात छोटे-छोटे व्यवसाय करणारे असतील, दारूच्या बाटल्या असतील, या सगळ्यांकडून या बॅगांतून विक्रि केली जाते. यात आपण विचार केलातर काळ्या बॅगा भंगारमध्ये जात नाहीत. स्कॅपमध्ये विक्री होत नाही. अशा बॅगा मार्केटमध्ये न आणण्याचे आदेश दिले पाहीजेत. जेणेकरुन त्या स्क्रॅपमध्ये गेल्या पाहीजेत. शहरात काच कागद गोळा करणारे नागरीक आहेत. कचरा गोळा करताना घरगुती कचरा एका बाजूला, बॅगा एका बाजूला यातून त्यांना उत्पन्न मिळते आहे यातून ब-याच जणांचे घर चालले आहे. या बॅगांची स्क्रॅपमध्ये विक्री होत नाही. त्या रस्त्यावर तशाच पडलेल्या दिसतात. रु.२८/- प्रति किलो असा रेट चालला होता. आज त्याचा रेट रु.१८/- प्रति किलो असा झाला आहे. स्कॅपमध्ये दर वाढला, तो रस्त्यावर पडलेला कचरा आहे. तो जमा करुन त्याची विल्हेवाट लावली जाईल याकडे सुद्धा विचार केला पाहीजे. याच्यावर काहीतरी मार्ग काढला पाहीजे. यातून लोकांची सोय किती झाली पाहीजे. कागदी पिशव्या मार्केटमध्ये चालू केल्या पाहीजेत असे म्हणतो. परंतू कागदी पिशव्यांपेक्षा जास्त वस्तू आहेत, ते होणे गरजेचे आहे. प्लॅस्टीकमध्ये जो बदल झाला आहे, जेणेकरुन त्यातून उत्पन्न मिळाले पाहीजे. नुकसान झाले नाही पाहीजे.

**मा.अरुण बो-हाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला खूप बरे वाटले. प्रशासनाकडून चांगला विषय आला आहे. मी मा.तानाजी खाडे, मा.राजेंद्र काटे त्यांच्याशी सुद्धा सहमत आहे. मला सूचना करायची आहे, विशेषतः सार्वजनिक कार्यक्रम आहेत, तिथे जेवणासाठी थर्माकोलच्या प्लेटस् वापरल्या जातात ते सुद्धा नष्ट न होणारे आहे. त्यातून विषारी वायू तयार होतो. त्याचा वापर टाळावा. पर्यावणाचा विचार करताना त्याचा वापर झाला नाही पाहीजे. चहाच्या टपरीवर गेलोतर प्लास्टकचे छोटे कपांमधून चहा दिला जातो. त्यातून किती मायक्रॉन जात असते. त्यातून चहा प्यायलो तर त्याची चव किती विचित्र वाटते. बाजारात

चांगल्या क्षमतेचे कागद, कप देखील उपलब्ध आहेत. आरोग्याला घातक असल्यामुळे त्यांचा उपयोग थांबला पाहीजे. नदी प्रदूषणाचा विषय असेल तर नदीत काय काय वाहत असते हा विषय देखील आहे. त्यात काय येते,कुठून येते. माणसे त्यातून काय शोधतात. पर्यावरणाचा विचार करत असताना महापालिकेत एक युनिट त्यात असावे. तज्ञ अधिकारी त्यात ठेवावेत. एकूण पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित करावी. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - शहरातील पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने प्लॅस्टीकसह थर्मोकोलच्या प्लेटस व पत्रावळी, तसेच चहासाठी वापरण्यात येणारे प्लॅस्टीकचे कपस् यावर आरोग्यास हानीकारक असल्याने वापरास बंदी घालण्यात यावी यासाठी महापालिकेने सक्षम यंत्रणा निर्माण करावी आणि ज्याठिकाणी अशा प्लेटस (पत्रावळी) व प्लॅस्टीक कप असतील त्या दुकानातून व गोडाऊनमधुन तो स्टॉक जप्त करावा व दंड आकारण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६३५ विषय क्रमांक - ११
दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/२/कावि/५९८/२०१४
दिनांक ११/१२/२०१४

केंद्रशासनाचे पर्यावरण आणि वन मंत्रालय यांचा प्लॅस्टिक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०११ चे नियम २० नुसार किरकोळ व्यवसायिकाने कोणतीही कॅरीबॅग ग्राहकाला विनामुल्य उपलब्ध करुन देऊ नये, प्लॅस्टिक कॅरीबॅग्जचा पुर्नवापर व प्लॅस्टिक कचरा निर्मिती कमी होणेच्या दृष्टीने ग्राहकांना कॅरीबॅग्ज देण्याकरिता व्यवसायिकाने आकारावयाचे किमान दर निश्चित करण्याचे अधिकार संबंधित महापालिकांना देण्यात आले आहेत. तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा महाराष्ट्र प्लॅस्टिक पिशवी (उत्पादन व वापर) नियम २००६ नुसार ज्या प्लॅस्टिक पिशव्या मुळ प्लॅस्टिकपासून अथवा पुर्नचक्रीत प्लॅस्टिक पासून तयार करणेत आल्या असून त्यांची जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी व आकारमान ८ इंच x १२ इंच यापेक्षा कमी असू नयेत. महाराष्ट्र प्रदुषण नियमन मंडळ यांचे परिपत्रकानुसार महाराष्ट्र प्लॅस्टिक पिशवी (उत्पादन व वापर) नियम २००६ नुसार महाराष्ट्र राज्यामध्ये ज्या प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर वस्तुंची ने-आण करणेसाठी होतो. अशा पिशव्यांची जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी नसावी तसेच कॅरी करणेची सुविधा नसणाऱ्या पिशव्यांची जाडी ४० मायक्रॉन पेक्षा कमी असून नये.

उक्त नियमांनुसार व्यवसायिक आणि ग्राहक यांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

६. प्लॅस्टिक कॅरी बॅगची जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी नसावी आणि सेल्फ कॅरी

करणेची सुविधा नसणा-या धान्य वाहतुकीसाठी वापरत असणा-या प्लॅस्टिकच्या पिशव्यांची जाडी ४० मायक्रॉनपेक्षा कमी नसावी.

७. प्लॅस्टिक कॅरी बॅगचा आकारमान ८ x १२ इंच (२० x ३० सेमी) पेक्षा कमी नसावा.

८. किरकोळ व्यवसायिकांनी ग्राहकांना कोणतीही प्लॅस्टिक पिशवी विनामुल्य देऊ नये.

९. व्यवसायिकाने आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी स्पष्टपणे दिसेल अशा रितीने कॅरीबॅगचा आकार आणि त्याचे किमान दर तसेच ग्राहकांना स्वतःची कॅरीबॅग आणण्याचे स्वातंत्र्य असून, कॅरीबॅग न आणल्यास व दुकानदाराकडून कॅरीबॅग पुरविण्याची मागणी केल्यास त्याकरिता त्याची किंमत द्यावी लागेल, असे दर्शनी भागात प्रदर्शित करावे.

१०. ग्राहकांना त्यांची स्वताची कॅरीबॅग आणण्याचे स्वातंत्र्य आहे. ग्राहकाने कॅरीबॅग आणली नसेल आणि कॅरीबॅग देण्याची मागणी व्यवसायिकाकडे केली तर अशा परिस्थितीतच व्यवसायिकाने कॅरीबॅग विनामुल्य न देता त्यासाठी खालीलप्रमाणे दर आकारणे बंधनकारक आहे.

| **अ.क्र.** | **प्लॅस्टिक कॅरीबॅगचा आकार** | **कॅरीबॅगची किमान किंमत** |
|---|---|---|
| १ | साधारणत: ८ x १२ इंच | रुपये २/- |
| २ | साधारणत: १६ x२० इंच | रुपये ४/- |
| ३ | साधारणत: २० x २५ इंच | रुपये ५/- |
| ४ | साधारणत: २० x २५ इंच पेक्षा जास्त | रुपये ६/- |

**स्पष्टीकरण**

१. प्लॅस्टिक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०११ मधील प्लॅस्टिक पिशव्या (कॅरीबॅग्ज)ची व्याख्या उपरोक्त नियमांमधील कॅरीबॅग्ज किंवा प्लॅस्टिक कॅरीबॅग्ज सारखीच आहे.

२. निविदेमधील किरकोळ विक्रेते म्हणजे, दुकानदार, घाऊक विक्रेता, फेरीवाला आणि पिंपरी चिंचवड मनापा परीसरातील इतर कोणताही विक्रेता, धान्य अथवा इतर सामान वितरण करणारा, मोठे व्यवसायिक, प्लॅस्टिक कॅरीबॅगसाठी / दुकानदार / किरकोळ विक्रेते / फेरीवाले यांनी प्लॅस्टिक कॅरी बॅगसाठी वरील प्रमाणे दर आकारणे बंधनकारक आहे.

**टिप -** प्लॅस्टिक कॅरीबॅग्जचा पुर्नवापर, आणि प्लॅस्टिक कचरा कमी होणेच्या उद्देशाने प्लॅस्टिक कॅरीबॅग्जची किंमत ही पिशवी निर्माण करणेसाठी वापरावयाच्या साहित्याची किंमत व कचरा हाताळणी किंमत मिळुन निश्चित केलेली आहे.

वरील अधिसुचनाची अंमलबजावणी त्वरीत चालू करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच शहरातील पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने प्लॅस्टीकसह थर्मोकोलच्या प्लेटस व पत्रावळी, तसेच चहासाठी वापरण्यात येणारे प्लॅस्टीकचे कपस् यावर आरोग्यास हानीकारक असल्याने

वापरास बंदी घालण्यात यावी यासाठी महापालिकेने सक्षम यंत्रणा निर्माण करावी आणि ज्याठिकाणी अशा प्लेटस (पत्रावळी) व प्लॅस्टीक कप असतील त्या दुकानातून व गोडाऊन मधुन तो स्टॉक जप्त करावा व दंड आकारण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - १०/०२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/६०९/ २०१४ दिनांक १७/१२/२०१४

भिमशक्तीनगर झोपडपट्टीचा भाग हा से.क्र. २० मध्ये येत असुन सदरचा भाग हा प्राधिकरणाच्या रेड झोनमध्ये आहे. सदर भागामध्ये काम करण्यासाठी येथील नागरिकांचा मा. नगरसेवक आणि मा. सौ. सुलभताई उबाळे यांचा पाठ पुरावा असल्याने सदर ठिकाणी नागरी सुविधा देणेबाबत ना हरकत दाखला मिळण्यासाठी मा. सक्षम प्राधिकारी तथा सहा. आयुक्त झोनिपु यांनी पत्र क्र. झोनिपु /स्था/जा/कावि/२८२/२०१४, दि.१८/७/२०१४ व झोनिपु/स्था/जा/कावि/५१३/२०१४, दि.१९/९/२०१४ नुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांना पत्र दिले आहे परंतु अद्यापपर्यंत ना हरकत दाखला महानगर पालिकेस प्राप्त झाला नाही.

मा. अध्यक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण तथा मा विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी दि. ०२/०९/२०१४ रोजी घेतलेली बैठक पे. क्र. २०, कृष्णानगर , चिखली प्राधिकरण येथील रहिवाश्यानीं अनाधिकृत झोपडपट्टी व भाजींमंडई संदर्भातील गंभीर समस्याबाबत झाली होती. सदर बैठकीमध्ये भिमशक्तीनगर झोपडपट्टीमध्ये तात्पुरती शौचालये करणेबाबतच्या सुचना आहेत. या संदर्भात आरोग्य विभागामार्फत फिरती शौचालयाची व्यवस्था करणे शक्य आहे व तशी येथील मा. सौ. सुलभाताई उबाळे गट नेत्या (शिवसेना) यांची ही मागणी आहे. त्याला अनुसरून सदर ठिकाणी फिरती शौचालय आरोग्य विभागाने पुरविले आहे त्याचप्रमाणे सदर ठिकाणी २ सिट्सचे FRP शौचालय बसविण्याचे नियोजन करणे आहे.

मा. सुलभाताई उबाळे यांनी दि. ०७/११/२०१४ रोजी भिमशक्तीनगर येथील झोपडपट्टीमधील नागरिकांच्या समस्या संदर्भात मा. आयुक्त यांचेकडे चर्चा केली असता मा. आयुक्त यांनी भिमशक्तीनगर येथे कायमस्वरुपी शौचालय बांधण्याचे काम तातडीने निविदा काढुन करण्याचे आदेश दिले आहेत तथापि भिमशक्तीनगर येथे शौचालय बांधणेसाठी सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये काम नसुन तरतुद ही नाही. यासाठी “ वॉर्ड क्र. ४ कृष्णानगर येथील भिमशक्तीनगर झोपडपट्टीमध्ये जुना ८ सिट्सचा संडास ब्लॉक पाडुन नविन २६ सिटसचा दुमजली संडास ब्लॉक बांधणे“ या कामाचा सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकामध्ये

समावेश करावा लागेल. सदर कामासाठी र.रू. ५,००,०००/- अक्षरी (पाच लक्ष) तरतुद इतर कामामधुन वर्ग करून घ्यावी लागेल.
त्यानंतर सदर कामास मा. शहर सुधारणा समितीची प्रशासकिय मान्यता घेवुन निविदा काढावी लागणार आहे. सदरचे काम करण्यासाठी अंदाजपत्रकिय खर्च र.रू. ३५,००,०००/- इतका अपेक्षित आहे.

तरी वॉर्ड क्र. ४ कृष्णानगर येथील भिमशक्तीनगर झोपडपट्टीमध्ये जुना ८ सिट्सचा संडास ब्लॉक पाडुन नविन २६ सिट्सचा दुमजली संडास ब्लॉक बांधणे या कामाचा सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे व सदर कामासाठी र.रु. ५.०० लक्ष तरतुद प्रभाग क्र. ४२ मधिल आंबेडकरनगर झोपडपट्टीमध्ये सांस्कृतिक केंद्र इमारत बांधणे. (८७१/४७) कामामधुन वर्ग करणेचे विषयपत्र मंजुरीसाठी मा.महापालिका सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.अजय सायकर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, भिमशक्तीनगर झोपडपट्टी भाग सेक्टर नं. २० प्र.क्र. ४ हा माझ्या प्रभागातील विषय आहे. भिमशक्तीनगर झोपडपट्टी भाग सेक्टर नं. २० प्र.क्र. ४ व चिखली प्राधिकरणातील स्थानिक रहिवासी व प्र.क्र.४चा प्रतिनिधी म्हणून मला दोनही बाजू समजून सांगायच्या आहेत इथे जुना आठ सिटचा संडास ब्लॉक पाडून नवीन २६ सिटचे दुमजली संडास ब्लॉक बांधणे याकरिता तरतूद वर्गीकरणाचा विषय आहे. साधारणतः भिमशक्तीनगर मधील ५००/६०० झोपड्या घोषित किंवा अघोषित किंवा नोंदणी झालेल्या अशी माहिती आहे. साधारणतः तिथे हजार एक झोपड्या आहेत. हा भिमशक्तीनगर भाग दोन भागांत बसलेला आहे. २०० झोपड्या वाघोली जलशुद्धीकरण इथे व खाली ७०० झोपड्या असतील. माझे हे ३रे वर्ष असेल. मी अंदाजपत्रकाच्या सभेमध्ये याच विषयावर बोललो होतो. या लोकांसाठी संडास बांधायला पाहीजेत. यांना टॉयलेट ब्लॉक्स मिळाले पाहीजेत यासंदर्भात मी बोललो होतो. स्थानिक रहिवाश्यांनी सुद्धा पत्र दिले आहे. मी पत्र दिले होते. त्यावेळी आम्हाला सांगितले होते, सेक्टर २०च्या रेडझोनमध्ये आहे, प्राधिकरणाची आपल्याला एनओसी नाही. त्यांच्या मालकीची जागा असल्यामुळे प्राधिकरण तिथे बांधकाम करायला परवानगी देत नाही. तुम्ही बांधून देणार असाल तर वरील बाजूला २००/३०० झोपड्या आहेत. २६ सिटस् चे संडास इथे बांधणार आहेत काही सिटस् तिथे सुद्धा बांधल्या गेल्या पाहीजेत. ज्यावेळी आपल्याकडे दि.२/९/२०१४ रोजी चिखली प्राधिकरण रहिवासी व झोपडपट्टीतील भाजी मंडई संदर्भात मिटींग झाली होती. त्या मिटींगला मी सुद्धा उपस्थित होतो. प्राधिकरणाचे सी.ओ. श्री. योगेश मझे साहेबांनी त्यावेळी पर्याय सूचवला होता. प्राधिकरणाची ३५ एकर जागा झोपडपट्टी बाधित आहे. त्यावर ५ एकर जागा राजीव गांधी पुनर्वसन निवास योजनेच्या धर्तीवर किंवा जेएनएनयूआरएमच्या योजनेच्या धर्तीवर यांचे पुनर्वसन केलेतर आपण ३५ एकर जागा मोकळी करु व यांचा सुद्धा प्रश्न मार्गी लागेल. त्या मिटींगला तुम्ही सुद्धा होता. दूर्दैवाने त्याचा पुढे काही फॉलोअप झाला का नाही, नक्की काय झाले ते मला कळाले नाही. फक्त याअनुषंगाने मला याची दुसरी बाजू देखील मांडायची आहे, या भागातील स्थानिक रहिवाश्यांच्या १८ ते २० सोसायट्या या भिमशक्तीनगरला लागून आहेत. साईदर्शन पार्क, सिद्यानंद पार्क, जैन रेसिडन्सी, सुमित्रा हाईटस् इ तिथे साधारणतः ७००/८००

फ्लॅटधारक आहेत, जे नियमित टॅक्स भरतात. आयुक्त साहेब मी तुम्हाला तिथे घेऊन गेलो होतो. तुमची तिथे व्हिजिट झाली होती. फॉलोअप करुन तीन वर्षे झाली आहेत. त्यावेळी अंदाजपत्रकात सांगतोय. रस्ते करुन पाहीजेत. फूटपाथ करुन पाहीजेत. दोन अडीच वर्षे काही झाले नाही. तरतूद करुन सुद्धा उपेक्षित आहोत. बजेटमध्ये तरतूद असते. दोन रस्ते होतात. दोन रस्ते होत नाहीत. तेव्हा नागरीक म्हणतात, नगरसेवक मंडळी काय करतात. चार रस्त्यांसाठी जे बजेट दिलेले असते, तरतूद केलेली असते. सगळे नागरीक आमच्यावर प्रेशर आणतात. तिथे काही प्रमाणात अतिक्रमणाची साफसफाई झाली. त्याचा रोष नकळत आमच्यावर आला. जसे काही आम्ही झोपडपट्टी रहिवाश्यांच्या विरोधात आहोत. कोणाला वाटणार नाही, आपल्यासमोर हगणदारी झाली पाहीजे. त्यांनाही वाटेल यांच्यासाठी टॉयलेट ब्लॉक्स बांधले पाहीजेत. परिसर स्वच्छ झाला पाहीजे. सोसायटीधारक सुद्धा पत्र देतात. फक्त ते इथे मोर्चा घेऊन येत नाहीत. जवळजवळ दोन/तीन हजार लोकवस्तीचा हा भाग आहे. या सोसायटीला पाणी कमी प्रेशरने येते आहे. जेवढे पाहीजे तेवढे पाणी शेवटपर्यंत मिळत नाही. आमच्या जे.ई.ला घेऊन गेलो. त्याने खात्री केली, पाणी भरले आहे का. तुम्ही रितसर मिटरची चेकींग करता का. तुम्हाला एवढेच पाणी मिळणार. भिमशक्तीनगरमध्ये मिटर नाहीत ना कोणते पाण्याचे चेकींग होते. त्यांना २४ तास पाणी मिळते. जसा यांचा विचार करतो, तसा या १७/१८ सोसायट्यांमध्ये नागरीक राहतात त्यांचा सुद्धा विचार झाला पाहीजे. हे टॉयलेट ब्लॉक्स बांधणार असाल तर वरील २००/३०० झोपड्या आहेत, तिथे सुद्धा टॉयलेट ब्लॉक्स बांधले गेले पाहीजेत.

**मा.वनिता थोरात** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय आम्हाला मंजूर आहे. हा विषय एनओसी घेऊन फेरसादर करावा अशी विनंती करते.

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह, आत्ताच वॉर्डातील स्थानिक नगरसेवक मा.अजय सायकर यांनी सूचना मांडली आहे. खालील झोपडपट्टीतसुद्धा टॉयलेट ब्लॉक्स व्हायला पाहीजेत तर व्हायलाच पाहीजेत. मा.वनिता थोरात यांनी जी सूचना मांडली आहे, एनओसी मिळाल्यानंतर फेरसादर करावे. मला काही कळाले नाही. त्या स्वतः बोलल्या नाहीत, त्यांचा बोलविता धनी वेगळा आहे. या विषयात माझे नाव का आले हे मला माहित नाही. त्याठिकाणी असा विषय झाला होता की, ग्रामीण भागात एका महिलेने मंगळसूत्र मोडून शौचालय बांधले म्हणून तिचा ग्रामविकास मंत्री मा.पंकजा मुंडे यांच्याकडून, राज्यस्तरावर सत्कार झाला. कलेक्टर यांनी सत्कार केला. याच परिसरात राहणा-या महिलांचे म्हणणे होते, आम्ही सुद्धा मंगळसूत्र मोडून संडास बांधू त्या रस्त्यावर शौचास बसतात. त्यांना सुद्धा त्याच अडचणी येतात. रात्री गाडीचा फोकस असलेकी गाड्या आल्यानंतर उठून उभे रहावे लागते. त्या महिलांना मला हे सांगितले आहे. गेली अनेक वर्षे हे लोक मागणी करत आहेत. यांनी पण प्रयत्न केले होते. पण रेडझोनचा मुद्दा आडवा आला. डॉ.श्रीकर परदेशी रेडझोनमध्ये लक्ष घालत नव्हते. विषय असा आहे रेडझोन असल्यामुळे तिथे संडासचे पण बांधकाम करु शकत नाही. प्राधिकरणात नवीन सी.ओ. आले आहेत. कॅब टॉयलेट ब्लॉक बांधतोय. निविदा मंजूर झाली आहे. सेपरेट बांधले पाहीजेत का. टोटल बांधले पाहीजेत. हा

सेपरेट विषय आहे. ही मिटींग तीन वेळा तहकूब झाली आहे. हा विषय इथपर्यंत येण्यामागे आमचे भरपूर कष्ट आहेत. माझी वनितातार्ईंना हात जोडून विनंती आहे, याचा सारासार विचार करावा. आपण महिला आरक्षणातून निवडून आलो आहात. आपल्या पक्षाचे सर्वेसर्वा मा.शरद पवार यांनी महिलांना आरक्षण दिले आहे. पिंपरी चिंचवड शहरात महिला रस्त्यावर शौचास बसतात ही प्रत्येक नगरसेविकेसाठी शरमेची बाब आहे. हा विषय माझे नाव वगळून मंजूर करावा. माझी सभागृहाला मा.महापौर साहेब यांना विनंती आहे. मला आणखी काही बोलायचे नाही. यासाठी भरपूर त्रास घेतला आहे. यासाठी मला यांच्याशी कर्तव्य नाही. विषय आज होतो आहे. अधिका-यांनी सुध्दा मेहनत घेतली. लोकांच्या भावना बघा. तरुण मुली तिथे रस्त्यावर शौचास बसतात. आपण यातून कधी गेलो नाहीत. त्या लोकांचा त्रास तुम्ही बघितला असता तर समजले असते. झोपडपट्टीतील लोक निवेदन घेऊन आले आहेत. जेणेकरुन त्यांचे टॉयलेट ब्लॉक्स लवकर तयार होतील. आयुक्त साहेबांनी हा विषय मांडला आहे. झोपडपट्टी विभागाचा हा विषय आहे म्हणून लवकरात लवकर हा विषय मंजूर व्हावा. एनओसी घ्यायची का नाही हा तांत्रिक मुद्दा आहे. तुम्ही सगळे सोपस्कार पार पाडणार आहात. हा विषय कोणतेतरी कारण पुढे टाकून करु नये. मा.महापौर साहेब, तुम्ही कोणत्या एका पक्षाचे महापौर नाहीत तर संपूर्ण शहराचे महापौर आहात. झोपडपट्टीतील गोरगरीब लोकांची आपल्याला पूर्ण जाणीव आहे. आपण कृपया तसे काम करु नये. आपण हा विषय मंजूर करुन घ्यावा. मा.वनिता थोरात यांना विनंती आहे, आपण हा विषय मंजूर करुन द्यावा.

**मा.संजय काटे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,भिमशक्तीनगर हा सदरचा भाग प्राधिकरणाच्या हद्दीत आहे. रेडझोनने बाधित भाग आहे. मा.विभागीय आयुक्तांकडे मिटींग झाली होती त्यावेळी तात्पुरती शौचालये करण्याबाबतीत सूचना दिल्या होत्या,आरोग्य विभागाकडून फिरते शौचालय करायची व्यवस्था करणे शक्य आहे. सदरचे फिरते शौचालय आरोग्य विभागाकडून पुरवले आहे. नागरीकांची सोय केली पाहीजे, हे आपले कर्तव्य आहे. नागरीकांनी आदेश दिला, कायमस्वरुपी टॉयलेट ब्लॉक्स बांधण्यात यावेत. कारण आपण पर्मनन्ट डेव्हलपमेंट करतोय. सदरचा भाग रेडझोनमध्ये येतो व रेडझोनमध्ये बांधकाम करता येते का, ते नियमांत बसते का, त्याचे उत्तर, हे नियमांत बसत नाही, करता येत नाही. आपण कायमस्वरुपी टॉयलेट करायचे आदेश दिले आहेत. तुमच्या अधिकारांत मंजुरी देता येत असेलतर देहू रोड इथे सुद्धा रेडझोन झाला आहे. शहरामध्ये ज्या-ज्या ठिकाणी रेडझोन आहे. त्या सगळीकडे आपल्या अधिकारांत नागरीकांना सुविधा द्याव्या लागतील तिथे अशा प्रकारच्या सुविधा देण्यासाठी आपल्या अधिकारांचा वापर करावा. नागरीकांची होणारी गैरसोय थांबवावी अशी विनंती करतो.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अतिशय चांगला विषय इथे आला आहे. मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करते. आपण आदेश दिले आहेत, इथे पक्की शौचालये बांधावीत. पिंपरी चिंचवड शहरात एवढ्या झोपडपट्ट्या आहेत, या सगळ्या झोपडपट्यांचे प्रश्न तुमच्याकडे येतात, पत्राद्वारे येतात. काही लोक स्वतः येऊन भेटतात. तुम्ही त्या झोपडपट्टीच्या प्रश्नांकडे दूर्लक्ष करता. एखादे मोठे आंदोलन झाले, टी.व्ही चॅनलवर

दिसले की लगेच करायचे असे ठरवता का. भिमशक्तीनगरचे कमीत कमी ३ मोठे मोर्चे मी स्वतः काढले आहेत. सर्वात मोठा आशिष शर्मा असताना मोर्चा आणला होता. प्राधिकरणाच्या कार्यालयावर आमचा मोर्चा गेला होता. सगळी लेखी कागदपत्रे आहेत. महापालिकेची एनओसी झालीतर आम्ही बांधू, त्यांची एनओसी झालीतर त्यांनी बांधावे. आयुक्त साहेब, तुम्ही ज्या पद्धतीने, ज्या आपुलकीने, ज्या मायेने, ज्या प्रेमाने इथे शौचालये बांधताय, तशीच शौचालये शहरातील इतर झोपडपट्यांमध्ये सुद्धा बांधा. सुलभाताईंचे म्हणणे बरोबर आहे, मा.पंकजाताई मुंडे यांनी त्या बाईने शौचालय बांधले म्हणून तिचा सत्कार केला. अशा भरपूर महिला तिथे आहेत, ज्या मंगळसूत्र विकून शौचालय बांधतील. मला याचे आश्चर्य वाटले, आम्ही तिथे इतके मोर्चे काढले, कधी फोटो नाही, कधी टि.व्ही. वर बातमी नाही. आणि इथे टिव्हीवर बातमी पाहीली. आमच्या महिला टी.व्हीवर दिसल्या. उलट आम्हाला बरे वाटले. तुम्ही कोणकोणत्या कारणाने काम करता आयुक्त साहेब हा फरक लक्षात घ्या. त्या वस्तीला अधिकची फुल्ली मारल्यासारखे चार नगरसेवक आहेत, आम्ही तिथे नेहमी जातो. ही झोपडपट्टी उठवा म्हणणारे नगरसेवक सुद्धा तिथे होते. आणि ती का म्हणून सांगणारे आम्ही होतो. भिमशक्तीनगरमधील लोकांनी मा.पंकजा मुंडे यांचे आभार मानायला पाहीजेत. आज यांना त्यांच्यामुळे हे टॉयलेट ब्लॉक्स मिळत आहेत. माझा दुसरा मुद्दा असा आहे, नगरसेवक किंवा कोणी नागरीक त्या विषयाचा पाठपुरवा करत असताना तुम्ही त्याचे गांभिर्य लक्षात घ्या. मी इथे हात वर करुन बोलले, मी कायद्यासंदर्भात कुठे बोलले म्हणजे माझे म्हणणे ऐकले पाहीजे. मी सभागृहात काहीच बोलले नाही म्हणजे हा विषय निग्लेक्ट केला पाहीजे असे होता कामा नये. माझ्या प्रभागांत सुलभ शौचालयांचा प्रश्न जवळजवळ गेले ५ वर्षांपासून मी क प्रभागाच्या मिटींगमध्ये मांडते आहे. आशिष शर्मा असल्यापासून आम्ही हा विषय मांडतोय. तिथे लोक नीट काम करत नाहीत. एखाद्या दिवशी आम्ही कोणाला तरी मारु किंवा अधिका-याला काळे फासू मग ते पेपरला येणार. मग तुम्ही काम करणार का. तुम्ही ठरवा कसे काम करायचे, कधी करायचे. एकाला एक न्याय, एकाला एक न्याय असे करु नका. किती झोपडपट्ट्यांमध्ये शौचालये नाहीत. तुमच्याकडे आकडा आहे का. कोण अधिकारी आहेत त्यांना इथे बोलवा. किती झोपडपट्यांमध्ये लोक उघड्यावर बसतात. किती घरांमध्ये ड्रेनेजचे पाणी जाते. किती लोक अर्ध्या ड्रेनेजच्या पाण्यात राहतात. मग तुम्ही काम करणार का. तुम्ही सगळ्या झोपडपट्ट्यांचे काम सारखे करा. मी बोलते किंवा सुलभाताई बोलतात म्हणून आमचे काम करायचे. मुळात मा.सुलभाताई या पक्षनेत्या आहेत. पक्षाच्या जबाबदार नेत्या म्हणून तुम्ही त्यांचे काम करणार. बाकीच्यांचे काम करणार नाही असे होता कामा नये. मी स्वतः काम होईल त्यादिवशी आयुक्त म्हणून तुमचा सत्कार करेन.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, भिमशक्तीनगरचा विषय निघाला. यात मा.ऊबाळेताईंचे नाव आहे. प्रस्तावना वाचली. निश्चितच त्यांचे म्हणणे खरे आहे. रस्त्याच्या कडेला झोपडपट्टीत राहणा-या लोकांना उघड्यावर शौचास बसावे लागते. मी माझा वॉर्ड हगणदारी मुक्त केला होता. महापालिकेच्या योजनेतून रु.१ कोटी ६ लाखांचे संडास बांधून दिले होते. सगळा वॉर्ड स्वच्छ केला. मागील काळात ७५ मीटरचा स्पाईन रोड झाला. काही झोपडपट्यांचे पत्राशेडमध्ये पुनर्वसन केले. बाकी झोपड्या आहेत, त्यांना मोकळ्या जागेवर

नेऊन बसवून जेएनएनयूआरएम अंतर्गत पुनर्वसन करायचे होते. काम चालू असताना काम बंद पडले. त्या मोकळ्या प्लॉटवर ही झोपडपट्टी बसली गेली. त्यांना आता पाणी देता येत नाही. व संडास ब्लॉक बांधून देऊ शकत नाही. माझ्या प्रभागात हे लोक देखील साईडला उघड्यावर बसतात. मी तिथून येत जात असतो. या रेडझोनची घाण माझ्यावर पण आली. आणणा-यांनी ती आणली. त्यामुळे आज नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे तो अतिशय बेकार आहे. यातून मार्ग निघाला पाहीजे. एका ठिकाणी भदाणे मॅडम यांनी डिअर पार्कचा विषय मार्गी लावला म्हणून मा.शांताराम भालेकर यांनी त्यांचे कौतुक करणारी सूचना मांडून त्यांचे स्वागत केले. अशी प्रथा नव्हती. त्यांचा सत्कार इथे झाला. याच भदाणे मॅडम यांनी
रेडझोन हद्दीत मंजूरी घेतली. याच भदाणे मॅडम यांनी स्मशान भूमीत आरसीसी स्ट्रक्चर उभे करायला परवानगी दिली. याच भदाणे मॅडम यांनी निगडी जकात नाक्यावर बसस्टॉप आहे तिथे कॉलम उभे आहेत. त्यांनी तिथे रेडझोनमध्ये सही केली. याच भदाणे मॅडम यांनी माझ्या प्रभागात शाळेचे कंपाऊंड पडले होते. ती भिंत बांधायला त्यांनी टेंडरवर रिमार्क केला की, हे रेडझोनमध्ये आहे. गोरगरीबांच्या भागात काम होत असेलतर त्याला खो कसा घालायचा, एखाद्या बिल्डरचे काम किती सोप्पे करायचे. याच भदाणे मॅडम यांचे कौतुक केले त्यांच्यावर टिका करायला बरे वाटत नाही. पण काही-काही अधिका-यांना अशी कामे करता आलीतर केली पाहीजेत. सोनकांबळे ताई म्हणाल्या, याठिकाणी टॉयलेट ब्लॉक झालेतर निश्चित तुमचे स्वागत करेन, निश्चितपणे झाले पाहीजे. प्रशासन कशासाठी आहे, जे कायद्यात आहे ते कायद्यात बसून कसे करता येईल, लोकांना सुविधा कशा देता येतील, या दृष्टीकोणातून सभागृह चालले पाहीजे. एखाद्याचे काम होत असेल तर कोर्टाकडून स्टे आणून काम थांबवायचे असेलतर या गोष्टी त्यांच्यापर्यंत कशा पोचत असतील तर ते देव जाणे. माझ्या प्रभागात ३ वर्षे झालीत, एक रुपयाचे देखील काम झालेले नाही. त्याठिकाणच्या लोकांच्या अडीअडचणी कशा पद्धतीने सोडवता आम्हाला माहित आहे. त्या ठिकाणी झोपडपट्टीत टॉयलेट झाले पाहीजेत, तिथे सुद्धा सुविधा मिळाल्या पाहीजेत. आयुक्त साहेब, झोपडपट्टी विभागाला सूचना द्या, झोपड्या वाढत चालल्या आहेत. ज्यांचे पुनर्वसन केले ते लोक घर विकायला लागले आहेत. घर भाड्याने द्यायला लागले आहेत. पुन्हा झोपडपट्टीत येऊन रहायला लागले आहेत. मोकळ्या जागेत परिस्थिती गंभीर व्हायला लागली आहे. या लोकांच्या झोपड्या वाढणार आहेत. राजकीय लोकांवर याचे खापर फोडून बसतो. पाच हजार द्या व जागा घ्या असे तिथे चालले आहे. त्यांच्यावर कारवाई होत नाही म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, हा विषय लवकरात लवकर मार्गी लावा. व त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, परत आजची चूक आहे, तुमचे डॉकेट आहे. आयुक्तांनी दिलेल्या पत्राविषयी जर असे ठराव येणार असतील तर आत्ता सिमाताईंची व तानाजी खाडे यांची कशी हमरी तुमरी झाली. याला कारणीभूत कोण आहे. ही पहिली स्टेज होती. दुसरी स्टेज बघायची आहे का आयुक्त साहेब, रेडझोनमध्ये कोर्टात गेल्यानंतर तिथे निवडून येण्यासाठी त्यांना जो त्रास होतो. जे लोकप्रतिनिधी तिथे आहेत, त्या त्यांच्या जागेवर बरोबर आहेत. हे त्यांच्या जागेवर बरोबर आहेत. तुमची झालेली चूक आम्ही किती दुरुस्त करायची ते सांगा. गेल्या १९९२ सालापासून आजपर्यंत असा ठराव कधी झाला

नाही. मा.अजय सायकर किती शांतपणे बोलत होते. कारण त्यांना निवडणूकीला तिथे लढायचे आहे. मा.वनिता थोरात यांचा बोलता धनी कोण, आज तुमच्या तोंडात कुठून जोर येता माहिती नाही आम्हाला. आज तुमच्या शेजारच्या तोंडातून जे येते त्याचा बोलता धनी कोण असणार आहे. आमच्या पक्षाच्या वतीने आमचा सदस्य सभ्यपणे सांगतो, फेरसादर करा. कारण त्यांना तिथे निवडणूक लढवायची आहे. जेव्हा तुम्ही जी.बी.च्या डॉकेटवर सही करत असता. पक्षाच्या वतीने आजपर्यंत कोणताही ठराव आलेला नाही. माझ्या कारकीर्दीत ही झोपडपट्टी वसलेली आहे. २००९ मध्ये मी नगरसेवक होते तेव्हा तिथे हे गोरगरीब येत होते ते राहीले. आज ज्या सोसायट्यांची नावे सांगितली, त्यांना आम्ही सांगितो समोर झोपडपट्टी आहे. मग हे फ्लॅट घेताना यांच्या लक्षात यायला नको का. तिथे गोरगरीबांची घरे आहेत. नक्की शंभर टक्के सुविधा दिल्या गेल्या पाहीजेत. टॉयलेट ब्लॉक्स दिले होते, पाणी दिले होते. मी कार्यक्रम घेत होते. २/२ टॉयलेट ब्लॉक्सना त्या लोकांना गाड्या दिलेल्या आहेत. आम्ही अजिबात विरोधात नाही. जशी प्रत्येकाची हद्द असते, त्याप्रमाणे आज येथे जरी असलेतरी कोणाला येत नसेल तर त्याला शिकवणे गुन्हा आहे का. तुमच्या नगरसेवकांना काय शिकवता इथपर्यंत आम्ही कधी आलो का. म्हणजे हे चित्र निर्माण करायचे काम कोण करतो, प्रशासन करते. पुढील मिटींगला विषय आलातरी हरकत नाही. हे सगळे वगळून विषय आणा. आणि त्याच धर्तीवर आम्हाला सगळीकडे पाहीजे. आम्हाला काही अडचण नाही. रेड झोनविषयी भोसरीचे मा.नाना लोंढे किती बोलत होते. रेडझोनमध्ये एकही सुविधा देऊ शकत नाही. मा.तानाजी खाडे यांच्या वॉर्डात ते कोणतीही सुविधा देऊ शकत नाहीत. नावानिशी ठराव आला तर माझा त्याला विरोध आहे, महिलांसाठी संडास ब्लॉक बांधायच्या ठरावाला विरोध नाही. परंतू उभ्या आयुष्यात आजतागायत १९९२ सालापासून असा ठराव आला नाही. काय कारण आहे. कोण धिंगाणा करतो आहे, तुमच्यापुढे नाचकाम करतो आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मंगलाताई शब्द मागे घ्या.

**मा.मंगलाताई कदम** - अजिबात मी शब्द मागे घेणार नाही. कशासाठी असा ठराव आला आहे.

**मा.महापौर** - मी सूचना देते, सर्वांनी खाली बसा.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,यांना शब्द मागे घ्यायला लावा.नाचकाम म्हणजे काय?

(गोंधळ)

**मा.महापौर** - हा विषय तहकूब करुन ही सभा शुक्रवार दिनांक २०/२/२०१५ दुपारी ३.०० वा. पर्यंत तहकूब केल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ३९.</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०/१/२०१५ व २७/१/२०१५ व दि.१०/२/२०१५ (दु.१.०० व १.२५) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक - २०.२.२०१५</u> <u>वेळ - दुपारी ३.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे जानेवारी-२०१५) दिनांक १०.२.२०१५ (दु.१.२५) ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.२.२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.सायकर अजय शंकरराव
८. मा.जाधव साधना रामदास
९. मा.जाधव राहुल गुलाब
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.काळजे नितीन प्रताप
१३. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१४. मा.बाबर शारदा प्रकाश
१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१८. मा.पवार संगीता शाम
१९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२०. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२१. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२२. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे
२५. मा.आर.एस.कुमार
२६. मा.जावेद रमजान शेख
२७. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३०. मा.नंदा विकास ताकवणे
३१. मा.नेटके सुमन राजेंद्र
३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३६. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३८. मा.अपर्णा निलेश डोके
३९. मा.अनंत सुभाष को-हाळे
४०. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४१. मा.जयश्री वसंत गावडे
४२. मा.पवार मनीषा काळूराम
४३. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४८. मा.वाबळे संजय मल्हारराव
४९. मा.मडिगेरी वर्षा विलास
५०. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५१. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५२. मा.सुपे आशा रविंद्र
५३. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५४. मा.मोहिनीताई विलास लांडे
५५. मा.गोफणे अनुराधा देविदास
५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५९. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६२. मा.सावळे सिमा रविंद्र
६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६५. मा.पालांडे सुजाता सुनिल
६६. मा.बहल योगेश मंगलसेन
६७. मा.कदम सदगुरु महादेव
६८. मा.गिता सुशील मंचरकर
६९. मा.कैलास महादेव कदम
७०. मा.छाया जगन्नाथ साबळे
७१. मा.आसवाणी सविता धनराज
७२. मा.वाघेरे सुनिता राजेश
७३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७५. मा.पाडाळे निता विलास
७६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७८. मा.विमलताई सुरेश जगताप
७९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८०. मा.बारणे निलेश हिरामण
८१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८२. मा.बारणे माया संतोष
८३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८४. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८५. मा.कलाटे स्वाती मयुर
८६. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८७. मा.चौंधे आरती सुरेश
८८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९०. मा.जवळकर वैशाली राहुल
९१. मा.जगताप राजेंद्र गणपत
९२. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९५. मा.जम सोनाली पोपट
९६. मा.प्रशांत शितोळे
९७. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

९८. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१००. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०१. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०२. मा.संजय केशवराव काटे
१०३. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त,मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे,मा.गायकवाड,मा.माने,मा.दंडवते,मा.दुरगूडे,खोसे,मा.कडूसकर-सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.दुधेकर, मा.सवणे, मा.इंगळे,मा.साळवी,मा.गद्दूवार,मा.निकम, मा.पठाण,मा.पिरजादे,मा.कांबळे-कार्य.अभियंता,मा.साळुंखे- मुख्य उदयान अधिक्षक हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते, पुरोगामि विचारवंत गोविंद पानसरे उर्फ अण्णा व त्यांच्या पत्नी सौ.उमा यांच्यावर झालेल्या प्राणघातक भ्याड हल्ल्याचा निषेध म्हणून सदरची सभा गुरुवार दि.२६/२/२०१५ दु.३.०० वा. पर्यंत तहकूब करावी अशी सूचना मी मांडते.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर-** ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते, पुरोगामि विचारवंत गोविंद पानसरे उर्फ अण्णा व त्यांच्या पत्नी सौ.उमा यांच्यावर झालेल्या प्राणघातक भ्याड हल्ल्याचा निषेध म्हणून ही सभा गुरुवार दिनांक २६/२/२०१५ रोजी दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ३९.

## सभावृत्तांत

**(दिनांक २०/१/२०१५ व २७/१/२०१५ व दि.१०/२/२०१५ (दु.१.०० व १.२५) व दि.२०/२/२०१५ची तहकूब सभा)**

दिनांक - २६.२.२०१५ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे जानेवारी-२०१५) दिनांक २०.२.२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२६.२.२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१८. मा.उल्हास शेट्टी

१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२०. मा.पवार संगीता शाम

२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.लोंढे गणेश नारायण

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.जयश्री वसंत गावडे

४५. मा.पवार मनीषा काळूराम

४६. मा.प्रसाद शेट्टी

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.वाबळे संजय मल्हारराव

५१. मा.मडिगेरी वर्षा विलास

५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५३. मा.सुपे आशा रविंद्र

५४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५८. मा.महेशदादा किसन लांडगे

५९. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६०. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६१. मा.लोंढे शुभांगी संतोष

६२. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६३. मा.सावळे सिमा रविंद्र

६४. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६६. मा.पालांडे सुजाता सुनिल

६७. मा.बहल योगेश मंगलसेन

६८. मा.कदम सदगुरु महादेव

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.कैलास महादेव कदम

७१. मा.छाया जगन्नाथ साबळे

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.टाक अरुण मदन

७४. मा.वाघेरे सुनिता राजेश

७५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७८. मा.काळे विमल रमेश

७९. मा.विनोद जयवंत नढे

८०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८२. मा.विमलताई सुरेश जगताप

८३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८४. मा.बारणे निलेश हिरामण

८५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६. मा.बारणे माया संतोष

८७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८८. मा.कलाटे स्वाती मयुर

८९. मा.चौंधे आरती सुरेश

९०. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९१. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९३. मा.जगताप राजेंद्र गणपत

९४. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९५. मा.जगताप नवनाथ दत्तु

९६. मा.जम सोनाली पोपट

९७. मा.प्रशांत शितोळे

९८. मा.गायकवाड संध्या सुरदास

९९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१००. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०१. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०२. मा.संजय केशवराव काटे

१०३. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०४. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०५. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१०६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.कडुसकर,मा.गायकवाड,मा.खांडकेकर,मा.दंडवते, मा.दुरगूडे,खोसे-सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.उबाळे-प्रशासन अधिकारी(शिक्षण मंडळ), मा.दुधेकर,मा.निकम,मा.सवणे,मा.कपिले,मा.साळवी, मा.पठाण,मा.कुलकर्णी,मा.पिरजादे,मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गट्टूवार - कार्य.अभियंता, मा.प्रविण आष्टीकर-सह.व्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल),मा.बोदडे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ चे वाचन झालेले आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वरिल मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र क्रमांक झोनिपु/स्था/जा/कावि/६०९/२०१४ दिनांक १७/१२/२०१४ मागे घेवून फेरसादर करणेत यावे अशी सूचना मी मांडते.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६५१ विषय क्रमांक - १२

दिनांक- २६/२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/६०९/२०१४ दिनांक १७/१२/२०१४

विषय क्रमांक १२ वरिल मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र क्रमांक झोनिपु/स्था/जा/कावि/६०९/२०१४ दिनांक १७/१२/२०१४ मागे घेवून फेरसादर करणेत यावे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक- २६/२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.पअक/३/कावि/६१०/२०१४ दिनांक २६/१२/२०१४

पिंपरी चिंचवड शहरातील हवा प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड मधील तीन चाकी ऑटो रिक्षाना सी.एन.जी. किट बसविणे आवश्यक आहे. सध्या मनपा हद्दीमध्ये एकुण अंदाजे ५८०० ऑटो रिक्षा आहेत. पुणे मनपाच्या धर्तीवर सी.एन.जी. अनुदानासाठी रिक्षा पंचायत पुणे-पिंपरी चिंचवड व क्रांती रिक्षा सेना यांनी निवेदनाद्वारे मागणी केलेली असुन अशा प्रकारे अनुदान दिल्याने सी.एन.जी. चा वापर वाढणार आहे व त्या अनुषंगाने शहरातील प्रदुषणाची पातळी कमी होण्यास मदत होणार आहे. त्यानुसार शहरातील रिक्षा पंचायत व क्रांती रिक्षा सेना यांनी निवेदनान्वये पुणे महानगरपालिकेने सीएनजी किट बसवुन घेणाऱ्या रिक्षांना दहा हजार रुपये अनुदान दिलेले असुन त्याच धर्तीवर पिंपरी चिंचवड महानग्पालिकेने अनुदान देणेत यावे अशा मागणीचे निवेदन मा.आयुक्त सो. यांना देणेत आलेले आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो. व मा.महापौर पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेमध्ये झालेल्या चर्चेमध्ये प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

यापुर्वी मनपाच्या मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३७ दि.२४/७/२०१२ अन्वये शहरातील प्रदुषण कमी करण्यासाठी येथील वाहने सर्वप्रथम रिक्षा एल.पी.जी. सी.एन.जी. सारख्या पर्यावरण मित्र इंधनावर करण्याचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या भुरेलाल समितीने दिले आहेत. त्यानुसार शहरातील सर्व जुन्या रिक्षा एल.पी.जी. व सी.एन.जी. करण्याचा आदेश राज्य शासनाने प्रादेशिक परिवाहन प्राधिकरणाने दिले आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरातील ज्या रिक्षाचालकांनी आपल्या जुन्या व नव्या रिक्षा सी.एन.जी. किट बसविली आहे अशा रिक्षांना प्रत्येकी र.रु.१२,०००/- एकदाच अनुदान शहराची पालक संस्था म्हणुन देण्याचा निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती घेत आहे. त्याकरिता आगामी अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये ५ कोटीची तरतुद करणे बाबत व सदरचे काम तातडीने करणे बाबत सुचना केलेल्या आहेत.

त्यानुसार सदरच्या कामासाठी पर्यावरण विभागाकडे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पामध्ये “तिन चाकी रिक्षांसाठी पिं.चिं.मनपामार्फत सी.एन.जी. किटसाठी सहाय्य अनुदान देणे” या लेखाशिर्षाखाली पान क्र.१४६ अ.क्र.२५ वर र.रु.१,२०,००,०००/- ची तरतुद करणेत आलेली आहे. तरी, मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३७ दि.२४/७/२०१२ अन्वये र.रु.१२,०००/- ऐवजी पुणे मनपाच्या धर्तीवर शहरातील सर्व पात्र रिक्षाचालकांना सी.एन.जी./एल.पी.जी.किट बसविणेकामी सहाय्य अनुदान म्हणुन एकत्रित र.रु.१०,०००/- चे सहाय्यक अनुदान देणेस व सदर अनुदान वाटपाबाबतची कागदपत्रे एकत्रित ठेवणे, त्यामध्ये

रिक्षांचे आर.सी. पुस्तकाची झेरॉक्स, सी.एन.जी.किट बसविल्याची पावती, लायसन्स, परमीट, फीटनेस सर्टिफीकेट, पी.यु.सी. व मनपा हद्दीमध्ये १० वर्षाचा अधिवास, या कागदपत्रांची तसेच नविन आलेल्या प्रस्तावांची तपासणी आर.टी.ओ. कडे असलेल्या माहितीबरोबर जुळवुन पडताळणी करणे, प्रस्तावांच्या रकमेंचे बिल मनपाच्या लेखा विभागाकडे सादर करणे, तसेच रिक्षाचालकास चेकचे वाटप करणे इ. सर्व बाबींचे कामे पर्यावरण विभागाकडील तरतुदीमधुन कार्यशाळा विभाग, व ट्रॅफीक सेल विभागाकडुन करुन घेवुन टप्या टप्याने शहरातील सर्व पात्र रिक्षांना सहाय्यक अनुदान देणेच्या धोरणास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.अरुण बो-हाडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६५२ विषय क्रमांक - १३
दिनांक- २६/२/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.पअक/३/कावि/६१०/२०१४ दिनांक २६/१२/२०१४

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६५३ विषय क्रमांक - १४
दिनांक- २६/२/२०१५ विभाग-मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दिनांक १९/९/२०१४, ४/१०/२०१४, १७/१०/२०१४, ७/११/२०१४ व २१/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक ४/१०/२०१४, १७/१०/२०१४, ७/११/२०१४ व २१/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दिनांक २१/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.शांताराम भालेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६५४ विषय क्रमांक - १५
दिनांक- २६/२/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

दिनांक १०/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.शांताराम भालेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६५५ विषय क्रमांक - १६

दिनांक- २६/२/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा.क्रिडा समिती**

अ) दिनांक ३/९/२०१४, १७/९/२०१४, १/१०/२०१४, २१/१०/२०१४ व ५/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ५/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक १९/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दिनांक ३/१२/२०१४ व १७/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत अहे.

इ) दिनांक १७/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.शांताराम भालेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर**- सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/१०/कावि/५०/१५

दिनांक - २१/४/२०१५



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड म्हानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.